मैराथन की शुरुआत में जोन 3 के उपायुक्त विश्वास मोटे ने शपथ दिलाई। साथ ही यहां मतदान जागरूकता के लिए हस्ताक्षर अभियान भी चलाया गया। मैराथन प्रतियोगिता में मतदान जागरूकता के साथ-साथ मुंबई महानगर को स्वच्छ और सुंदर कैसे रखा जाए, इसके बारे में भी जागरूक किया गया। धावकों और मुंबईकरों को मुंबई को हरा-भरा रखने के लिए वृक्षारोपण पर जोर देने के बारे में भी बताया गया।

हाफ मैराथन में भाग लेने वाले धावकों ने 21, 10 और 5 किलोमीटर की दूरी तय की। इस प्रतियोगिता में शिक्षकों, अधिकारियों, कर्मचारियों एवं क्षेत्र के नागरिकों सहित विद्यार्थियों ने भाग लिया।

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# मतदान करणाऱ्यांना सवलती द्या...

## व्यापारी संघटनांचे दुकानदारांना आवाहन; पालिका आयुक्तांच्या बैठकीनंतर दुकानदारांचा पुढाकार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी मतदारांना खरेदीमध्ये सवलत द्या असे आवाहन यंदा व्यापारी संघटनांनी दुकानदारांना केले आहे. पालिका प्रशासनाबरोबर झालेल्या बैठकीनंतर व्यापारी संघटनांनी हे आवाहन केले असून विविध दुकानदार, उपाहारगृह, नाट्यगृह चालक यांनी मतदारांना सवलत देण्याचे ठरवले आहे.




गेल्या विधानसभा (२०१९) व मे महिन्यात झालेल्या लोकसभा (२०२४) निवडणुकीच्या तुलनेत जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करून मतदानाचा टक्का वाढविण्याचे भारत निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट आहे. यासाठी विविध संस्था तसेच प्रसिद्ध व्यक्ती, स्थानिक कलाकार, यू-ट्यूबर यांच्या माध्यमातून मतदारांना आवाहन करण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून मतदान केलेल्या मतदारांना खरेदीत सवलत द्यावी, असे आवाहन 'फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स वेलफेअर' संघटनेने केले आहे.

संघटनेचे अध्यक्ष विरेन शाह यांनी सांगितले, पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत मतदानाचा टक्का वाढण्यासाठी सवलत देण्याचे आवाहन दुकानदारांना करावे अशी सूचना संघटनांना करण्यात आली होती. त्यानुसार व्यापारी संघटनेने हे आवाहन केले आहे.

दुकानदारांनी सवलत देण्याचे मान्य केल्याचेही त्यांनी सांगितले. शाह यांनी आपल्या मालकीच्या 'रुपम' या दुकानावर सवलतीबाबतचा फलक लावला आहे. मुंबईतील शेकडो दुकानदार व आस्थापना या संघटनेच्या सदस्य आहेत. रिटेल असोसिएशनने देखील तयारी दर्शवल्याचे शाह यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान असून मतदान केल्यानंतर बोटावरील शाई दाखवल्यावर ही सवलत दिली जाणार आहे. अनेक दुकानदारांनी एका वस्तूवर एक वस्तू मोफत अशी सवलत देण्याचे ठरवले आहे. तर काही चित्रपटगृहांनी तिकिटात सवलत देण्याचे ठरवले असल्याचे शाह यांनी सांगितले.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# मतदानासाठी सुट्टी न दिल्यास आस्थापनांवर कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई शहर व उपनगरातील सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम तसेच इतर आस्थापनांमध्ये कार्यरत कामगार, कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी २० नोव्हेंबर रोजी सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांच्या मालकांविरोधात कडक कारवाई केली जाईल, अशी स्पष्टोक्ती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी बुधवारी केली.

## वेतनात कपात करता येणार नाही...

**अपवादात्मक परिस्थितीत कामगार, कर्मचारी, अधिकारी आदींना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास त्यांना किमान चार तासांची सवलत देता येईल. मात्र, अशा सवलत प्रकरणांमध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. दरम्यान, सुटीच्या बदल्यात संबंधित व्यक्तीच्या वेतनात कोणत्याही प्रकारची कपात करता येणार नाही. या नियमांचे किंवा तरतुदींचे कोणत्याही आस्थापनाच्या मालकांनी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.**

भारत निवडणूक आयोग तसेच मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या सूचनांनुसार मुंबई शहर व उपनगरांत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबई शहर आणि दोन्ही उपनगरांतील मतदारांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी विविध नियम जारी करण्यात आले आहेत. राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी **(पान ३वर)**

## मतदानासाठी सुट्टी न दिल्यास आस्थापनांवर कारवाई

**(पान १वरून)** सुट्टी देण्याबाबत गगराणी यांनी आदेश दिले आहेत. सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना हा नियम लागू होणार आहे.

लोक प्रतिनिधीत्व अधिनियमानुसार, एखाद्या मतदाराची नोकरीवरील अनुपस्थिती नोकरीच्या संदर्भात धोकादायक किंवा हानिकारक ठरणार असल्यास मतदारावर उल्लंघनात्मक कारवाई केली जाणार नाही. सुट्टी किंवा सवलत प्राप्त न झाल्याने एखाद्या व्यक्तीला मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित राहावे लागल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित आस्थापनांच्या मालक वा पदाधिकाऱ्यांविरोधात योग्य कारवाई करण्यात येईल. त्यामुळे उद्योग विभागांतर्गत येणारी सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आदी आस्थापनांनी जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून दिलेल्या या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आदेशही गगराणी यांनी दिले.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# बाणगंगा महोत्सवासारख्या कार्यक्रमांचा मतदान जनजागृतीसाठी विचार करावा

## अश्विनी जोशी यांच्या सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** खासगी कंपन्या, कॉर्पोरेट जगत, असंघटीत क्षेत्रातील कामगार अशा वेगवेगळ्या घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी नियोजन करावे. तसेच, राष्ट्रीय छात्र सेना, महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागांतर्गत कार्यरत आपदा मित्र यांचीही मदत घ्यावी. नागरिकांची गर्दी होणाऱ्या बाणगंगा महोत्सवासारखे कार्यक्रम, महोत्सव मतदानासंदर्भात जनजागृती करण्यासाठी महत्त्वाचे असल्याने त्यांचा यथायोग्य विचार करावा, अशा सूचना अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी यांनी सोमवारी दिल्या. तसेच, दीपावली सणानंतर स्वीप उपक्रमाच्या अंमजबजावणीचा वेग वाढवावा, असेही त्यांनी नमूद केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी स्वीप उपक्रमांतर्गत मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी सुरु असलेल्या विविध जनजागृती उपक्रमांचा तसेच पुढील नियोजनाचा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी यांनी सोमवारी आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. समाजातील सर्व स्तरांमध्ये पोहोचून मतदान करण्याबाबत जनजागृती होईल, या दृष्टीने उपक्रमांची संख्या वाढवावी, असेही जोशी यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीत मुंबईतील मतदानाचे प्रमाण वाढावे, यासाठी विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांची तसेच यापुढे नियोजित उपक्रमांची सविस्तर माहिती यावेळी सादर करण्यात आली. विविध शासकीय कार्यालयांमध्ये फलक, भित्तीपत्रके, स्टॅण्डीज लावणे, बेस्ट बस आणि बस थांब्यांवर प्रसिद्धी करणे, मोठ्या मंडई तसेच व्यापारी संकुल तसेच पर्यटकांचा अधिक वावर असलेल्या ठिकाणी पथनाट्य सादर करणे आदी उपक्रमांच्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृतीसाठी करण्यात येत आहे, अशी माहिती समन्वय अधिकारी तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी फरोग मुकादम यांनी दिली.

# निवडणूक काळात तातडीच्या जप्तीचे आयुक्तांचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईमध्ये कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी अधिक चोखपणे जबाबदारी पार पाडावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्य विक्री व तस्करी, सोने-चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवाला आदी संशयास्पद प्रकरणात कारवाई करण्यात कोणतीही हयगय करू नये, असे असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी, पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी मंगळवारी दिले.

संशयास्पद प्रकरणी थेट व तात्काळ जप्तीची कारवाई करावी. तसेच आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष केंद्रीत करून तेथेही योग्य ती कारवाई करावी, मुंबई महानगरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित विविध तपास व अंमलबजावणी यंत्रणांची महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी बैठक पार पडली. यावेळी गगराणी बोलत होते. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आलेल्या काही अनुभवांच्या आधारे केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग मुंबईतील निवडणुकीशी संबंधित बारीकसारिक बाबींवर विशेष लक्ष ठेवून आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

## सायकल रॅलीतून मतदानाविषयी जनजागृती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका आणि घाटकोपर पूर्व विधानसभा मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर, मतदार जनजागृतीचा एक भाग म्हणून घाटकोपर येथे 'पेडल फॉर डेमोक्रसी' ही सायकल रॅली रविवारी सकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आली.

सायकल रॅलीत सहभागी स्पर्धकांना विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या 'स्वीप' उपक्रमांतर्गत मतदान करण्याविषयी शपथ देण्यात आली. यावेळी महाराष्ट्र पोलीस दलातील 'फोर्स वन'चे प्रमुख अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश, समाज कल्याण विभागाचे उपायुक्त प्रसाद खैरनार, सहायक आयुक्त गजानन बेल्लाळे उपस्थित होते.

## मतदान जनजागृतीचा आज शुभारंभ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यातील मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मतदार जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' हे विशेष अभियान राज्यभर राबविण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ शुक्रवारी गेटवे ऑफ इंडिया येथे सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, मुंबई उपनगर जिल्हा व मुंबई शहर जिल्हा यांचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, सर्व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत या विशेष अभियानाचा शुभारंभ होईल. तसेच मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघात एकाच वेळी मतदार जनजागृती अभियानाची सुरुवात होणार आहे.

क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे,

मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, मुंबई उपनगर जिल्हा व मुंबई शहर जिल्हा यांचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, सर्व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत या विशेष अभियानाचा शुभारंभ होईल. तसेच मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघात एकाच वेळी मतदार जनजागृती अभियानाची सुरुवात होणार आहे.

क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे, दिग्दर्शक रोहित शेट्टी, अभिनेता सुबोध भावे, अभिनेत्री वर्षा उसगावकर, अभिनेता अर्जुन कपूर, हास्य कलाकार भारती सिंग, हर्ष लिंबाचिया, गायक मिलिंद इंगळे, गायिका वैशाली माडे, गायक राहुल सक्सेना यांच्यासह विविध नामवंत कलाकार, अभिनेते यावेळी उपस्थित राहणार आहेत.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामात कसूर नको

## भूषण गगराणी यांचे अधिकाऱ्यांना आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यामध्ये विविध यंत्रणांनी केलेल्या पूर्वतयारींचा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पालिका मुख्यालयात आयोजित बैठकीत शुक्रवारी आढावा घेतला. तसेच, निवडणुकीच्या कामकाजात कोणतीही कसूर राहू नये, यासाठी योग्य ती काळजी घेऊन सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने, सहकार्याने कार्य करावे. कोणत्याही लहानात लहान अडचणीलाही गांभीर्याने घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावे, असे आदेश गगराणी यांनी बैठकीत यंत्रणांना दिले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांची स्थिती, आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदारयाद्यांची स्थिती, नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे, मतदान संयंत्र ठेवण्यासाठी स्ट्राँग रुम, संवेदनशील मतदान केंद्रांची यादी, पोलीस आणि निवडणूक यंत्रणा यांच्याकडून विविध मतदारसंघांमध्ये संयुक्त पाहणी आदींबाबत अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर आणि विशेष कार्य अधिकारी विजय बालमवार यांनी आढावा सादर केला. विधानसभा निवडणुकीशी संबंधित मुंबईतील सर्वच यंत्रणांकडून उत्तम पद्धतीने काम सुरू आहे. मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकांपर्यंत आपली यंत्रणा पोहोचेल, हे सुनिश्चित करावे. मतदार यादीमध्ये मतदारांची नावनोंदणी करणे इत्यादी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी. नागरिकांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणापासून अगदी जवळ मतदान केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी सुलभ रचनेवर भर देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने गृहनिर्माण संस्थांच्या भेटी घेऊन समन्वय साधावा. निवडणुकीसंदर्भातील संपूर्ण तयारी अत्यंत चोखपणे आणि जबाबदारीने पार पाडावी, असेही गगराणी यांनी सांगितले.

यावेळी अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अमित सैनी आदि उपस्थित होते.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# मतदान केंद्रांवर मोबाइल नेण्यास बंदीच

## जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांचा प्रसारमाध्यमांशी संवाद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रावर मतदारांना मोबाइल नेण्यास बंदी असेल. त्यामुळे मतदारांना मतदान केंद्रावर मोबाइल नेता येणार नाही वा मोबाइल नेलाच तर तो मतदान केंद्राबाहेर ठेवण्याची जबाबदारी मतदारांवरच असेल, असे मुंबईचे निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी बुधवारी स्पष्ट केले.

भूषण गगराणी यांची जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून आधीच नेमणूक करण्यात आली. या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला. महाराष्ट्रात १५ ऑक्टोबर २०२४ पासून आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेचा भाग म्हणून मुंबईतील सर्व राजकीय अनधिकृत फलक, बॅनर, पोस्टर, स्टिकर काढण्याची कार्यवाही प्रशासनाने सुरू केली आहे. परवानगी असलेल्या ठिकाणी विहित पद्धतीने परवानगी घेतल्यानंतरच राजकीय पक्षांनी बॅनर्स, पोस्टर्स लावावे, असे गगराणी यांनी स्पष्ट केले. 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' या अभियानाविषयी माहिती देताना गगराणी म्हणाले की, लोकसभेच्या निवडणुकीनंतर मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. या प्रक्रियेनंतर मतदान केंद्रांमध्ये वाढ आणि बदल झालेल्या ठिकाणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) प्रत्येक कुटुंब आणि मतदारांपर्यंत पोहोचून मतदान केंद्रांची लेखी स्वरूपात माहिती देत आहेत. त्यासाठी 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' अर्थात k Know Your Polling StationI ही मोहीम व्यापक स्तरावर राबवण्यात येत आहे. राजकीय पक्षांनीही आपापल्या स्तरावर याबाबत खात्री करावी, असे आवाहन गगराणी यांनी केले.

### शेवटचे तीन दिवस

अद्याप मतदार नोंदणी न केलेल्या पात्र मतदारांना १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत नाव नोंदणी करता येईल. त्याचप्रमाणे नाव कमी करणे, नावात दुरुस्ती करणे याबाबतही समान प्रक्रिया आणि मुदत आहे, अशी माहिती देखील गगराणी यांनी दिली.




### नव्याने सर्वेक्षण

मुंबईत एकही संवेदनशील मतदान केंद्र नाही. निवडणुकीच्या आधी जिल्हाधिकारी आणि पोलिस विभाग सर्वेक्षण करून संवेदनशील विभाग निश्चित करीत असतात. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मुंबईत एकही संवेदनशील मतदान केंद्र नव्हते, अशी माहिती यावेळी सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण यांनी दिली. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा एकदा असेच सर्वेक्षण करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# मुंबईत एक कोटी मतदार

## सर्वाधिक चांदिवलीत, तर वडाळ्यात कमी मतदार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईमधील मतदारयाद्या तयार करण्याचे काम सुरू असून मुंबईत एकूण १ कोटी १ लाखाहून अधिक मतदार आहेत. त्यामध्ये ४७ लाख महिला, तर ५४ लाख पुरुष मतदार आहेत. मुंबईत सर्वाधिक मतदार उपनगरातील चांदिवली परिसरात, तर सर्वात कमी मतदार शहर भागातील वडाळा परिसरात आहेत.

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ३६ विधानसभा मतदारसंघ असून त्यापैकी १० विधानसभा मतदारसंघ मुंबई शहर जिल्ह्यात आणि २६ विधानसभा मतदारसंघ मुंबई उपनगर जिल्ह्यात आहेत.

**मतदार नोंदणीसाठी मदत क्रमांक**

मतदार नोंदणीसाठी १९ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा निवडणूक कार्यालयात मतदार नोंदणीबाबतचे अर्ज उपलब्ध आहेत. त्या कार्यालयात अर्ज भरून जमा करावयाचे आहे. तसेच ऑनलाइन मतदार नोंदणी करण्यासाठी https:// voters. eci. gov. in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी आणि अधिक माहितीसाठी हेल्पलाइन क्र. १९५० (टोल फ्री) वर संपर्क साधावा.



**मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी शहरातील मतदानाच्या तयारीबाबत माहिती दिली.**

### मतदार हेल्पलाईन क्रमांक. १९५०

**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर कार्यालय- १८००२६८२९१०**

**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय- नियंत्रण कक्ष क्रमांक- ०२२-२०८२२७८१**

**निवडणूक नियंत्रण कक्ष - ७९७७३६३३०४**

- मतदारांच्या मदतीसाठी Voter helpline App - मतदारांना आपले नाव मतदार यादीत तपासता येईल व नवीन मतदार नोंदणी या ॲपद्वारे करता येईल.
- KYC App - उमेदवारांबाबत माहिती या ॲपवर उपलब्ध होऊ शकेल
- Cvigil ॲपच्या मदतीने आचारसंहिता उल्लंघन संदर्भातील तक्रार मतदारांना करता येते. या ॲपवर केलेल्या तक्रारींचे १०० मिनिटांत निराकरण केले जाते.

### एकूण मतदार

| | |
|---|---|
| बोरिवली | ३२३६९५ |
| दहिसर | २७६२९८ |
| मागाठाणे | ३०२१३० |
| कांदिवली | २८५०८३ |
| चारकोप | ३१४२२२ |
| मालाड पश्चिम | ३५२७६१ |
| जोगेश्वरी | २९५८२१ |
| दिंडोशी | ३०२६०[illegible] |
| गोरेगाव | ३२४३७६ |
| वर्सोवा | २८२८१९ |
| अंधेरी पश्चिम | २८५२२९ |
| अंधेरी पूर्व | २८४७०[illegible] |
| मुलुंड | २९४४२३ |
| विक्रोळी | २४१११४ |
| भांडूप पश्चिम | २८४२३१ |
| घाटकोपर पश्चिम | २७३३४४ |
| घाटकोपर पूर्व | २४७३९० |
| मानखुर्द शिवाजीनगर | ३२३४२० |
| अणुशक्तीनगर | २६६५४८ |
| चेंबूर | २५७१६५ |
| विलेपार्ले | २७४२५८ |
| चांदिवली | ४४६७६७ |
| कुर्ला | २८९४६८ |
| कलिना | २३९८६३ |
| वांद्रे पूर्व | २४७६३९ |
| वांद्रे पश्चिम | २८७०२५ |
| धारावी | २६०७४७ |
| सायन-कोळीवाडा | २८१२९९ |
| वडाळा | २०४९०५ |
| माहिम | २२५३६७ |
| वरळी | २६३६४२ |
| शिवडी | २७३९५५ |
| भायखळा | २५७८४९ |
| मलबार हिल | २६०५३८ |
| मुंबादेवी | २४१२३५ |
| कुलाबा | २६४७३९ |

# मतदान यंत्रांची पहिल्या टप्प्यातील सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

## विधानसभा मतदारसंघनिहाय वितरणाची प्रक्रिया लवकरच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया पूर्ण झाल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी रविवारी सांगितले. या यंत्रांची विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

मतदान प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया महत्त्वाची असते. निवडणूक आयोगाच्या प्रणालीच्या



माध्यमातून जिल्हानिहाय विधानसभा मतदारसंघांची निवड करण्यात येते. या प्रक्रियेत दोन टप्प्यांत यंत्रांची सरमिसळ करण्यात येते. प्रत्येक यंत्राला विशिष्ट असा क्रमांक (युनिक आयडी) उपलब्ध करून देण्यात आला आहे. सरमिसळ प्रक्रियेनंतर कोणत्या विधानसभा मतदारसंघासाठी कोणते यंत्र वितरित करण्यात येणार आहे, याची यादी तयार केली जाते. ही यादी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तयार केल्यानंतर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने यादीचे प्रमाणीकरण करण्यात येते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आपल्या विधानसभा क्षेत्रात वितरित करण्यात येणारे यंत्रच प्रत्यक्षात वितरित करण्यात आल्याची खातरजमा करणे या प्रक्रियेमुळे शक्य होते. दरम्यान, रविवारी पालिका मुख्यालयात सरमिसळ करण्यात आलेल्या यंत्रांची विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स

# मतांची टक्केवारी वाढवणार

## ४०० मतदान केंद्रांवर लक्ष केंद्रित

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्याने ४०० मतदान केंद्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. लोकसभेला सरासरीपेक्षा १० टक्के कमी मतदान झालेली ही केंद्रे आहेत.

मुंबईत उपनगर हा देशातील सर्वाधिक मतदारसंघ असलेला जिल्हा आहे. जिल्ह्यात एकूण २६ विधानसभा तर चार लोकसभा मतदारसंघ आहेत. ७६ लाखांहून अधिक येथील मतदारसंख्या आहे. मात्र प्रत्येक निवडणुकीत येथील मतदारसंख्या ही राज्याच्या सरासरीपेक्षा कमी असते. अलिकडे झालेल्या लोकसभा निवडणुकीत जिल्ह्याने सरासरी गाठण्याचा प्रयत्न केला. मात्र ती ओलांडता आलेली नाही. ४०० मतदान केंद्र याला कारणीभूत ठरल्याचे जिल्हा निवडणूक शाखेच्या निदर्शनास आले असून त्यादृष्टीने प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

'लोकसभा निवडणुकीतील मतदानाचा आम्ही विधानसभा मतदारसंघनिहाय अभ्यास केला. त्यावेळी असे निदर्शनास आले की जिल्ह्यातील ४०० मतदान केंद्रांवर त्या विधानसभा मतदारसंघात झालेल्या सरासरी मतदानापेक्षा १० टक्के कमी मतदान झालेले आहे. त्यानुसार आता त्या ४०० मतदान केंद्रांशी निगडित मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे,' अशी माहिती मुंबई उपनगर जिल्हाधिकारी तथा मुंबईचे अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी माहिती दिली.

या ४०० मतदान केंद्रांवरील मतदारांची संख्या ४ लाखांहून अधिक आहे. त्या मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी-अधिकारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व तेथील बुथस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे पथक तयार करण्यात आले आहे. प्रत्येक पथकाकडे ५० मतदार आहेत. या ५० मतदारांपर्यंत हे पथक मतदानाच्या दिवसापर्यंत तीन वेळा पोहोचणार आहे. तसेच प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीदेखील तीन वेळा त्यांच्याकडे जाऊन त्यांना मतदानासाठी आग्रह धरला जाणार आहे. अशाप्रकारे मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात कसोशीने प्रयत्न सुरू आहेत.

### ७६ लाख मतदारांना पत्रक व स्लीप

उपनगर जिल्ह्याने गर्दी कमी करण्यासाठी २५ मतदान केंद्र बदलली आहेत. त्या केंद्रांवरील मतदारांना सातत्याने त्याची माहिती दिली जात आहेच, शिवाय जिल्ह्यातील सर्व ७६ लाख ८६ हजार ०९८ मतदारांपर्यंत मतदान कसे करावे, मतदान केंद्राचा पत्ता आदी माहिती असलेले पत्रक व स्लीप पोहोचविली जात आहे.




# सुट्टी द्या, अन्यथा कारवाई

## मुंबई महापालिका आयुक्त, निवडणूक अधिकाऱ्यांचे आदेश

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आणि अन्य सर्व आस्थापनांमध्ये कार्यरत असलेले कामगार, कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना विधानसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी २० नोव्हेंबरला सुट्टी देणे बंधनकारक आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनाविरोधात कारवाई केली जाईल, असे निर्देश मुंबई महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिले आहेत. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मुंबई महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले.

सुट्टीच्या बदल्यात संबंधित व्यक्तीच्या वेतनात कोणत्या ही प्रकारची कपात करता येणार नाही. या नियमांचे किंवा तरतुदीचे कोणत्याही आस्थापनांनी उल्लंघन केल्यास त्यांच्यावर निवडणूक आयोगाच्या नियमानुसार कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. एखाद्या मतदाराची नोकरीवरील अनुपस्थिती ही तो ज्या नोकरीवर असेल त्या नोकरीच्या संदर्भात धोकादायक किंवा हानिकारक ठरणार असेल, अशा कोणत्याही मतदारावर उल्लंघनात्मक कारवाई करू नका, असे निर्देश गगराणी यांनी दिले आहेत. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, कर्मचारी अधिकारी आदींना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पूर्ण दिवसाची सुटी देणे शक्य नसल्यास त्यांना किमान चार तासांची सवलत देता येईल. परंतु अशाप्रकारच्या सवलत प्रकरणामध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. सुटी किंवा सवलत प्राप्त न झाल्याने एखाद्या व्यक्तीला मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित राहावे लागल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित आस्थापनाविरोधात योग्य कारवाई करण्यात येईल. त्यामुळे, उद्योग विभाग अंतर्गत येणारे सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आदी आस्थापनांनी निवडणूक प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देशही गगराणी यांनी दिले आहेत.

### पुनरावृत्ती नको

लोकसभा निवडणुकीत मतदानावेळी खासगी कार्यालये आणि काही बड्या कंपन्यानी कार्यालये सुरूच ठेवली आणि कर्तव्यावर न येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन कपात, नोटीस बजावणे कारवाया केल्या होत्या. तर काहींनी कार्यालयांत उशिरा येण्याची मुभा दिली. मात्र कार्यालयात येण्यास जास्त वेळ लागल्याने कारवाईला सामोरे जावे लागले होते. यंदा विधानसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रयत्न आहेत.

महाराष्ट्र टाइम्स

# मुंबईत मतदानाचा टक्का वाढविण्याचे प्रयत्न

## गृहनिर्माण संस्थांशी चर्चा करण्याचे आयुक्तांचे निर्देश

**मुंबई :** मुंबईत आगामी विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी निवडणूक यंत्रणा प्रयत्नशील असून त्यासाठी रहिवासी संकुले, गृहनिर्माण संस्थांची चर्चा करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी शुक्रवारी आढावा बैठकीत दिले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यांमध्ये विविध यंत्रणांनी केलेल्या पूर्वतयारींचा गगराणी यांनी पालिका मुख्यालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला. मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकापर्यंत आपली यंत्रणा पोहोचेल, हे सुनिश्चित करावे. मतदार यादीमध्ये मतदारांची नाव नोंदणी करणे इत्यादी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी, असे गगराणी यांनी बैठकीत सांगितले.

नागरिकांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणापासून अगदी जवळ मतदान केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी सुलभ रचनेवर भर देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने देखील गृहनिर्माण संस्थांशी पुन्हा एकदा भेटी देऊन समन्वय साधावा, यात कोणतीही अडचण असल्यास वेळीच तोडगा काढावा. निवडणुकीसंदर्भातील संपूर्ण तयारी अत्यंत चोखपणे आणि जबाबदारीने पार पाडावी, असे निर्देश गगराणी यांनी यावेळी दिले.

या बैठकीला अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (मुंबई शहर) संजय यादव उपस्थित होते.

### तयारीचे सादरीकरण



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांची स्थिती, आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदार याद्यांची स्थिती आणि नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे, मतदान संयंत्र ठेवण्यासाठी स्ट्राँग रूम, संवेदनशील मतदान केंद्रांची यादी, पोलीस आणि निवडणूक यंत्रणा यांच्याकडून विविध मतदारसंघांमध्ये संयुक्त पाहणी आदींबाबत अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी क्षीरसागर आणि विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी सादरीकरण केले.

महाराष्ट्र टाइम्स

# तिशीतील मतदार राज्यात सर्वाधिक

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक मतदार हे ३० ते ३९ वर्षे वयोगटातील आहेत. एकूण मतदारांच्या तुलनेत या वयोगटातील मतदार एक चतुर्थांश आहेत. त्याखालोखाल ४० ते ४९ वयोगटातील मतदारांची संख्या आहे. राज्यात १५ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी केलेल्या नवमतदारांची संख्या २०.९३ लाख आहे.

राज्य निवडणुक आयोगाने बुधवारी वयोगटनिहाय मतदारांची संख्या जाहीर केली. राज्यात एकूण ९.६३ कोटी मतदार असून यात महिला आणि पुरुष मतदारांची संख्या जवळपास सारखीच आहे. मतदारांच्या वयोगटनिहाय वर्गवारीनुसार, सर्वाधिक मतदार हे ३० ते ३९ वर्षे वयोगटातील असल्याचे स्पष्ट होत आहे. यात १.१० कोटी पुरुष, तर १.०६ कोटी महिला मतदारांचा, तर दोन हजार १०० तृतीयपंथीयांचाही समावेश आहे.

जिल्हानिहाय आकडेवारी पाहता, सर्वाधिक ८७.५७ लाख मतदार हे पुणे जिल्ह्यात असून सर्वांत कमी केवळ ६.७८ लाख मतदार हे सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

राज्यात वयाची शंभरी पार केलेले ४७ हजार ७१८ मतदार असून यात १०० ते १०९ वर्षे वयोगटात ४७ हजार ५०१, ११०-११९ वर्षे वयोगटात ११० आणि १२० हून अधिक वय असलेले १०८ मतदार आहेत. या सर्व मतदारांना गृह मतदानाची सोय निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## शंभरीपार मतदारांची संख्या ४७,७१८

## मोबाइलला परवानगी देण्याची शिफारस

लोकसभा निवडणुकीदरम्यान, मोबाइल फोन मतदान केंद्राच्या १०० मीटर अंतराबाहेर ठेवण्याच्या पोलिसांच्या सूचनेमुळे अनेक मतदारांनी मतदान करणे टाळले आणि केंद्रावरून माघारी फिरणे पसंत केले. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मात्र किमान १०० मीटर आतही, मतदान केंद्रापर्यंत मोबाइल नेण्याची परवानगी मिळू शकते. निवडणूक कार्यालयाने १०० मीटरपर्यंत मोबाइल बंदीच्या सूचनेचा फेरविचार करावा, अशी शिफारस राज्याच्या निवडणूक आयोगाने केली आहे.

# मतदारयादीत जोडा मोबाइल क्रमांक

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमांतर्गत पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलांमध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधीही उपलब्ध आहे. यापैकी एक महत्त्वाची बाब म्हणजे मतदारांना मतदार यादीतील आपल्या नावासोबतच स्वतःचा मोबाइल क्रमांक जोडता येणार आहे.

मुंबईतील मतदारांना येत्या २० ऑगस्टपर्यंत मतदार यादीसोबत मोबाइल क्रमांक जोडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदार यादीतील नावासोबत मोबाइल क्रमांक जोडल्याने निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या विविध सूचना आणि माहिती मोबाइलवर मिळणे शक्य होणार आहे.

**मोबाइल क्रमांक जोडण्याचे फायदे**

-मोबाइल क्रमांक जोडल्यास, निवडणूक आयोगाच्या electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळाद्वारे तसेच voter Helpline मोबाइल ॲपद्वारे मतदार यादीतील आपल्या नावाचा सुलभतेने शोध घेणे शक्य.

**-ई-मतदार ओळखपत्र डाउनलोड करता येते.**

- पूर्वी मतदार नोंदणी व इतर सेवा ऑफलाइन स्वरूपाच्या होत्या.

## अर्ज भरण्याची सुविधा

- ऑनलाइन अर्ज भरण्याकरिता www.voters.eci.in हे संकेतस्थळ किंवा voter Helpline हे मोबाईल ॲप वापरता येते. लॉगइन केल्यावर अर्ज क्रमांक आठ निवडून त्यात correction of Entries in Electoral Roll या सुविधेअंतर्गत आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडण्याचा पर्याय मिळतो.
- ऑफलाइन अर्ज भरण्यासाठी जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमादरम्यान आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष शिबिरामध्येही मतदार अर्ज भरू शकतील.

## दुसऱ्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा

त्यामुळे अनेकदा ऑनलाइन पद्धतीने एकाच मोबाइल क्रमांकाचा वापर करून एकापेक्षा अधिक जणांचे मतदार नोंदणी अर्ज भरले जात. हे टाळण्यासाठी एका मोबाइल क्रमांकाचा वापर फक्त एकाच मतदार ओळखपत्रासाठी करता येईल.

महाराष्ट्र टाइम्स

## विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोग, मुंबई महापालिकेचे नियोजन

# मतटक्कावाढ, केंद्र सुसूत्रीकरणावर भर

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

**विधानसभेच्या निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. ही निवडणूक सर्वसामान्य मतदारांसाठी जशी लक्षणीय ठरत आहे, तशीच निवडणूक आयोग आणि मुंबई महापालिकेच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. मुंबई महापालिकेकडे यंदा निवडणूक कार्यवाहीची अंमलबजावणी सोपवण्यात आली आहे. प्रत्येक मतदारास सहज, सुलभ मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महापालिकेच्या मदतीने जनजागृतीसोबत सोयिसुविधांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यावर जिल्हा निवडणूक अधिकारीपदाची जबाबदारी सोपवतानाच, महापालिकेचे चार अतिरिक्त आयुक्त तसेच मुंबई उपनगर व शहर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्याकडेही अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी पदाची जबाबदारी दिली आहे.**

### वाढीव मतदान केंद्रे

मुंबईतील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीवेळी मतदान केंद्रांवर अधिक मतदार असल्याने मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. त्यामुळे काहींनी मतदान न करताच माघारी फिरणे पसंत केले. याची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत होऊ नये, यासाठी मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. एका मतदान केंद्रावर सरासरी बाराशे ते तेरासे मतदार असतील, हे सूत्र लक्षात ठेवून मतदान केंद्रांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीवेळी मुंबई शहरात एकूण दोन हजार ५०९ आणि उपनगरात सात हजार ३८४ मतदान केंद्रे होती. मतदान केंद्र सुसूत्रीकरण कार्यक्रमामुळे मतदान केंद्रांची संख्या अनुक्रमे दोन हजार ५३८ आणि सात हजार ५७४ झाली. गृहनिर्माण संस्थांमध्ये किंवा त्यांच्या परिसरामध्ये असणाऱ्या मतदान केंद्रांची संख्या यंदा ७०१ आहे.



### कारणांचा अभ्यास

मागील काही निवडणुकांमध्ये मुंबईमध्ये मतदानाची कमी होत गेलेली टक्केवारी ही निवडणूक आयोगाच्या नजरेतून चिंतेचा विषय राहिली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने याची गांभीर्याने दखल घेतली आहे. लोकसभा निवडणूक २०२४वेळी महाराष्ट्रात अत्यंत कमी मतदान झालेल्या दहा मतदारसंघांमध्ये मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण आणि मुंबई दक्षिण मध्य या मतदारसंघांचा समावेश होता. मुंबईकरांची उदासीनता नेमकी कशामुळे याचा शोध निवडणूक आयोगाने घेण्यास सुरुवात केली आणि त्यानुसार राज्य सरकार व स्थानिक महापालिकांनाही निर्देश दिले. मुंबईकरांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडावे, यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, मुंबईत विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. नेमक्या कोणत्या कारणांमुळे मतदान कमी झाले, याचा सखोल अभ्यासही करण्यात आला आहे. त्यानुसार महापालिकेवर निवडणूक नियोजनाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

### दिव्यांग, ज्येष्ठांसाठी वाहतूक सुविधा

मुंबईत २३ हजार ९२७ दिव्यांग मतदार आहेत. त्यांच्यासाठी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठी वाहतूक व्यवस्थेची एक हजार २८४ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. या ठिकाणांवरून दिव्यांगांची मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी ९९७ वाहने नेमण्यात आली आहेत.

### मतदान केंद्र जाणून घ्या

मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी राबवलेल्या अभिनव उपक्रमांपैकी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' म्हणजेच 'Know Your Polling Station' ही जनजागृती मोहीम होय. या मोहिमेतंर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी मतदारांच्या घरी जाऊन मतदान केंद्रांच्या ठिकाणामध्ये झालेल्या बदलांची माहिती दिली आहे. सोबतच मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी 'क्यूआर कोड' आधारित पत्रही प्रत्येक मतदारांना देण्यात आले आहे.

### २७ लाख बँक ग्राहकांना एसएमएस

मतदानासंदर्भात जनजागृतीसाठी विविध मोबाइल कंपन्यांच्या माध्यमातून सुमारे २७ लाख बँक ग्राहकांना एसएमएस पाठवले आहेत. मध्य, पश्चिम, मेट्रो रेल्वेद्वारा ७६ रेल्वे स्थानकांवर उद्घोषणांद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

### मतदान करा, सवलती मिळवा

मुंबईत मतदारांची टक्केवारी वाढावी, यासाठी मुंबईतील अनेक संस्था, संघटनांकडूनही साथ मिळत आहे. महाराष्ट्र रिटेलर्स असोसिएशन, 'आहार' ही उपाहारगृहांची संघटना, चित्रपटगृह व्यावसायिकांची संघटना यांच्यासह अन्य काही संस्था आणि संघटनांनी मतदानाचा हक्क बजावणाऱ्यांसाठी खानपान, चित्रपट तिकीट तसेच उत्पादन खरेदीत सवलती जाहीर केल्या आहेत. मतदान केल्याचा पुरावा म्हणून बोटावरची शाई दाखवा आणि २० ते २२ नोव्हेंबर या कालावधीमध्ये सवलती प्राप्त करा, अशा या योजना आहेत.



### सेलिब्रिटींकडून आवाहन

मतदान करण्याचे आवाहन करण्यासाठी कला तसेच क्रीडा क्षेत्रातील सेलिब्रिटींची मदत घेतली गेली आहे. ५० हून अधिक सेलिब्रिटींच्या आवाहनात्मक चित्रफिती महापालिकेचे संकेतस्थळ, एक्सवर जारी करण्यात आल्या आहेत.

### मतदान केंद्रावर मिळणाऱ्या सुविधा

- पेयजल, रांगेमध्ये ठराविक ठिकाणी आसन व्यवस्था, प्रतीक्षालय, पंखे, प्रकाशव्यवस्था, स्वच्छतागृह, कचरापेटी
- दिव्यांग मतदारांची गैरसोय होऊ नये, यासाठी मतदान केंद्रांच्या ठिकाणी व्हीलचेअर, रॅम्प
- सात ठिकाणी जिन्यावर सरकत्या 'व्हीलचेअर'चीही व्यवस्था.
- ८५ वर्षे पेक्षा अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी घरून मतदान करण्याची व्यवस्था.
- मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी झाल्यास त्यांच्या मदतीसाठी तसेच गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी स्वयंसेवक नियुक्त.
- एकाच परिसरात अधिक मतदान केंद्रे असल्यास मतदाराला नेमक्या कोणत्या केंद्रात जायचे आहे, याबाबत संभ्रम राहू नये, यासाठी रंगसंगतीचा पर्याय.



(स्त्रोत-मुंबई महापालिका, जनसंपर्क विभाग)

महाराष्ट्र टाइम्स

# पाच मतदान केंद्रे विशिष्ट संकल्पनांवर

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## मुंबई उपनगरात आयोगाकडून रचना

विधानसभा निवडणुकीत मतदारांचा मतदानासाठीचा उत्साह वाढावा, यायाठी निवडणूक आयोगोन विविध उपाययोजना केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे मुंबई उपगरातील पाच मतदान केंद्रांची रचना संकल्पनांवर (थीम) आधारित केली जाणार आहे.

मुंबई शहर व उपनगरात ३६ विधानसभा मतदारसंघांत २,०८५ ठिकाणी एकूण १० हजार ११७ मतदान केंद्रे आहेत. एकूण १.०२ कोटींहून अधिक मतदार त्या ठिकाणी हक्क बजावणार आहेत. या सर्व मतदारांचा उत्साह वाढवण्यासाठी आणि मतदान केंद्रांवर चांगला अनुभव देण्यासाठी



विविध प्रकारच्या सुविधा आयोगाने उभ्या केल्या आहेत. त्याअंतर्गत सर्व ३६ विधानसभा मतदारसंघांत प्रत्येकी एक 'गुलाबी' मतदान केंद्र असून त्याचे नियोजन पूर्णतः महिला कर्मचारी व अधिकारी करणार आहेत. याशिवाय काही मतदान केंद्रे हे संकल्पनेवर आधारित असतील. त्यासाठी पाच मतदारसंघांतील प्रत्येकी एका केंद्राची निवड करण्यात आली आहे.

उत्तर मुंबईतील मागाठाणे, उत्तर-पश्चिम मुंबईतील जोगेश्वरी पूर्व व वर्सोवा, उत्तर मध्य मुंबईतील विलेपार्ले आणि वांद्रे पश्चिम या मतदारसंघांत ही केंद्रे असतील. मागाठाणे येथे 'संजय गांधी राष्ट्रीय उद्यान', जोगेश्वरी पूर्व येथे 'फिल्म सिटी', वर्सोवा येथे 'कोळीवाडा', विलेपार्ले येथे 'विमानतळ' व वांद्रे पश्चिम येथे 'वांद्रे किल्ला/वांद्रे-वरळी सागरी सेतू' या संकल्पना राबवल्या जाणार आहेत.

लोकमत

# मतदान केंद्रांवर सोयी-सुविधा पुरवा

## अतिरिक्त आयुक्तांचे अधिकाऱ्यांना निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करून आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरवा, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी दिले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर विभागातील वडाळा, सायन, धारावी, माहीम या मतदारसंघांतील मतदान केंद्रांसंदर्भात केलेले नियोजन, पूर्वतयारीचा जोशी यांनी शुक्रवारी आढावा घेतला.

यावेळी विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, निवडणूक समन्वय अधिकारी फरोघ मुकादम, पालिका उपायुक्त (परिमंडळ-२) प्रशांत सपकाळे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुंबईतील मतदार केंद्रांचे सुसूत्रीकरण केले आहे. सर्व मतदार केंद्रांच्या ठिकाणी विविध प्रकारच्या सोयी-सुविधा देण्यासंदर्भात नियोजन करावे. मतदारांनी मतदार यादीत नोंदणी करण्यासाठी, मतदारसंघात बदल करण्यासाठी, नाव कमी करण्यासाठी दिलेल्या अर्जांचा लवकर निपटारा करावा. मतदान नोंदणी करणे, मतदानाचा हक्क बजावणे, तसेच ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्रांबाबत जनजागृती करावी. निवडणुकीसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे सुसूत्रपणे नियोजन करावे. त्यांच्याकडून विहित वेळेत कामे पूर्ण होतील, असे निर्देश जोशी यांनी दिले.



मतदान केंद्रासंदर्भात अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी बैठक घेतली.

### मुंबई क्षेत्रात १० हजार मतदान केंद्रे

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मुंबई शहर जिल्ह्यामध्ये एकूण २,५०९ मतदान केंद्रे होती. तर, मुंबई उपनगर जिल्ह्यात ही संख्या ७,३८४ होती. सुसूत्रीकरण कार्यक्रमामुळे मतदान केंद्रांची संख्या अनुक्रमे २,५३७ आणि ७,५७४ म्हणजेच संपूर्ण मुंबई क्षेत्रात १०,१११ इतकी झाली आहे.

लोकमत

# मूलभूत सोयी-सुविधा देण्यात कसूर ठेवू नका

## मतदान केंद्रांबाबत आयुक्तांचे निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत प्रत्येक मतदान केंद्रावर किमान सुविधा योग्य प्रकारे पुरविल्या जाव्यात. केंद्रांवर येणाऱ्या मतदारांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह यासारख्या मूलभूत सुविधा देण्यात कोणतीही कसूर ठेवू नये, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी संबंधित कंत्राटदारांना दिले आहेत. मतदान केंद्रांवरील सुविधांची पूर्तता, गुणवत्ता आदींचे परीक्षण करण्यासाठी पाच सदस्यीय पथक कार्यरत असेल, अशी माहितीही त्यांनी दिली. मतदान केंद्रांवर सुविधा पुरविणाऱ्या कंत्राटदारांची गुरुवारी पालिका मुख्यालयात बैठक घेण्यात आली.

लोकसभा निवडणुकीदरम्यान काही मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधांबाबत मतदारांनी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची केंद्रीय तसेच राज्य निवडणूक आयोगाने दखल घेतली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर निश्चित किमान सुविधा पुरविण्याचे निर्देश दिले आहेत. मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, कचरापेटी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, रॅम्पची व्यवस्था, खुर्ची किंवा बाकडे, आदी सुविधांसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा कटिबद्ध आहे, असे गगराणी यांनी सांगितले.

### ५ अभियंत्यांचा समावेश

मतदान केंद्रांवर सुविधांची पूर्तता, गुणवत्ता तपासण्यासाठी ३६ विधानसभा मतदारसंघांमध्ये २६ प्रशासकीय विभागांतील यांत्रिकी, विद्युत, स्थापत्य, घनकचरा व्यवस्थापन, परीरक्षण आदींशी संबंधित वरिष्ठ स्तरावरील पाच अभियंत्यांचे पथक नेमण्यात आले आहे, असेही गगराणी यांनी सांगितले.

लोकमत

# मतदानासाठी सुट्टी द्या नाही तर कठोर कारवाई

## पालिका आयुक्तांच्या सूचना : नियमांचे पालन न करणाऱ्या विरुद्ध कारवाई होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यातील



सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या, संस्था, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांमधील कामगार-कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी २० नोव्हेंबरला सुट्टी देणे बंधनकारक आहे. या सूचनेचे पालन न करणाऱ्या संस्था आणि आस्थापनांच्या मालकांविरुद्ध कारवाई केली जाईल, अशा इशारा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, मुंबईत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध अभिनव उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबईतील सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी निर्देश जारी करण्यात आले आहेत.

आयुक्तांच्या सूचनेनुसार मतदारसंघातील कोणतेही व्यवसाय, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा अन्य कोणत्याही आस्थापनांमध्ये कार्यरत आणि मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्यात यावी. महत्त्वाचे म्हणजे सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना हा नियम लागू होईल.

### काय आहेत सूचना?

**१** मतदानासाठी दिलेल्या सुट्टीपोटी संबंधित कामगार-कर्मचाऱ्यांच्या वेतनात कोणत्याही प्रकारची कपात करता येणार नाही. या नियमांचे किंवा तरतुदींचे नियोक्त्याने उल्लंघन केल्यास निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कारवाई केली जाईल.

**२** अपवादात्मक परिस्थितीत कामगार, कर्मचारी, अधिकारी आदींना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास त्यांना किमान चार तासांची सवलत देता येईल. परंतु, अशा प्रकारच्या सवलत प्रकरणांमध्ये, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.



**३** सुटी किंवा सवलत प्राप्त न झाल्याने एखाद्या व्यक्तीला मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित राहावे लागल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित नियोक्त्याविरोधात कारवाई करण्यात येईल.

**४** लोकप्रतिनिधित्व अधिनियम- १९५१ च्या कलम १३५ (ख) नुसार, एखाद्या मतदाराची नोकरीवरील अनुपस्थिती ही तो ज्या नोकरीवर असेल त्या नोकरीच्या संदर्भात धोकादायक किंवा हानिकारक ठरणार असेल, अशा कोणत्याही मतदारावर कारवाई केली जाणार नाही.

लोकमत

# मतदान करा, खरेदीवर सवलत मिळवा

## मतांचा टक्का वाढविण्यासाठी आता व्यापारी संघटनाही सरसावल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी प्रशासकीय यंत्रणेकडून विविध स्तरांवर उपक्रम राबविले जात असतानाच आता मुंबई महानगर प्रदेशातील व्यापारीही सरसावले आहेत. मतदानाचा हक्क बजावल्यानंतर खरेदीसाठी येणाऱ्या मतदारांना १० ते २० टक्के सवलत देण्याचे त्यांनी ठरविले आहे. मतदानाच्या दिवसापासून पुढील दोन दिवस ही सवलत लागू राहणार आहे, अशी माहिती मुंबई महानगर प्रदेशातील व्यापारी संघटनांनी दिली.

लोकसभा, विधानसभा अथवा मुंबई महापालिकेची निवडणूक असो, या दिवशी मतदानाकरिता सुट्टी असतानाही अनेक मतदार मतदानाऐवजी मौजमजेसाठी पर्यटनाला मुंबईबाहेर जातात. शिवाय उन्हाळ्याची सुट्टी किंवा दिवाळीची सुट्टी, अशा काळात निवडणूक असल्यास अनेकदा मतदार आपापल्या गावी जाणे पसंत करतात.



### हॉटेल चालकांच्या 'आहार'चाही पाठिंबा

- हॉटेल चालकांच्या 'आहार' संघटनेनेही या उपक्रमाला पाठिंबा दर्शवला आहे. मतदानाच्या दिवशी त्यांनी आपल्या हॉटेलमध्ये पोटपूजेसाठी येणाऱ्या ग्राहकांना सवलत देण्याचे ठरवले आहे.
- काही व्यापाऱ्यांनी ही सवलत मतदानाच्या दिवशी आणि आठवडाभर देण्याचे ठरवले आहे. मात्र, हा निर्णय त्या व्यापाऱ्यांचा असणार आहे.
- चित्रपटगृहांतही सवलत दिली जाणार आहे. एका तिकिटावर एक तिकीट फ्री अशी ही सवलत लागू असेल.
- फेडरेशन ऑफ रिटेल्स ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशन या व्यापारी संघटनांचे मुंबई महानगर प्रदेशात ३.५ लाख सदस्य आहेत.

### १० ते २० टक्के सवलत

१ पालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे मुंबई महानगर प्रदेशातील व्यापारी संघटनांसोबत बैठका घेतल्या जात आहेत. नुकत्याच झालेल्या चर्चेनुसार व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानांमध्ये मतदारांना सवलत देण्याचे जाहीर केले आहे.

२ मतदाराने शाई लावलेले बोट संबंधित व्यापारी संघटनेच्या सदस्यांच्या दुकानांमध्ये दाखविल्यास त्याला खरेदीवर १० ते २० टक्के सवलत दिली जाईल.

३ प्रत्येक व्यापारी आपापल्या पद्धतीने सवलतीचे दर ठरवत आहेत. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई येथील व्यापारी संघटनांनी आपल्या सदस्यांना या संदर्भातील माहिती दिली असून, त्यांनी त्यांच्या ठिकाणी ही सवलत लागू करावी, असे आवाहन केले आहे.

" आम्ही आमच्या सर्व व्यापारी संघटनांना यासंदर्भात माहिती दिली आहे. व्यापारी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालय आणि मुंबई महापालिकेला सहकार्य केले आहे. त्यानुसार आमच्या संघटनेशी निगडित असलेल्या व्यापारी सदस्यांनी त्यांच्या दुकानात सवलत देण्याचे ठरवले आहे. प्रत्येक ठिकाणी असलेली सवलत त्या-त्या व्यापारी संघटनांच्या सदस्यावर अवलंबून असेल. मात्र, मुंबईतला मतदानाचा टक्का वाढावा, हा त्या मागचा हेतू आहे.

**- वीरेन शाह, अध्यक्ष,** फेडरेशन ऑफ रिटेल्स ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशन

### लोकशाही बळकट करा!

१ रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आरएआय) या संस्थेने पालिकेच्या मतदार जागरूकता मोहिमेचे समर्थन करण्यासाठी पावले उचलली आहेत.

२ आरएआयने आपल्या सदस्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी मतदानाचे महत्त्व सर्वांना समजावून सांगावे आणि नागरिकांना लोकशाहीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. मतदान हा अधिकार आहे, त्याबरोबरीनेच आपल्या लोकशाहीचा पाया आहे.

३ मतदान करून लोकशाही बळकट करावी. मतदानाचे महत्त्व जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही काम करत आहोत, असे रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सीईओ कुमार राजगोपालन यांनी सांगितले.



### उपक्रमांतर्गत 'आरएआय' काय करणार

- व्यापक मतदार जागरूकता
- मतदारांसाठी विशेष ऑफर
- सोशल मीडियावर जनजागृती

### सेलिब्रिटी करताहेत जनजागृती

- मतदानाच्या दिवशी मुंबईतील अधिकाधिक मतदारांनी घराबाहेर पडून मतदान करावे, यासाठी मुंबई महापालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालय शहर आणि उपनगरात ठिकठिकाणी विविध उपक्रमांचे आयोजन करून जनजागृती मोहीम राबविली जात आहे. त्याकरिता पथनाट्य किंवा इतर अनेक माध्यमांचा वापर केला जात आहे.
- समाजमाध्यमांद्वारे विविध सेलिब्रिटींना सहभागी करून घेत त्यांच्याकडून मतदानाचे आवाहन केले जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने यासाठी आपल्या सोशल मीडियाचा पुरेपूर वापर सुरू केला आहे. व्हिडीओ अपलोड करत या माध्यमातून मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे.

लोकमत

# मतदानाचा टक्का वाढण्यासाठी प्रयत्न करा

## भूषण गगराणी : निवडणुकीच्या तयारीचा आढावा



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी शुक्रवारी पूर्वतयारीचा आढावा घेतला.

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकांपर्यंत आपली यंत्रणा पोहोचेल, यादृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश पालिका आयुक्त तसेच निवडणूक जिल्हाधिकारी भूषण गगराणी यांनी शुक्रवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत दिले.

निवडणुकीच्या कामकाजात कसूर राहू नये, यासाठी योग्य ती काळजी घेऊन सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशी सूचना त्यांनी केली.

मुंबईतील मतदान केंद्रांची स्थिती, कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदार यादी, स्ट्रॉंग रूम, संवेदनशील मतदान केंद्र, पोलिस व निवडणूक यंत्रणेची विविध मतदारसंघांत संयुक्त पाहणी तसेच मतदानाबाबत जनजागृती याचा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर आणि विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी आढावा सादर केला.

### अडचणींवर तोडगा काढण्यासाठी वरिष्ठांशी चर्चा करा

१ विधानसभा निवडणुकीशी संबंधित मुंबईतील सर्वच यंत्रणांकडून उत्तम पद्धतीने काम सुरु आहे. मतदार यादीत मतदार नोंदणी आदी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी.

२ नागरिकांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणापासून अगदी जवळ मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यासाठी सुलभ रचनेवर भर देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने देखील गृहनिर्माण संस्थांशी पुन्हा भेटी देऊन समन्वय साधावा.

३ संपूर्ण कामकाजादरम्यान कोणत्याही अडचणीबाबत वेळीच आणि योग्य पद्धतीने तोडगा निघावा, यासाठी वरिष्ठांशी वेळोवेळी चर्चा करावी, अशा सूचना गगराणी यांनी संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेतल्यानंतर अधिकाऱ्यांना दिल्या.

लोकमत

# मतदान केंद्रांवर किमान सुविधा द्या

## एस. चोक्कलिंगम यांच्या सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीत प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, आसनव्यवस्था आदी निश्चित किमान सुविधा पुरविण्याच्या सूचना मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी पालिका प्रशासनाला दिल्या.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पाडून लोकशाही अधिक बळकट करण्याची जबाबदारी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर असते. त्यामुळे, आगामी विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया अत्यंत निकोप आणि सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील विधानसभा मतदारसंघांमध्ये करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा आढावा त्यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यासोबत सोमवारी घेतला. बैठकीच्या सुरुवातीला अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यांमधील विविध मतदारसंघ, सुसूत्रीकरणानंतर मतदान केंद्रांमध्ये झालेले बदल, यासंदर्भात सादरीकरण केले.

### मुंबईची चर्चा देशभरात

मुंबई हे ३६ विधानसभा मतदारसंघ असलेले देशातील एकमेव महानगर असल्याने येथे घडणाऱ्या बारीकसारीक बाबींची चर्चा देशभर होत असते. त्यामुळे निवडणुकीच्या तयारीमध्ये कोणतीही हयगय होऊ नये, यासाठी प्रत्येक निवडणूक अधिकाऱ्याने सतर्कतेने नियोजन करावे, असे चोकलिंगम यांनी स्पष्ट केले. मतदारांना रांगेत उभे राहावे लागू नये, यासाठी योग्यप्रकारे व्यवस्थापन करावे. मतदारच नव्हे तर मतदान प्रक्रियेत सहभागी असलेले कर्मचारी यांना ईव्हीएम संयंत्र घेतेवेळी किंवा जमा करते वेळी संबंधित केंद्रांवर ताटकळावे लागणार नाही, याची खात्री करावी. कोणतीही अनैतिक किंवा अवैध बाब लक्षात येताच त्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

### आव्हाने वेगळी

मुंबईतील प्रत्येक मतदारसंघाची रचना, तेथील समस्या आणि आव्हाने वेगवेगळी आहेत. त्यामुळे, प्रत्येक निवडणूक अधिकाऱ्यांनी सूक्ष्म पद्धतीने नियोजन करुन निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि सुलभ पद्धतीने पार पडेल, अशी तयारी करण्याचे निर्देश गगराणी यांनी दिले.



लोकमत



महापालिका आयुक्त भूषण गगराणी, जिल्हाधिकारी संजय यादव आणि राजेंद्र क्षीरसागर यांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

# मतदानाचा टक्का वाढण्यासाठी राजकीय पक्षांनी पुढाकार घ्यावा

## पालिका आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचे प्रमाण वाढवावे, यासाठी यंत्रणांच्या प्रयत्नांना राजकीय पक्षांनीही आपापल्या परीने सहकार्य करण्याची गरज आहे. सध्या मुंबईत मतदार यादी संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम सुरू असून, त्याची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय पक्षांनी मदत करावी, जेणेकरून अधिकाधिक मतदार नोंदवले जातील, अशी सूचना पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी केली.

विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत पालिका मुख्यालयात शुक्रवारी बैठक झाली. त्यावेळी गगराणी बोलत होते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनीही आपापली मते व सूचना मांडल्या. लोकसभा निवडणूक दरम्यानचा अनुभव लक्षात घेता पालिका क्षेत्रात मतदान केंद्रांच्या रचनेत अधिक सुसूत्रीकरण केल्याची माहिती मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव तसेच मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली.

### मतदान केंद्रे वाढणार

राजकीय पक्षांनाही नव्या मतदार याद्या दिल्या आहेत. प्रत्येक केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी १५०० मतदारांची संख्या ही आता सरासरी १००० ते १२०० पर्यंत असणार आहेत. यामुळे मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ होणार आहे. परिणामी मतदानाचे प्रमाण व वेग वाढणार आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था असो वा झोपडपट्टी परिसर, या सर्वांची मागणी व आवश्यकता लक्षात घेता मतदार संख्या व परिसर यांचा योग्य ताळमेळ घातल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### तुमचे मतदान केंद्र जाणून घ्या

मतदान केंद्रांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी Know your polling station (तुमचे मतदान केंद्र जाणून घ्या) हे जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती या वेळी जिल्हाधिकारी संजय यादव आणि राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली.

लोकमत

# मतदार यादीशी जोडा मोबाइल क्रमांक

## नवमतदार, तपशील बदल, दुरुस्तीसाठी २० ऑगस्टपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. त्यात पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलामध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधीही उपलब्ध आहे. त्याचबरोबर मतदारांना मतदार यादीतील आपल्या नावासोबतच मोबाइल क्रमांक जोडता येणार आहे.

नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी तंत्रज्ञानस्नेही पर्यायांचा वापर करणे गरजेचे आहे. त्यामुळे मतदान प्रक्रियेत आपला सहभाग नोंदविण्याची भूमिका निश्चितपणे बजावते येते, म्हणूनच आपल्या मतदार यादीतील नावासोबत मोबाइल क्रमांक जोडण्याचे आवाहन निवडणूक आयोग व पालिकेकडून करण्यात येत आहे.

मुंबईतील मतदारांना २० ऑगस्टपर्यंत मतदार यादीसोबत मोबाइल क्रमांक जोडता येणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून दिल्या जाणाऱ्या विविध सूचना आणि माहिती नागरिकांना आपल्या मोबाइलवर मिळणे शक्य होणार आहे.

निवडणूक आयोगाकडून मोबाइलवर पाठवण्यात येणाऱ्या संदेशात मतदान केंद्र, मतदानाची तारीख, मतदानाची वेळ आदी माहिती असते. मतदानाच्या दिवशी आपला वेळ वाचवण्यासोबतच, विनासायास मताधिकार बजावण्यास ही माहिती उपयुक्त ठरते. तसेच आयोगाकडून मतदारांसाठी दिल्या जाणाऱ्या सूचना आणि निर्देशांची माहिती मिळते.

### मतदार यादीशी मोबाइल क्रमांक जोडण्याचे फायदे

- मोबाइल क्रमांक अद्ययावत केल्यास, निवडणूक आयोगाच्या electoralsearch.eci.gov.in या वेबसाइटद्वारे तसेच Voter Helpline अॅपद्वारे मतदार यादीतील आपल्या नावाचा शोध घेता येतो.
- ई- मतदार ओळखपत्र डाउनलोड करता येते.
- पूर्वी मतदार नोंदणी व इतर सेवा ऑफलाइन होत्या. त्यामुळे अनेकदा ऑनलाइन पद्धतीत एकाच मोबाइल क्रमांकाचा वापर करून एकापेक्षा अधिक जणांचे मतदार नोंदणी अर्ज भरले जातात.
- अशावेळी हे टाळण्यासाठी एका मोबाइल क्रमांकाचा वापर फक्त एकाच मतदार ओळखपत्रासाठी केला जावा.



### ... असा भरा अर्ज

१ नवमतदार नोंदणीचा अर्ज भरताना आपल्याला अर्जात स्वतःचा मोबाइल क्रमांक देण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

२ नोंदणीकृत मतदारांना अर्ज क्रमांक ८ यामध्ये यादीतील वैयक्तिक तपशीलातील बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण अंतर्गत मतदार यादीत आपल्या नावासोबत मोबाइल क्रमांक जोडण्याचा पर्याय दिला आहे. हा अर्ज ऑनलाइन, तसेच ऑफलाइनही भरता येतो.

लोकमत

# मतदान केंद्रात मोबाइल बंदीच

## गगराणी: मतदानाच्या दिवशी पालिकेचे ४० हजार कर्मचारी कार्यरत असणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : मतदान केंद्रावर मोबाइल घेऊन जाण्यास मनाई असल्याचे निवडणूक आयोगाचे स्पष्ट निर्देश आहेत; मात्र लोकसभा निवडणुकीच्या वेळी अनेक ठिकाणी मतदार मोबाइल घेऊन केंद्रात जाताना दिसले; तर काही ठिकाणी मोबाइल बंदीमुळे अनेकजण मतदान न करताच परत निघून गेले. लोकसभेला झालेला गोंधळ लक्षात घेता, मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात आयोगाच्या सूचनेनुसार मोबाइल बंदी कायम असल्याचे पालिका आयुक्त तथा मुंबई जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी स्पष्ट केले आहे.

मतदान प्रक्रियेत बाधा निर्माण करणे, मतदान केंद्रावर शांतता भंग करणे तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यासाठी मोबाइलचा गैरवापर होण्याची शक्यता असल्यामुळे मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांवर मोबाइल घेऊन जाण्यास मतदारांना मज्जाव करण्यात येतो. या कारणास्तव मतदारांनी प्रशासनाला सहकार्य करत मोबाइल घरी ठेवून मतदानासाठी येण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणुकीची माहिती देण्यासाठी गगराणी यांनी पालिका मुख्यालयात बैठकीचे आयोजन केले होते. त्यानंतर त्यांनी तयारीची माहिती दिली. मुंबई शहर व उपनगरात १२०० पेक्षा अधिक मतदारसंख्या असलेली १२७६, तर १० हजारांपेक्षा अधिक मतदारसंख्या असलेली १३९ मतदान केंद्रे आहेत. पोलिस प्रशासनाच्या मदतीने संवेदनशील मतदान केंद्रांचे सर्वेक्षण सुरू असून, त्या संदर्भातील माहिती दिली जाईल, असे पोलिस सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी यांनी सांगितले. एका मतदान केंद्राच्या ठिकाणी १०पेक्षा जास्त केंद्रे असल्यास ते जवळच्या ठिकाणी स्थलांतरित



बैठकीमध्ये माहिती देताना पालिका आयुक्त तथा मुंबई जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी आणि पोलिस सहआयुक्त सत्यनारायण चौधरी.

### मतदारांना सर्व सुविधा मिळणार

**१** सध्या पालिकेचे बीएलओ कामासाठी १२ ते १५ हजार कर्मचारी देण्यात आले असून मतदानादिवशी ४० ते ४२ हजार कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रयत्न करतानाच, प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, रांगेत उभे असलेल्या मतदारांसाठी आसनव्यवस्था, स्वच्छतागृहे, इत्यादी निश्चित किमान सुविधांची पूर्तता करण्यात येणार आहे.

**२** निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या स्तरावर करावयाच्या कार्यवाहीबाबत स्वतंत्रपणे बैठका घेण्यात येतील, अशी माहिती अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबईचे उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली.

**मुंबई उपनगर**

| | |
|---|---|
| एकूण मतदान केंद्रे | ७,५७४ |
| सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमधील मतदान केंद्रे | ५५३ |
| झोपडपट्टी परिसरात मतदान केंद्रे | २२९ |
| मुंबई शहर जिल्ह्यात मंडपातील मतदान केंद्रे | १,३०२ |
| पहिल्या मजल्यावरील मतदान केंद्रे | १३९ |



**मुंबई शहर**

| | |
|---|---|
| एकूण मतदान केंद्रे | २,५३७ |
| उत्तुंग इमारतींमधील मतदान केंद्रे | १५६ |
| सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमधील मतदान केंद्रे | १०० |
| झोपडपट्टी परिसरात मतदान केंद्रे | ३१३ |
| मुंबई शहर जिल्ह्यात मंडपातील मतदान केंद्रे | ७५ |
| पहिल्या मजल्यावरील मतदान केंद्रे | १७ |

लोकमत

# सहा अतिरिक्त निवडणूक अधिकारी पालिका क्षेत्रात

## ३६ विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी

लोकमत न्यूज नेटवर्क



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मुंबई महापालिका क्षेत्रातील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी सहा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

महापालिकेच्या अखत्यारीतील संपूर्ण क्षेत्र लक्षात घेतले तर ते मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा या दोन महसूल क्षेत्रात मोडते. हे दोन्ही जिल्हे मिळून झालेल्या महानगरपालिका क्षेत्रात एकूण ३६ विधानसभा मतदारसंघ आहेत. या महापालिका क्षेत्रासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून पालिका आयुक्तांकडे जबाबदारी दिली आहे.

### अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी व मतदारसंघ

१. **संजय यादव** (मुंबई शहर जिल्हाधिकारी) - वरळी (१८२), शिवडी (१८३ ), भायखळा (१८४), मलबार हिल (१८५), मुंबादेवी (१८६), कुलाबा (१८७)

२. **डॉ. अश्विनी जोशी** (अतिरिक्त महापालिका आयुक्त) - धारावी (१७८), शीव कोळीवाडा (१७९), वडाळा (१८०), माहीम (१८१).

३. **डॉ. अमित सैनी** (अतिरिक्त महापालिका आयुक्त) - अणुशक्ती नगर (१७२), चेंबूर (१७३), मुलुंड (१५५), विक्रोळी (१५६), भांडूप पश्चिम (१५७), घाटकोपर पश्चिम (१६९), घाटकोपर पूर्व (१७०), मानखुर्द शिवाजी नगर (१७१)

४. **राजेंद्र क्षीरसागर** (जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे) - विलेपार्ले (१६७), चांदिवली (१६८), कुर्ला (१७४), कलिना (१७५), वांद्रे पूर्व (१७६), वांद्रे पश्चिम (१७७)

५. **अतिरिक्त महापालिका आयुक्त**, पश्चिम उपनगरे (नियुक्तीच्या प्रतीक्षेत) - जोगेश्वरी (१५८), दिंडोशी (१५९), गोरेगाव (१६३), वेसावे (वर्सोवा) (१६४), अंधेरी पश्चिम (१६५), अंधेरी पूर्व (१६६)

६. **अभिजीत बांगर** (अतिरिक्त महापालिका आयुक्त, प्रकल्प) - बोरिवली (१५२), दहिसर (१५३), मागाठाणे (१५४), कांदिवली पूर्व (१६०), चारकोप (१६१), मालाड पश्चिम (१६२)

लोकमत

# मतदार नोंदणीसाठी उरले ३ दिवस

## शहर, उपनगरात नोंदणीकृत मतदारांची संख्या १ कोटीहून अधिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभेच्या निवडणुकीसाठी पालिका आयुक्तांकडे मुंबई उपनगर व मुंबई शहर या दोन्ही जिल्ह्यांसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी बुधवारी पालिका मुख्यालयात बैठक घेत मतदानाच्या प्रक्रियेसंदर्भात माहिती दिली. मुंबई शहर व उपनगरात मिळून एक कोटीहून अधिक नोंदणीकृत मतदार आहेत. ज्या नागरिकांची मतदार नोंदणी अद्याप झाली नाही किंवा नोंदणीत दुरुस्ती बाकी आहे, त्यांना १९ ऑक्टोबर मध्यरात्री १२ पर्यंत मुदत असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदारांना ऑफलाइनसह ऑनलाइन पद्धतींचा व विविध आयोगांच्या विविध ॲप्लिकेशनचा वापर करता येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महापालिका क्षेत्रामध्ये ३६ विधानसभा मतदारसंघ असून, त्यापैकी १० विधानसभा मतदारसंघ हे मुंबई शहर जिल्ह्यात आणि २६ विधानसभा मतदारसंघ मुंबई उपनगर जिल्ह्यात आहेत. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार पालिकेच्या ४ अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांना आणि जिल्हाधिकारी, उपनगर व शहर यांना अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



### ...येथे अर्ज उपलब्ध

मतदार नोंदणीसाठी मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा निवडणूक कार्यालयात मतदार नोंदणीबाबतचे अर्ज उपलब्ध आहेत. याशिवाय ऑनलाइन मतदार नोंदणी करण्यासाठी https://voters.eci.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले.

### मतदार नोंदणीसाठी सुविधा

- **व्होटर हेल्पलाइन ॲप** - मतदारांना आपले नाव मतदार यादीत तपासता येईल व नवीन मतदार नोंदणी या ॲपद्वारे करता येईल.
- **केवायसी ॲप** - उमेदवारांची माहिती या ॲपवर उपलब्ध होऊ शकेल.
- **सी-व्हिजिल ॲप** - या ॲपच्या मदतीने आचारसंहिता उल्लंघन संदर्भातील तक्रार मतदारांना करता येते. या ॲपवर केलेल्या तक्रारींचे १०० मिनिटांत निराकरण केले जाते.

### मुंबई महानगरातील मतदारांची संख्या

| मतदार | मुंबई उपनगर | मुंबई शहर |
|---|---|---|
| महिला | ३५,६१,५८७ | ११,७१,८०८ |
| पुरुष | ४०,८५,५५० | १३,६२,२२४ |
| तृतीयपंथी | ८३१ | २४४ |
| ज्येष्ठ नागरिक | ९३,४४८ | ५४,०६३ |
| नवमतदार संख्या | १,२२,९१९ | ३७,८९४ |
| दिव्यांग मतदार | १७,२०९ | ६,३३४ |
| सर्व्हिस व्होटर | १,०८९ | ३९२ |
| अनिवासी भारतीय मतदार | १,८६७ | ४०६ |
| एकूण संख्या | ७६,४७,९६७ | २५,३४,२७६ |

लोकमत

# सर्व मतदान केंद्रांवर वेब कास्टिंग यंत्रणा

## कोणत्याही क्षणाची क्षणचित्रे पाहता येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी यंदा विशेष काळजी घेण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रांच्या ठिकाणी १०० टक्के वेब कास्टिंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे कोणत्याही मतदान केंद्रावरील कोणत्याही क्षणाची क्षणचित्रे निवडणूक आयोगाला कोणत्याही वेळी पाहता येणार आहेत. परिणामी, तेथील प्रत्येक घटनेवर लक्ष ठेवता येणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईत एकूण १० हजार ११७ मतदान केंद्रांमध्ये मतदान होणार आहे. यापैकी शहर भागात दोन हजार ५३८, तर उपनगरे भागात सात हजार ५७९ मतदान केंद्रे आहेत. यावेळी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व १०० टक्के मतदान केंद्रांवर वेब कास्टिंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

यापूर्वीही काही ठिकाणी वेब कास्टिंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. मात्र, यावेळी ही सुविधा सर्वच मतदान केंद्रांवर उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच या वेब कास्टिंगची लिंक भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाला प्रत्येक मतदान केंद्रावर बारीक नजर ठेवता येणार आहे.

### १४ हजार बॅलेट युनिट

मुंबईमधील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी शहर भागात तीन हजार ०४१ आणि उपनगरात ११ हजार १३१ बॅलेट युनिट अशी एकूण १४ हजार १७२ बॅलेट युनिट उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच, शहर भागात तीन हजार ०४१ आणि नऊ हजार ०७९ असे एकूण १२ हजार १२० कंट्रोल युनिट उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे, शहर भागात तीन हजार २९४ तर उपनगर भागात नऊ हजार ८३७ अशी एकूण १३ हजार १३१ व्हीव्हीपॅट मशीन उपलब्ध करण्यात येणार आहेत.

लोकमत

# मतदान केंद्रे नटली, नववधूसारखी सजली

## एखादा समारंभ असल्याचा भास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** वेसावे मतदारसंघातील मतदान केंद्रावर होडी आणि छताला लटकलेली जाळी, प्रवेशद्वारावर कोळी महिला आणि पुरुषांचे पारंपरिक वेशातील कटआउट्स, धारावी ट्रान्झिट कॅम्पमध्ये गुलाबी रंगाचे मंडप, विमानतळाचा भाग असल्याने विलेपार्ल्यातील मतदान केंद्रात विमानाची प्रतिकृती, एशियाटिक सोसायटीच्या प्रवेशद्वाराची प्रतिकृती... मुंबईच्या विविध भागांतही मतदान केंद्रे मतदानासाठी अशी नटली आहेत. त्यामुळे या ठिकाणी एखादा समारंभ असल्यासारखे जाणवत असून मतदारांना मतदान केंद्राचे हे रुपडे चांगलेच भावेल, असे आहे.

मतदान केंद्रे अधिकाधिक आकर्षक करण्यासाठी यंदा मुंबई महापालिकेने खूपच मेहनत घेतली आहे. मुंबईचे मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून या निवडणुकीसाठी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी गेल्या अनेक दिवसांपासून मेहनत घेत आहेत. मतदान केंद्रावर विविध सोयीसुविधा पुरविण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रे अधिकाधिक आकर्षक करण्यात आली आहेत. मतदार केंद्रातील अमुक एका क्रमांकाचे केंद्र कुठे आहे हे समजावे म्हणून दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत.



### वेसावेमध्ये कोळीवाड्याचा साज

१ मतदान केंद्रे आकर्षक करण्यासाठी वेगवेगळ्या संकल्पना राबवण्यात आल्या आहेत. मतदारसंघाचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन प्रतिकृतींचा वापर करण्यात आला आहे. केंद्राच्या आतील भागात रंगीबेरंगी आच्छादने लावण्यात आली आहेत. टेबलांवरही छान कापड अंथरण्यात आले आहे.

२ वेसावेतील एक केंद या भागाचे वैशिष्ट्य अधोरेखित करते. वेसावे, यारी रोड येथील महापालिकेच्या उच्च माध्यमिक शाळेत खास येथील मतदान केंद्रात कोळीवाड्यातील घरे, त्यांच्या मासेमारी बोटी आणि मासेमारी व्यवसाय, मासेमारीला लागणारी साधने, कोळी समाजाचे आदरातिथ्य आणि त्यांची संस्कृती यांचे दर्शन घडविणारा देखावा साकारला आहे.



लोकमत




कुलाबा मतदारसंघात मतदान केंद्राबाहेर सचिवालय जिमखान्याची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. (छाया : दत्ता खेडेकर)

# मुंबईची ओळख असणाऱ्या गोष्टींचा मतदान केंद्रांना साज

## कुलाबा मतदारसंघात मतदानवाढीसाठी प्रयत्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा मतदारसंघात निवडणुकीत मतदानाचे प्रमाण कमी असते. त्यामुळे हे प्रमाण वाढावे, यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. येथे २०१९ विधानसभा निवडणुकीतही ४० टक्के मतदान झाले होते. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आयोग विशेष प्रयत्न करीत आहे. त्यानुसार यावेळी विधानसभा निवडणुकीत मुंबईची ओळख असणाऱ्या गोष्टींनी मतदान केंद्रे सजवली आहेत.

उच्चभ्रू वस्ती अशी कुलाबा मतदारसंघाची ओळख आहे. अनेक उद्योजक, व्यावसायिक, मंत्र्यांची निवासस्थाने या मतदारसंघात आहेत. असे असतानाही या मतदारसंघात मतदानाची टक्केवारी कमी असणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे निवडणूक आयोग मतदारांपर्यंत पोहोचून मतदान करण्याबाबत जनजागृती करण्याचे काम करीत आहे. लोकशाहीच्या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेऊन मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी जागरूक व जबाबदार नागरिक म्हणून कुलाबा मतदारसंघातील मतदारांनी पुढे यावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले होते.



लोकमत सुपर Vote

### या मतदान केंद्रावर ही थीम

- सचिवालय जिमखाना : **गेट वे ऑफ इंडिया**
- के सी कॉलेज : **छत्रपती शिवाजी महाराज स्थानक**
- सिडनम कॉलेज : **रेल्वे लोकल ट्रेन**
- एसएनडीटी महिला विद्यापीठ : **एशियाटिक लायब्ररी**
- सर जे जे इन्स्टिट्यूट आर्ट कॅम्पस : **सखी रुम**

लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या विधानसभा मतदारसंघामध्ये कुलाब्याचा समावेश होता. त्यामुळे मतदान प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने निवडणूक आयोगामार्फत मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मतदान केंद्रावर मतदारांसाठी आणि तेथील उपस्थित कर्मचाऱ्यांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मतदारसंघातील काही मतदान केंद्रे ही मुंबईची ओळख असणाऱ्या गोष्टींची थीम घेऊन सजविण्यात आले आहे. मतदानाचा आकडा वाढावा, म्हणून प्रयत्न करण्यात येत आहे.

**- महेंद्र किरवले,** निवडणूक निर्णय अधिकारी, कुलाबा.

# चांदिवलीत सर्वाधिक, वडाळ्यात सर्वांत कमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर आता निवडणूक यंत्रणा जोमात कामाला लागली आहे. मतदारांची नावनोंदणी आता अंतिम टप्प्यात आली असून, शहरातील ३६ मतदारसंघांसाठी विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये ६५३ मतदान केंद्रांची स्थापना केली जाणार आहे. उत्तुंग इमारतींमध्ये निवडणूक आयोग १५६ केंद्रांची उभारणी करणार आहे. मतदारयाद्यांवर नजर टाकली असता चांदिवलीत सर्वाधिक, तर वडाळ्यात सर्वांत कमी मतदार असल्याचे निदर्शनास येते. मतदारसंघनिहाय मतदारांची संख्या आणि त्यात गेल्या निवडणुकीपासून झालेला बदल पुढीलप्रमाणे...

**महिला मतदार**

मुंबई शहर ११,७०,०००

उपनगरे ३५,६०,०००



**पुरुष मतदार**

मुंबई शहर १३,६०,०००

उपनगरे ४०,८०,०००

| मतदारसंघ | २०१९ | २०२४ | बदल (% मध्ये) |
|---|---|---|---|
| बोरिवली | २,९१,७४८ | ३,२३,६९५ | १०.९५ |
| दहीसर | २,५०,६१७ | २,७६,२९८ | १०.२५ |
| मागाठाणे | २,६८,२९४ | ३,०२,१३० | १२.६१ |
| कांदिवली | २,६५,२२५ | २,८५,०८३ | ७.४९ |
| चारकोप | २,८२,७७८ | ३,१४,२२२ | ११.१२ |
| मालाड पश्चिम | २,८८,३४६ | ३,५२,७६१ | २२.३४ |
| जोगेश्वरी | २,७९,६६३ | २,९५,८२१ | ५.७८ |
| दिंडोशी | २,७८,७८१ | ३,०२,६०८ | ८.५५ |
| गोरेगाव | ३,२३,८११ | ३,२४,३७६ | ०.१७ |
| वर्सोवा | २,७७,५१० | २,८२,८१९ | १.९१ |
| अंधेरी पश्चिम | ३,०१,२३५ | २,८५,२२१ | -५.३२ |
| अंधेरी पूर्व | २,७१,२४५ | २,८४,७०८ | ४.९६ |
| मुलुंड | २,८३,९६१ | २,९४,४२३ | ३.६८ |
| विक्रोळी | २,२६,८८५ | २,४१,११४ | ६.२७ |
| भांडूप पश्चिम | २,७९,७४९ | २,८४,२३१ | १.६ |
| घाटकोपर पश्चिम | २,६५,८४३ | २,७३,३४४ | २.८२ |
| घाटकोपर पूर्व | २,३२,५९४ | २,४७,३९० | ६.३६ |
| मानखुर्द शिवाजीनगर | २,९९,५२२ | ३,२३,४२० | ७.९८ |
| अणुशक्तीनगर | २,४७,९५४ | २,६६,५४८ | ७.५ |
| चेंबूर | २,५२,४७६ | २,५७,१६५ | १.८६ |
| विलेपार्ले | २,६०,८९० | २,७४,२५८ | ५.१२ |
| चांदिवली | ३,७०,८६८ | ४,४६,७६७ | २०.४७ |
| कुर्ला | २,७१,६५४ | २,८९,४६८ | ६.५६ |
| कलिना | २,३५,६७४ | २,३९,८६३ | १.७८ |
| वांद्रे पूर्व | २,४५,११७ | २,४७,६३९ | ०.९९ |
| वांद्रे पश्चिम | २,९५,५८६ | २,८७,०२५ | - २.९ |
| धारावी | २,४७,२८३ | २,६०,७४७ | ५.४४ |
| सायन-कोळीवाडा | २,५४,८८१ | २,८१,२९९ | १०.३६ |
| वडाळा | २,०३,२६३ | २,०४,९५ | ०.८१ |
| माहिम | २,३४,४३२ | २,२५,३६७ | - ३.८७ |
| वरळी | २,६७,६२९ | २,६३,६४२ | - १.४९ |
| शिवडी | २,७४,५०३ | २,७३,९५५ | - ०.२ |
| भायखळा | २,४३,४११ | २,५७,८४९ | ५.९ |
| मलबार हिल | २,६०,६६१ | २,६०,५३८ | - ०.०५ |
| मुंबादेवी | २,४२,६०४ | २,४१,२३५ | - ०.५६ |
| कुलाबा | २,६५,२६५ | २,६४,७३९ | - ०.२ |





# अर्ध मॅरेथॉनमध्ये धावले ४,५०० स्पर्धक

## मतदानाबाबत धावपटूंमध्ये जनजागृती, स्वाक्षरी मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आयआयटी मुंबई आणि मुंबई पालिकेच्या सहकार्याने रविवारी पहाटे ५:३० वाजता आयआयटी पवई येथे अर्ध मॅरेथॉन (२१, १० आणि ५ किलोमीटर गटात) उत्साहात पार पडली. त्यात साडेचार हजार स्पर्धक सहभागी झाले.

आयआयटी पवईच्या निसर्गरम्य परिसरात ही मॅरेथॉन पार पडली. 'रन फॉर नेट झीरो', 'पर्यावरणीय शाश्वतता' असे या मॅरेथॉनचे ब्रीदवाक्य होते. या स्पर्धेतून निरोगी आयुष्य कसे जगावे आणि तंदुरुस्त कसे राहावे, असा संदेश देण्यात आला. विविध क्षेत्रांतील अनुभवी आणि नवोदित धावपटूंनीदेखील मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला.

मॅरेथॉनच्या प्रारंभी, विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर मतदान करण्यासंदर्भात 'स्वीप' उपक्रम अंतर्गत जनजागृती करण्यासाठी पालिकेचे परिमंडळ ३ चे उपायुक्त विश्वास मोटे यांनी शपथ दिली. यावेळी मतदान जनजागृतीसाठी स्वाक्षरी मोहीमही राबविण्यात आली.




आयआयटी मुंबई अर्ध मॅरेथॉनवेळी मतदानाबाबत जागृती करण्यात आली.

### स्वच्छ मुंबई, पर्यावरणविषयक जनजागृती

- मॅरेथॉन स्पर्धेमध्ये मुंबई महानगर स्वच्छ, सुंदर कसे ठेवण्याबाबतही जनजागृती करण्यात आली.
- मुंबईचा सभोवताल अधिकाधिक हरित ठेवण्यासाठी वृक्ष लागवडीवर भर देण्यासंदर्भात धावपटू आणि मुंबईकरांना माहिती देण्यात आली.
- या स्पर्धेत विद्यार्थ्यांसह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी सहभाग घेतला.
- विजेत्या धावपटूंचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रत्येक सहभागी धावपटूंना प्रमाणपत्र देण्यात आले.
- पालिकेच्या 'एस' विभागाचे सहायक आयुक्त भास्कर कसगीकर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत

# मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

## राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची जाणून घेतली मते

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील मिळून ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान प्रक्रिया संयंत्रांची पहिल्या टप्प्यातील सरमिसळ प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या उपस्थितीत पालिका मुख्यालयात रविवारी सकाळी पार पडली.

विधानसभा निवडणुकीसाठी आयोगाच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासनाकडून सर्व तयारी सुरू आहे. त्याच भाग म्हणून मतदान प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया महत्त्वाची असल्याने यावेळी विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. यावेळी त्यांची मतेही जाणून घेण्यात आली.

सरमिसळ करण्यात आलेल्या या यंत्रांची मतदारसंघनिहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना ही संपूर्ण प्रक्रिया पाहता येणार आहे. आपल्याच मतदारसंघासाठी वितरित करण्यात आलेले यंत्र संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी उपलब्ध झाले आहे, याची खातरजमा पक्षांच्या प्रतिनिधींना या प्रक्रियेच्या माध्यमातून करता करता येईल.



**मुंबई पालिका मुख्यालयात रविवारी जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांच्या उपस्थितीत मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया पार पडली.**

### अशी होते सरमिसळ प्रक्रिया

- केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जिल्हानिहाय विधानसभा मतदारसंघांची निवड करण्यात येते. या प्रक्रियेत दोन टप्प्यांत संयंत्रांची सरमिसळ करण्यात येते.
- **प्रत्येक संयंत्राला विशिष्ट असा क्रमांक (युनिक आयडी) दिला आहे. सरमिसळ प्रक्रियेनंतर कोणत्या विधानसभा मतदारसंघासाठी कोणते संयंत्र वितरित करण्यात येणार आहे, या साठीची यादी तयार होते.**
- राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही यादी तयार करण्यात येते. तसेच जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने यादीचे प्रमाणीकरण करण्यात येते.
- **राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आपल्या विधानसभा क्षेत्रात वितरित करण्यात येणारे संयंत्र प्रत्यक्षात वितरित करण्यात आल्याची खातरजमा करणे या प्रक्रियेमुळे शक्य होते.**

लोकमत










## यंत्रणा सज्ज, लावा आता बोटाला शाई...

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज, सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करण्यासाठी मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्ह्यातील विविध मतदान केंद्रांवर विविध संकल्पनेच्या आधारावर मतदान केंद्रे तयार करण्यातआली. मतदानाचे संदेश देणारे फलक, अनोख्या रंगसंगतीने ही मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. शहरातील काही ऐतिहासिक वास्तू आणि वैशिष्ट्यांचा खुबीने वापर करण्यात आला आहे.

लोकमत

८५ वयापेक्षा अधिक ज्येष्ठ, दिव्यांगांना दिलासा

# मुंबईत ३,५३३ मतदारांनी घरातूनच बजावला हक्क

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी मुंबई महापालिका, शहर आणि उपनगर जिल्हाधिकारी कार्यालये विविध उपाययोजना राबवित आहेत. विविध ठिकाणी जनजागृती मोहिमेद्वारे नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. त्याचबरोबर ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारांना गृहमतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबईच्या उपनगरात ४ हजार ३४९ मतदारांनी गृहमतदानासाठी अर्ज भरला होता. त्यापैकी आतापर्यंत ३ हजार ५३३ मतदारांनी घरातून मतदानाचा हक्क बजाविला आहे.

निवडणुकीसाठी मुंबई शहर जिल्हा प्रशासनाची सर्व तयारी पूर्ण झाली असून प्रशासन सज्ज आहे. लोकशाहीच्या या उत्सवात सर्व मतदारांनी सहभागी होऊन मतदानाचा हक्क आवर्जून बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

मतदान केंद्रांवर मतदारांसाठी पिण्याचे पाणी, मंडप, प्रसाधनगृह, दिव्यांगांसाठी मार्गिका, स्वयंसेवक, व्हिलचेअर, विद्युतपुरवठा आदी सुविधा आहेत. व्होटर स्लिपचे वाटप मतदारांना करण्यात येत आहे.



## मतदारसंघनिहाय झालेले गृहमतदान

| | | | |
|---|---|---|---|
| बोरीवली | १५० | अंधेरी पश्चिम | २७६ |
| दहिसर | ११३ | अंधेरी पूर्व | २०५ |
| मागाठाणे | ६३ | विलेपार्ले | ३६७ |
| मुलुंड | २३६ | चांदिवली | ८८ |
| विक्रोळी | १०५ | घाटकोपर पश्चिम | ९० |
| भांडुप पश्चिम | ४८ | घाटकोपर पूर्व | ३६ |
| जोगेश्वरी पूर्व | १२२ | मानखुर्द | १७ |
| दिंडोशी | ८५ | चेंबूर | ६९ |
| कांदिवली | १६० | कुर्ला | १३० |
| मालाड पश्चिम | १३६ | कलिना | ५५ |
| गोरेगाव | ३२४ | वांद्रे पूर्व | ४१ |
| वर्सोवा | १४५ | वांद्रे पश्चिम | ४७२ |

लोकमत

# मरोळमध्ये महिलांसाठी गुलाबी रंगाचे मतदान केंद्र



लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणूक आयोग आणि मुंबई महापालिका प्रशासनाकडून वेगवेगळ्या ठिकाणी महिलांसाठी खास आकर्षित देखावा करण्यात आला आहे. त्यानुसार अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात येथील मरोळ परिसरातील प्राईम अकॅडमी शाळेत खास महिलांसाठी गुलाबी रंगाचे मतदान केंद्र उभारण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या मतदान केंद्रात सर्व अधिकारी आणि कर्मचारी या महिला असणार असल्याची माहिती येथील क्षेत्रीय अधिकारी सोनाली उजागरे यांनी दिली.

सकाळ



**मालाड :** पालिकेचे कर्मचारी पोस्टरच्या माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती करत आहेत.

# मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी पालिकेकडून जनजागृती अभियान

मालाड (बातमीदार) : विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या असताना पालिकेचे कर्मचारी विभागात जाऊन पोस्टर्सच्या माध्यमातून मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी जनजागृती करत आहेत. पालिकेच्या पी उत्तर विभागाच्या सफाई कामगारांनी मालाड (पू) शांताराम तलाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात येणाऱ्या नागरिकांना पोस्टर्सच्या माध्यमातून मतदान करण्याचे आवाहन केले. नागरिकांनीही त्यांना उत्तम प्रतिसाद दिला. या वेळी पालिकेचे जे. ओ. रवी परमार, मुकादम तरुण गोहिल व इतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# संवेदनशील मतदारसंघांवर प्रशासनाची करडी नजर

## भूषण गगराणी यांनी दिले निर्देश

सकाळ वृत्तसेवा



भूषण गगराणी

मुंबई, ता. २२ : आर्थिक खर्चाच्या बाबतीत काही मतदारसंघ अत्यंत संवेदनशील आहेत. त्या ठिकाणी निवडणुकीच्या काळात पैशांचा व्यवहार होणार नाही तसेच अशा मतदारसंघांमध्ये होणारी पैशांची देवाणघेवाण, मद्यविक्री व तस्करी, सोने-चांदीची विक्री किंवा अन्य कोणत्याही संशयास्पद वित्तीय बाबींवर अधिक बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी आज येथे दिले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबईतील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित विविध तपास याबाबत अंमलबजावणी यंत्रणांची पालिका मुख्यालयात मंगळवारी (ता. २२) बैठक पार पडली. यावेळी आयुक्त भूषण गगराणी बोलत होते. या बैठकीला संबंधित सर्व विभागांतील अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयुक्तांनी

### हालचालींवर लक्ष

संबंधित यंत्रणांनी संयुक्त पथकांची निर्मिती करून मुंबईतील 'चेक पोस्ट'वर नियुक्ती करावी. समन्वयक अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील माहितीची नियमितपणे देवाणघेवाण करावी, जेणेकरून समन्वयाने कारवाई करता येईल. मुंबईच्या सीमेवर, बंदरांवर, समुद्र किनाऱ्यांवर, विमानतळ तसेच वाहतुकीच्या अन्य संसाधनाद्वारे केल्या जाणाऱ्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून संशयास्पद प्रकरणांमध्ये तत्काळ कारवाई करावी. मद्य विक्री करणाऱ्या दुकानांबाबत दक्ष राहावे तसेच त्याठिकाणी काही गैरव्यवहार आढळून आल्यास त्यावर तत्काळ कारवाईचे आदेश भूषण गगराणी यांनी दिले.

मुंबईत कार्यरत असलेल्या यंत्रणांनी अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. सर्व यंत्रणांचे आपापसांमध्ये योग्य समन्वय राखावा, यासाठी प्रत्येक यंत्रणेने समन्वयक अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्यविक्री व तस्करी,

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबईतील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित विविध तपास याबाबत अंमलबजावणी यंत्रणांची पालिका मुख्यालयात मंगळवारी (ता. २२) बैठक पार पडली. यावेळी आयुक्त भूषण गगराणी बोलत होते. या बैठकीला संबंधित सर्व विभागांतील अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयुक्तांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले नियोजन तसेच सुरू असलेल्या कार्यवाहींचा आढावा घेतला. ते म्हणाले, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आलेल्या काही अनुभवांच्या आधारे, केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग मुंबईतील निवडणुकीशी संबंधित बारीकसारीक बाबींवर विशेष लक्ष ठेवून आहे. त्यामुळे

कारवाईचे आदेश भूषण गगराणी यांनी दिले.

मुंबईत कार्यरत असलेल्या यंत्रणांनी अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. सर्व यंत्रणांचे आपापसांमध्ये योग्य समन्वय राखावा, यासाठी प्रत्येक यंत्रणेने समन्वयक अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्यविक्री व तस्करी, सोने-चांदीची विक्री आणि तस्करी तसेच हवालांशी संबंधित घडामोडींवर अधिक बारकाईने आणि गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक यंत्रणेने अधिक सक्रिय होऊन अशा संशयास्पद प्रकरणांत कारवाई करण्यात कोणतीही कसूर ठेवू नये. प्रसंगी जप्तीची कारवाई करावी, असे निर्देशही गगराणी यांनी दिले.

### नॉन शेड्यूल्ड फ्लाईट्सची माहिती देण्याचे आदेश

मुंबईतील विविध ठिकाणांहून जाणाऱ्या 'नॉन शेड्यूल्ड फ्लाईट्स' संदर्भातील माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणाने मुंबई पोलिस तसेच आयकर विभागाला नियमितपणे द्यावी. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करावे, अशा सूचनाही महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी यावेळी केल्या.

सकाळ

# धावपटूंची मतदान जनजागृतीची शपथ

## मुंबई हाफ मॅरेथॉन स्पर्धेला मुंबईकरांचा भरघोस प्रतिसाद

मुंबई, ता. २७: फिटीझन इंडिया, आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया प्रायोजक मुंबई हाफ मॅरेथॉन स्पर्धा (२१, १०, ५ किलोमीटर) पालिकेच्या सहकार्याने आज (ता. २७) पहाटे ५.३० वाजता आयआयटी पवई येथे पार पडली. या मॅरेथॉन स्पर्धेत चार हजार पाचशे स्पर्धकांनी सहभाग घेतला.

'रन फॉर नेट झीरो, पर्यावरणीय शाश्वतता' असे स्पर्धेचे ब्रीदवाक्य होते. आयआयटी पवईच्या निसर्गरम्य परिसरात ही मॅरेथॉन पार पडली. विविध क्षेत्रातील अनुभवी आणि नवोदित धावपटूंनीदेखील मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला. या स्पर्धेतून निरोगी आयुष्य कसे जगावे आणि तंदुरुस्त कसे रहावे, असा संदेश देण्यात आला.

**मतदान जनजागृती**

मॅरेथॉनच्या सुरुवातीला, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ पार्श्वभूमीवर मतदान करण्यासंदर्भात 'स्वीप' उपक्रम अंतर्गत जनजागृती करण्यासाठी पालिकेचे उपायुक्त (परिमंडळ ३) विश्वास मोटे यांनी शपथ दिली, तसेच मतदान जनजागृतीसाठी स्वाक्षरी मोहीमदेखील या ठिकाणी राबविण्यात आली.

**स्वच्छता आणि पर्यावरण जनजागृती**

मॅरेथॉन स्पर्धेमध्ये मतदान जनजागृतीसह मुंबई महानगर स्वच्छ, सुंदर कसे ठेवण्याबाबतही जनजागृती करण्यात आली. मुंबईचा सभोवताल अधिकाधिक हरित ठेवण्यासाठी वृक्ष लागवडीवर भर देण्यासंदर्भातही धावपटू आणि मुंबईकरांना माहिती देण्यात आली.



मुंबई : पवई येथे पार पडलेल्या हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी झालेले स्पर्धक.

सकाळ

# पालिकेकडून 'विधानसभे'च्या पूर्वतयारीला सुरुवात

## निवडणूक अधिकाऱ्यांकडून आढावा

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १३ : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यांमध्ये विविध यंत्रणांनी केलेल्या पूर्वतयारीचा जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पालिका मुख्यालयात आज आयोजित बैठकीत आढावा घेतला. मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकापर्यंत आपली यंत्रणा पोहोचवावी. मतदार यादीमध्ये मतदारांची नावनोंदणी करणे इत्यादी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी. कोणत्याही अडचणीला गांभीर्याने घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देशही गगराणी यांनी या बैठकीत संबंधित यंत्रणांना दिले.

अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर, सहपोलिस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी आदी या बैठकीला उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांची स्थिती, आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदार याद्यांची स्थिती आणि नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे, मतदान संयंत्रे ठेवण्यासाठी स्ट्राँग रूम, संवेदनशील मतदान केंद्रांची यादी, पोलिस आणि निवडणूक यंत्रणा यांच्याकडून विविध मतदारसंघांमध्ये संयुक्त पाहणी आदींबाबत अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर आणि विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी आढावा सादर केला.

> मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी गृहनिर्माण संस्थांशी पुन्हा एकदा भेटी देऊन समन्वय साधावा. काही अडचणी उद्भवल्यास वरिष्ठांशी वेळोवेळी चर्चा करावी. अधिकाऱ्यांनी निवडणुकीसंदर्भातील संपूर्ण तयारी अत्यंत चोखपणे आणि जबाबदारीने पार पाडावी.
>
> - **भूषण गगराणी**, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पालिका आयुक्त

सकाळ

# मतदारांसाठी चोख व्यवस्था!

## लोकसभा निवडणुकीतील गोंधळानंतर निवडणूक आयोगाची खबरदारी

**वेध विधानसभा निवडणुकीचे**

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १६ : विधानसभा निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता जाहीर झाली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक पारदर्शक व निर्भर वातावरणात पार पाडण्यासाठी अंमलबजावणी सुरू झाली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या दिवशी मुंबईतील काही मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा नसल्याने झालेल्या गोंधळाची दखल घेत यावेळी निवडणूक आयोगाने खबरदारी घेतली आहे.

मतदारांना ताटकळत उभे राहावे लागणार नाही, याची काळजी घेतली जाणार आहे. मतदारांना सर्व आवश्यक सोयी, सुविधा उपलब्ध केल्या जातील. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या अंमलबजावणीत राजकीय पक्षांसह सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई जिल्हा (शहर व उपनगर) निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी केले आहे.

निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेतल्यानंतर मुंबई जिल्हा (शहर व उपनगर) निवडणूक अधिकारी गगराणी यांनी आज (ता. १६) पत्रकार परिषदेत घेऊन माहिती दिली. मतदान केंद्राबाबत माहिती देताना ते म्हणाले, की, सर्व मतदान केंद्रांवर चोख बंदोबस्त तसेच आवश्यक सुविधा पुरवल्या जाणार आहेत. मतदारांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.

एका मतदान केंद्राच्या ठिकाणी दहापेक्षा जास्त केंद्रे असल्यास ते जवळच्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुसूत्रीकरणानंतर मतदान केंद्रांमध्ये झालेल्या बदलाबाबत मतदारांना प्रसारमाध्यम, समाजमाध्यमांद्वारे माहिती देण्यात आली आहे. यासोबत मतदान केंद्रांची माहिती असलेल्या 'क्यूआर कोड'सह संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांची स्वाक्षरी असलेले पत्र प्रत्येक मतदारांच्या घरी जावून देण्यात येणार असल्याचे गगराणी यांनी सांगितले.

मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, रांगांमध्ये आसन व्यवस्था, तसेच गर्दी झाल्यास मतदारांसाठी प्रतीक्षा कक्ष आदी किमान सुविधा पुरविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गगराणी म्हणाले की, लोकसभा निवडणूक २०२४ नंतर सर्वत्र मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. या प्रक्रियेनंतर ज्या-ज्या ठिकाणी मतदान केंद्रांमध्ये वाढ आणि बदल झाले आहेत त्या सर्व ठिकाणी केंद्रस्तरीय अधिकारी हे प्रत्येक कुटुंब आणि मतदार यांच्यापर्यंत पोहोचून माहिती लेखी स्वरूपात पोचवत आहेत. त्यासाठी 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' ही मोहीम व्यापक स्तरावर राबवली जात आहे. राजकीय पक्षांनीदेखील बदललेल्या मतदान केंद्राबाबत माहिती मतदारांपर्यंत पोहोचवून सहकार्य करावे, असे आवाहन गगराणी यांनी केले. आचारसंहिता लागू झाल्यापासून राजकीय जाहिरात फलकांवर कारवाई सुरू झाली आहे. राजकीय पक्षाच्या जाहिराती लावण्यासाठी केवळ विशिष्ट ठिकाणीच परवानगी दिली जाईल. त्या व्यतिरिक्त सगळे जाहिरात फलक काढून टाकले जात आहेत, अशी माहिती गगराणी यांनी दिली.



### १९ ऑक्टोबरपर्यंत नावनोंदणी

प्रत्येक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. यंदाही निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार वेगवेगळ्या उपाययोजना आणि जनजागृतीदेखील करण्यात येत आहे. निवडणुकीसाठी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या दहा दिवस अगोदरपर्यंत सहा क्रमांकाचा अर्ज करून मतदार नोंदणी करता येते. या नियमानुसार, यंदा १९ ऑक्टोबरच्या रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणीचे अर्ज स्वीकारले जातील. तसेच नाव कमी करणे, नावात दुरुस्ती करणे याबाबतही समान प्रक्रिया आणि मुदत आहे, अशी माहिती गगराणी यांनी दिली. ऑनलाइन मतदार नोंदणी करण्यासाठी https://voters.eci.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. वोटर हेल्पलाइन ॲपवर आपले नाव मतदारयादीत मतदारांना तपासता येईल. तसेच नवीन मतदार नोंदणी या ॲपद्वारे करता येईल.

#### शहरातील मतदार

- महिला- ११ लाख ७१ हजार ८०८
- पुरुष- १३ लाख ६२ हजार २२४
- तृतीयपंथी- २४४
- ज्येष्ठ नागरिक (८५+)- ५४ हजार ६३
- नवमतदार संख्या (१८-१९ वर्ष)- ३७ हजार ८९४
- दिव्यांग मतदार- ६ हजार ३३४
- सर्व्हिस वोटर-३९२
- अनिवासी भारतीय मतदार- ४०६
- मतदारांची एकूण संख्या - २५ लाख ३४ हजार २७६

#### उपनगरातील मतदार

- महिला- ३५ लाख ६१ हजार ५८७
- पुरुष- ४० लाख ८५ हजार ५५०
- तृतीयपंथी- ८३१
- ज्येष्ठ नागरिक- ९३ हजार ४४८
- नवमतदार- १ लाख २२ हजार ९१९
- दिव्यांग मतदार- १७ हजार २०९
- सर्व्हिस वोटर- १०८९
- अनिवासी भारतीय मतदार- १८६७
- एकूण मतदारांची संख्या - ७६ लाख ४७ हजार ९६७

#### राजकीय पक्षांना आवाहन

मतदान वाढण्यासाठी प्रशासनाला राजकीय पक्षांनीही सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी केले. मतदानाचे प्रमाण वाढावे, अधिकाधिक नागरिकांनी मतदार करावे, यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा विशेष प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक आहे. मतदान वाढण्यासाठी राजकीय पक्षांनी देखील आपापल्या स्तरावर सहकार्य करावे, तसेच आदर्श आचारसंहिता व निवडणूक प्रक्रिया अंमलबजावणीत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले.

## ठाणे जिल्ह्यात मतदार वाढले!

### ६८ लाखांवर पोहोचली मतदारसंख्या

ठाणे, ता. १६ : लोकसभा निवडणुकीच्यावेळी राबविलेल्या निरंतर मतदार नोंदणी कार्यक्रमांतर्गत मतदारांच्या संख्येत वाढ होऊन जिल्ह्यातील मतदारांची संख्या ६८ लाख एक हजार २४४ वर पोहोचली. त्यानंतरदेखील आयोगाच्या सूचनेनुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला होता. या कार्यक्रमांतर्गत मतदारांनी मतदान नोंदणीकडे भर दिल्याने तीन लाख ५४ हजार ४८४ नवीन मतदारांची वाढ झाल्याचे दिसून येत आहे, तर दुसरीकडे लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रांबाहेर लागलेल्या मतदारांच्या रांगा लक्षात घेत मतदान केंद्र वाढविण्याचा निर्णय घेत विधानसभा निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्येत साडेतीनशेहून अधिक वाढ झाली आहे. मतदान प्रक्रियेला गती देण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली.



ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांतील निवडणूक तयारीची माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी बुधवारी (ता. १६) पत्रकार परिषदेत दिली.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांत ७१ लाख ५५ हजार ७२८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये ३८ लाख १३ हजार २६४ पुरुष, ३३ लाख ४१ हजार ७० महिला, १३९४ इतर मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ वयोगटातील मतदारांची संख्या एक लाख ६५ हजार ५९७ इतकी आहे. अपंग मतदारांची संख्या ३७ हजार ८५४ इतकी, तर ८५ पेक्षा जास्त वयोगटातील मतदारांची संख्या ५७ हजार २०९ इतकी आहे. ओवळा-माजिवडा मतदारसंघात सर्वाधिक पाच लाख ४० हजार २९३ मतदार आहेत, तर उल्हासनगर मतदारसंघात सर्वात कमी दोन लाख ८० हजार ८५२ इतके मतदार आहेत, अशी माहिती शिनगारे यांनी दिली.

सकाळ

# मुंबईत विधानसभा निवडणुकीची तयारी

## अतिरिक्त निवडणूक अधिकारी नियुक्त

मुंबई, ता. १७ : येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मान्यतेने महापालिका क्षेत्रातील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी सहा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य सरकारचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आदेश नुकतेच जारी केले आहेत.

पालिकेच्या अखत्यारीतील संपूर्ण क्षेत्र लक्षात घेतले तर ते मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा या दोन महसूल क्षेत्रात मोडते. मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा हे दोन जिल्हे मिळून म्हणजेच महापालिका क्षेत्रात एकूण ३६ विधानसभा मतदारसंघ आहेत. येत्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासकीय कामकाजाला वेग आला असताना भारतीय निवडणूक आयोगाने महापालिका क्षेत्रासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून महापालिका आयुक्त यांच्याकडे जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या मदतीला एकूण सहा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. यात महापालिकेतील चार अतिरिक्त महापालिका आयुक्त तसेच मुंबई शहर जिल्हाधिकारी व मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी अशा सहा जणांचा समावेश आहे. यासंदर्भातील आदेश महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने निर्गमित करण्यात आले आहेत. निवडणूकविषयक कामकाज सुनियोजित आणि सुलभ व्हावे, तसेच सर्व यंत्रणांत समन्वय राहावे, यादृष्टीने या सहा अधिकाऱ्यांकडे लोकसभा मतदारसंघनिहाय जबाबदारी देण्यात आली आहे.

### कोणावर जबाबदारी?

- **दक्षिण :** जिल्हाधिकारी संजय यादव
- **दक्षिण-मध्य :** अतिरिक्त पालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी
- **उत्तर पूर्व :** अतिरिक्त पालिका आयुक्त डॉ. अमित सैनी
- **उत्तर मध्य/उत्तर पश्चिम मुंबई :** जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर
- **उत्तर :** अतिरिक्त पालिका आयुक्त अभिजीत बांगर

सकाळ

# सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

मुंबई, ता. २० : विधानसभा निवडणुकीसाठी मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी मिळून ३६ विधानसभा मतदारसंघासाठी मतदान प्रक्रिया संयंत्रांची पहिल्या टप्प्यातील सरमिसळ प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या उपस्थितीत महानगरपालिका मुख्यालयात आज (ता. २०) पार पडली. मतदान प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची आहे.

पहिल्या टप्प्यातील सरमिसळ प्रक्रिया पार पाडत असताना या वेळी विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि सर्व संबंधित अधिकारीदेखील हजर होते. सरमिसळ प्रक्रियेवेळी सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची मतेदेखील जाणून घेण्यात आली, तसेच समाधानकारकरीत्या संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली. सरमिसळ केलेल्या या संयंत्रांची विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.



## कशी असते प्रक्रिया?

भारत निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जिल्हानिहाय विधानसभा मतदारसंघांची निवड करण्यात येते. या प्रक्रियेत दोन टप्प्यात संयंत्रांची सरमिसळ करण्यात येते. प्रत्येक संयंत्राला विशिष्ट असा क्रमांक (युनिक आयडी) उपलब्ध करून देण्यात आला आहे. सरमिसळ प्रक्रियेनंतर कोणत्या विधानसभा मतदारसंघासाठी कोणते संयंत्र वितरित करण्यात येणार आहे, यासाठीची यादी तयार होते. ही यादी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तयार करण्यात येते.

सकाळ

### मुंबईत १२, उपनगरांत २६ ठिकाणी सुविधा

# महिला अधिकाऱ्यांवर 'सखी' मतदान केंद्रांची जबाबदारी

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १९: लोकशाहीच्या उत्सवासाठी अर्थातच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे. यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानासाठी दोन लाख २१ हजार ६० बॅलेट युनिटचा वापर केला जाणार आहे. दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगाने 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्याचे आदेश दिले असून त्यानुसार, मुंबई शहरात एकूण १२ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत, तर मुंबई उपनगरात २६ महिला नियंत्रित मतदान केंद्रे असणार आहेत.

महिला नियंत्रित मतदान केंद्रांमध्ये तैनात असलेल्या पोलिसांपासून ते निवडणूक कार्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह सर्वजण महिला असतील. लैंगिक समानता आणि मतदान प्रक्रियेत महिलांच्या अधिक रचनात्मक सहभागासंबंधातील वचनबद्धतेचा भाग म्हणून विधानसभा निवडणुकीसाठी महिला नियंत्रित महिला मतदान केंद्रे असणार आहेत.



मुंबई : निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सखी महिला केंद्र उभारले आहेत.

वडाळा येथील वीर जिजामाता तंत्रज्ञान संस्था येथे असलेल्या ३१ व्या मतदान केंद्राचे रूपांतर सखी मतदान केंद्रात करण्यात आले आहे. या मतदान केंद्रातील सर्व मतदान प्रक्रियेची धुरा महिला सांभाळणार आहेत. या मतदान केंद्राला विशेषतः गुलाबी रंगाने सजवण्यात आले असून मतदारांना आपले मतदान केंद्र सहज सापडण्यास मदत होणार आहे.

सखी मतदान केंद्रावर एकूण पाच महिला अधिकारी आणि एक महिला पोलिस शिपाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासह दोन राखीव महिला देण्यात आल्या आहेत. ज्यामुळे मतदारांची गर्दी, त्यांना पाण्याची, बसण्याची सोय करण्यापासूनची सर्व जबाबदारी या महिलांची असेल. विशेष म्हणजे येणाऱ्या पहिल्या १० ते १२ मतदारांचे पुष्प देऊन स्वागत केले जाणार आहे. सखी मतदान केंद्रावर ५७७ स्त्री मतदार आहेत, तर ५६१ पुरुष मतदार असून, दिवसभरात एकूण ११३८ मतदार मतदान करतील.

१८० विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली चव्हाण यांनी सांगितले की, १८० विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रक्रियेसाठी १५०० कर्मचारी कार्यरत आहेत. गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. नवीन मतदारयादी तयार करण्याचे काम कायम सुरू असते, पण लोकसभा निवडणुकीनंतर मतदान केंद्रांची पुनर्रचना केली गेली. त्यात एकसूत्रीपणा आणला आहे. येणाऱ्या प्रत्येक मतदाराला ओळखपत्र वाटण्यात आले आहे, शिवाय मतदान केंद्रावर पाण्याची, आसन व्यवस्था, प्रतीक्षालय, स्वच्छतागृह, वैद्यकीय मदत कक्ष, पाळणाघराची सोय करण्यात आली आहे, शिवाय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून नेमण्यात आले आहे, जे ज्येष्ठ नागरिकांना मदत करतील.

## हरित मतदान केंद्र

वडाळा बस स्टॉप येथे हरित मतदान केंद्र तयार केले आहे. इथे येणाऱ्या पहिल्या मतदारांना छोटी रोपटी दिली जाणार आहेत. यासह आजूबाजूचा परिसरही हिरवागार सजवण्यात आला आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट इथल्या सखी मतदान केंद्रालाही विशेष गुलाबी रंगाने सजवण्यात आले आहे. ११४ मतदान केंद्रांत महिलांचे मोठे बॅनर्स, पोस्टर्स ठेवण्यात आले आहेत. यासह महिलांसाठी मतदानासंबंधी विशेष संदेश लिहिण्यात आला आहे.

**सामना**

# मतदानासाठी सुट्टी देणे सर्व आस्थापनांसाठी बंधनकारक

निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावण्यासाठी बृहन्मुंबई क्षेत्रातील सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांमध्ये कार्यरत असलेले कामगार, कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना २० नोव्हेंबर रोजी सुट्टी देणे संबंधित संस्थांसाठी बंधनकारक राहील. या नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांविरोधात कारवाई केली जाईल, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले. मतदानाच्या या सुट्टीच्या बदल्यात संबंधित व्यक्तीच्या वेतनात कोणत्याही प्रकारची कपात करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास त्यांना किमान चार तासांची सवलत देता येईल, परंतु यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. सुट्टी किंवा सवलत प्राप्त न झाल्याने एखाद्या व्यक्तीला मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित राहावे लागल्यास संबंधितांविरोधात कारवाई करण्यात येईल, असे निर्देशही गगराणी यांनी दिले आहेत.

# मतदारांना मूलभूत सुविधा देण्यात दिरंगाई नको

**कंत्राटदारांना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे निर्देश**

**परीक्षणासाठी पाच सदस्यीय पथक**

मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी) - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर किमान सुविधा योग्यप्रकारे पुरविल्या जाव्यात. मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह यासारख्या मूलभूत सोयीसुविधा देण्यात कोणतीही दिरंगाई करू नका, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी संबंधित कंत्राटदारांना दिले आहेत. तसेच मतदान केंद्रांवरील सोयीसुविधांची पूर्तता, गुणवत्ता आदींचे परीक्षण करण्यासाठी पाचसदस्यीय पथक कार्यरत राहील, अशी माहितीही त्यांनी दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा क्षेत्रातील विविध मतदान केंद्रांवर सोयीसुविधा पुरविणाऱ्या कंत्राटादारांची बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात गुरुवारी बैठक घेण्यात आली. त्यावेळी गगराणी बोलत होते. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा, डॉ. अश्विनी जोशी, डॉ. अमित सैनी, अभिजित बांगर, विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, सर्व परिमंडळांचे उपआयुक्त आणि संबंधित अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीवेळी काही मतदान केंद्रांवर मूलभूत सोयीसुविधांबाबत मतदारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची भारत निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घेतली आहे. प्रत्येक मतदान केंद्रांवर निश्चित किमान सुविधा पुरविण्याचे निर्देश दिले आहेत. या उत्तम गुणवत्तेच्या किमान सुविधा योग्यप्रकारे पुरविण्याची जबाबदारी संबंधित नियुक्त कंत्राटदारांचीही आहे. निवडणूक हे राष्ट्रीय कर्तव्य असल्यामुळे कंत्राटदारांनी केवळ व्यावसायिक विचार न करता या राष्ट्रीय कार्यात आपले उत्कृष्ट योगदान द्यावे, असे आवाहनही गगराणी यांनी यावेळी केले.

### *उपायुक्त, अभियंत्यांवर जबाबदारी*

*निवडणूक यंत्रणा आणि सुविधा देणारे कंत्राटदार यांच्यात योग्य समन्वय राहावा यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेच्या अधिकाऱ्यांसोबतच महानगरपालिकेचे सर्व परिमंडळीय उपायुक्त यांचे सहकार्य राहील. मतदान केंद्रांवर सर्व सुविधा तयार असल्याची खात्री उपायुक्त करतील. तसेच मतदान केंद्रांवर पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची पूर्तता आणि गुणवत्ता तपासण्यासाठी ३६ विधानसभा मतदारसंघांमध्ये महानगरपालिकेच्या २६ प्रशासकीय विभागांतील (वॉर्ड) यांत्रिकी, विद्युत, स्थापत्य, घनकचरा व्यवस्थापन, परिरक्षण आदींशी संबंधित वरिष्ठ स्तरावरील पाच अभियंत्यांचा समावेश असलेले पथक नेमण्यात आले आहे.*

सामना

# मुंबईत विधानसभा निवडणुकीची लगबग



## प्रशासकीय यंत्रणा लागल्या कामाला ▪ आयुक्तांनी घेतला तयारीचा आढावा

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) – महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तारखांकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. मुंबई शहर आणि उपनगरात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली असून प्रशासकीय यंत्रणा कामाला लागल्या आहेत. जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पालिका मुख्यालयात आयोजित बैठकीत निवडणूकपूर्व तयारीचा आढावा घेतला.

पालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांची स्थिती, आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदार याद्यांची स्थिती आणि नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे, मतदान संयंत्र ठेवण्यासाठी स्ट्राँग रूम, संवेदनशील मतदान केंद्रांची यादी, पोलीस आणि निवडणूक यंत्रणा यांच्याकडून विविध मतदारसंघांमध्ये संयुक्त पाहणी याबाबत उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर आणि विशेष कार्य अधिकारी विजय बालमवार यांनी आढावा सादर केला. या वेळी भूषण गगराणी यांनी कोणत्याही अडचणीलाही गांभीर्याने घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश दिले.

निवडणुकीशी संबंधित मुंबईतील सर्वच यंत्रणांकडून उत्तम पद्धतीने काम सुरू आहे. मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकापर्यंत आपली यंत्रणा पोहोचेल, हे सुनिश्चित करावे. मतदार यादीमध्ये मतदारांची नाव नोंदणी करणे इत्यादी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी. नागरिकांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणापासून अगदी जवळ मतदान केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी सुलभ रचनेवर भर देण्यात आला आहे. त्याअनुषंगानेदेखील गृहनिर्माण संस्थांशी पुन्हा एकदा भेटी देऊन समन्वय साधावा, अशा सूचना गगराणी यांनी दिल्या.

सामना

# मतदान केंद्रांवरील सुविधांच्या पाहणीसाठी पथके



## गुणवत्तापूर्ण कामासाठी कंत्राटदारांना पालिका आयुक्तांचे निर्देश

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीत मुंबईत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, आसन व्यवस्था अशा किमान सुविधा योग्य प्रकारे पुरविल्या जातील. या सोयीसुविधांची पूर्तता, गुणवत्ता आदींचे परीक्षण करण्यासाठी पाच सदस्यीय पथक कार्यरत राहील, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी गुरुवारी दिली.

या मूलभूत सोयीसुविधा देण्यात कोणतीही कसर ठेवू नये, असे निर्देश त्यांनी संबंधित कंत्राटदारांना दिले आहेत. मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्ह्यांमध्ये मतदान केंद्रांवर सुविधा पुरविणाऱ्या कंत्राटदारांची बैठक महानगरपालिका मुख्यालयात झाली. त्यावेळी गगराणी यांनी हे निर्देश दिले.

गगराणी यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीवेळी काही मतदान केंद्रांवर मूलभूत सोयीसुविधांबाबत मतदारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची भारत निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घेतली आहे. प्रत्येक मतदान केंद्रांवर निश्चित किमान सुविधा पुरविण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्ह्यांमधील प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, कचरापेटी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हिलचेअर तसेच रॅम्पची व्यवस्था, रांगांमध्ये गर्दी झाल्यास त्याठिकाणी मतदारांना बसण्यासाठी खुर्ची किंवा बाकडे, मोकळ्या ठिकाणी मतदान केंद्र असल्यास मंडपाची उभारणी, पंखे आदी निश्चित किमान सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा कटिबद्ध आहे. या सोयीसुविधांच्या अभावामुळे मुंबईची प्रतिमा डागाळली जाणार नाही, हे सुनिश्चित करण्यात येत आहे.

### उपायुक्त, अभियंत्यांवर जबाबदारी

निवडणूक यंत्रणा आणि सुविधा देणारे कंत्राटदार यांच्यात योग्य समन्वय राहावा, यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेच्या अधिकाऱ्यांसोबतच महानगरपालिकेचे सर्व परिमंडळीय उपायुक्त यांचे सहकार्य राहील. मतदान केंद्रांवर सर्व सुविधा तयार असल्याची खात्री उपायुक्त करतील. तसेच मतदान केंद्रांवर पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची पूर्तता आणि गुणवत्ता तपासण्यासाठी ३६ विधानसभा मतदारसंघांमध्ये महानगरपालिकेच्या २६ प्रशासकीय विभागांतील (वॉर्ड) यांत्रिकी, विद्युत, स्थापत्य, घनकचरा व्यवस्थापन, परिरक्षण आदींशी संबंधित वरिष्ठ स्तरावरील पाच अभियंत्यांचा समावेश असलेले पथक नेमण्यात आले आहे.

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास भूषण गगराणी यांचे मार्गदर्शन

**आपलं महानगर वृत्तसेवा**

**मुंबई ।** मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत सर्वच २६ विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात निवडणूकविषयक प्रशिक्षण कार्यक्रम वेगात सुरु आहेत. १५८-जोगेश्वरी, १६७-विलेपार्ले व १६८ चांदिवली विधानसभा मतदारसंघ क्षेत्र अंतर्गत विभागीय अधिकारी व अन्य अधिकारी यांच्यासाठी निवडणूक कामकाज विषयक व 'ईव्हीएम' संदर्भातील प्रथम प्रशिक्षण मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथे झाले.

१७३- चेंबूर आणि १६७- विलेपार्ले विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील प्रशिक्षण कार्यक्रमात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अतिरिक्त जिल्हाधिकारी मनोज गोहाड हे उपस्थित होते. १६७- विलेपार्ले विधानसभा मतदारसंघ क्षेत्र



अंतर्गत निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास ६७२ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते तर २०६ जण गैरहजर होते अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली आहे. मतदान केंद्र अध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी, व इतर मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण यावेळी झाले.

## गैरहजर कर्मचाऱ्यांना नोटीस

मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत विधानसभा निवडणूक २०२४ साठी जे नियुक्त अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर राहिले त्यांची माहिती संकलित करण्यात येत असून गैरहजर अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरू असल्याचेही क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले आहे.

## नियुक्त अधिकाऱ्यांनी निवडणूक प्रशिक्षणाला हजर राहणे अनिवार्य

मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत विधानसभा निवडणूक २०२४ साठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवडणूकविषयक विविध प्रकारच्या कामकाजासंदर्भातील सर्व प्रशिक्षणांना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.यासंदर्भातील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घ्यावी असे आदेश निवडणूक शाखेमार्फत निर्गमित करण्यात आले आहेत.

# पारदर्शक प्रक्रियेसाठी मतदान यंत्रांची सरमिसळ

## मुंबई महानगरपालिका आयुक्तांसह लोकप्रतिनिधींची उपस्थिती

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग सज्ज झाला आहे. मुंबई शहर व दोन्ही उपनगरांतील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान प्रक्रिया संयंत्रांची पहिल्या टप्प्यातील सरमिसळ प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या उपस्थितीत महानगरपालिका मुख्यालयात रविवारी सकाळी पार पडली. मतदान प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची आहे. यावेळी विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि सर्व संबंधित अधिकारी हजर होते. सरमिसळ प्रक्रियेवेळी सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची मते जाणून घेण्यात आली. त्यानंतर संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली.

सरमिसळ करण्यात आलेल्या या संयंत्रांची विधानसभा मतदारसंघ निहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना ही संपूर्ण प्रक्रिया पाहता येणार आहे. आपल्याच मतदारसंघासाठी वितरित करण्यात आलेले संयंत्र हे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी उपलब्ध झाले आहे, याची खातरजमा राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना या प्रक्रियेच्या माध्यमातून करता येईल. निवडणूक यंत्रणेबद्दल आणि संपूर्ण प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता ठेवतानाच अधिकाधिक विश्वास निर्माण व्हावा, हे सरमिसळ प्रक्रिया राबवण्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.



### अशी राबवली जाते सरमिसळ प्रक्रिया

भारत निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जिल्हानिहाय विधानसभा मतदारसंघांची निवड करण्यात येते. प्रत्येक संयंत्राला विशिष्ट असा क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. सरमिसळ प्रक्रियेनंतर कोणत्या विधानसभा मतदारसंघासाठी कोणते संयंत्र वितरीत करण्यात येणार आहे, यासाठीची यादी तयार होते. ही यादी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तयार करण्यात येते. तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या स्वाक्षरीने यादीचे प्रमाणीकरण करण्यात येते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आपल्या विधानसभा क्षेत्रात वितरीत करण्यात येणारे संयंत्र प्रत्यक्षात वितरित करण्यात आल्याची खातरजमा करणे या प्रक्रियेमुळे शक्य होते.

नव शक्ति Mon, 21 October 2024
https://epaper.freepressjournal.in/c/76082254

पुण्य नगरी

# पारदर्शकतेसाठी मुंबईतील मतदान संयंत्रांची सरमिसळ!

## राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत प्रक्रिया



**मुंबई** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी मिळून एकूण ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान प्रक्रिया संयंत्रांची पहिल्या टप्प्यातील सरमिसळ प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या उपस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात रविवारी सकाळी पार पडली. मतदान प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची आहे. या वेळी विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि सर्व संबंधित अधिकारीही हजर होते. या प्रक्रियेवेळी सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची मते जाणून घेण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

सरमिसळ करण्यात आलेल्या या संयंत्रांची विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना ही संपूर्ण प्रक्रिया पाहता येणार आहे. आपल्याच मतदारसंघासाठी वितरित करण्यात आलेले संयंत्र हे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी उपलब्ध झाले आहेत, याची खातरजमा राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना या प्रक्रियेच्या माध्यमातून करता येईल. निवडणूक यंत्रणेबद्दल आणि संपूर्ण प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता ठेवतानाच अधिकाधिक विश्वास निर्माण व्हावा, हे सरमिसळ प्रक्रिया राबवण्याचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

### मतदानाच्या संयंत्रांची अशी होते सरमिसळ प्रक्रिया

भारत निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जिल्हानिहाय विधानसभा मतदारसंघांची निवड करण्यात येते. या प्रक्रियेत दोन टप्प्यांत संयंत्रांची सरमिसळ करण्यात येते. प्रत्येक संयंत्राला विशिष्ट असा क्रमांक (युनिक आयडी) उपलब्ध करून देण्यात आला आहे. सरमिसळ प्रक्रियेनंतर कोणत्या विधानसभा मतदारसंघासाठी कोणते संयंत्र वितरित करण्यात येणार आहे, यासाठीची यादी तयार होते. ही यादी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तयार करण्यात येते. तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या स्वाक्षरीने यादीचे प्रमाणीकरण करण्यात येते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आपल्या विधानसभा क्षेत्रात वितरित करण्यात येणारे संयंत्रच प्रत्यक्षात वितरित करण्यात आल्याची खातरजमा करणे या प्रक्रियेमुळे शक्य होते.

पुण्य नगरी

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील पूर्वतयारी सुरू

## जिल्हा निवडणूक अधिकारी गगराणी यांनी घेतला आढावा

**। मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यामध्ये विविध यंत्रणांनी केलेल्या पूर्वतयारींचा जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी शुक्रवारी आढावा घेतला. निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत पालिका मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. कोणत्याही अडचणीला गांभीर्याने घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करावे, असे निर्देशही गगराणी यांनी या बैठकीत संबंधितांना दिले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांची स्थिती, आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदार याद्यांची स्थिती आणि नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे, मतदान संयंत्र ठेवण्यासाठी स्ट्राँग रूम, संवेदनशील मतदान केंद्रांची यादी, पोलीस आणि निवडणूक यंत्रणा यांच्याकडून विविध मतदारसंघांमध्ये संयुक्त पाहणी आदींबाबत अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी (उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर आणि विशेष कार्य



अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी आढावा सादर केला. या वेळी सदर बैठकीला अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी आणि अतिरिक्त आयुक्त डॉ. विपीन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी आणि अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी आणि अतिरिक्त आयुक्त डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी (मुंबई शहर) संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर, सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी आदी उपस्थित होते.

> मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकापर्यंत आपली यंत्रणा पोचवा. मतदार यादीमध्ये मतदारांची नाव नोंदणी करणे आदी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी. गृहनिर्माण संस्थांशी पुन्हा एकदा भेटी देऊन समन्वय साधावा. काही अडचणी उद्‌भल्यास वरिष्ठांशी वेळोवेळी चर्चा करावी. अधिकाऱ्यांनी निवडणुकीसंदर्भातील संपूर्ण तयारी अत्यंत चोखपणे आणि जबाबदारीने पार पाडावी.
>
> – भूषण गगराणी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पालिका आयुक्त.

Mumbai Edition
Sep 14, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# प्रशासन लागले विधानसभा निवडणुकीच्या तयारीला

मुंबई : आगामी विधानसभा निवडणूक-२०२४ च्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर विभागातील वडाळा, शीव (सायन), धारावी, माहीम या मतदारसंघातील मतदान केंद्रांसंदर्भात करण्यात आलेले नियोजन, पूर्वतयारी आदींचा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी शुक्रवारी पालिका मुख्यालयात आढावा घेतला. निवडणूक समन्वय अधिकारी फरोघ मुकादम, विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, बृहन्मुंबई महानगरपालिका उपआयुक्त प्रशांत सपकाळे, तसेच विविध प्रशासकीय विभागांचे सहायक आयुक्त आणि संबंधित अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई क्षेत्रात (मुंबई शहर जिल्हा आणि उपनगर जिल्हा) सध्या निवडणूक पूर्वतयारी सुरू आहे. याचधर्तीवर मुंबई शहर विभागातील पूर्वतयारीचा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी आढावा घेतला. या वेळी त्यांनी वडाळा, शीव (सायन), धारावी, माहीम या मतदारसंघांशी संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

मुंबईतील मतदार केंद्रांचे



सुसूत्रीकरण करण्यात आलेले आहे. सर्व मतदार केंद्रांच्या ठिकाणी विविध प्रकारच्या सोयी-सुविधा योग्यप्रकारे देण्यासंदर्भात नियोजन करण्यात यावे. मतदारांनी मतदार यादीत नोंदणी करण्यासाठी, मतदारसंघात बदल करण्यासाठी किंवा नाव कमी करण्यासाठी दिलेल्या अर्जांचा लवकरात लवकर निपटारा करावा. मतदान नोंदणी करणे, मतदानाचा हक्क बजावणे तसेच ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्रांबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.

निवडणुकीसाठी नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे सुसूत्रपणे नियोजन करावे आणि त्यांच्याकडून विहित वेळेत कामे पूर्ण होतील, हे सुनिश्चित करावे, असे निर्देश जोशी यांनी या बैठकीत दिले. तसेच, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन सुसूत्रीकरणानंतर मतदान केंद्रांमध्ये झालेल्या बदलांविषयी माहिती द्यावी, मतदानासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याकरिता आवाहन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. दरम्यान, विविध मतदारसंघांमध्ये कार्यरत निवडणूक अधिकाऱ्यांकडून पूर्वतयारी, तसेच कामकाजाबाबत असलेल्या अडचणी आणि त्यांच्या सूचनाही अतिरिक्त आयुक्त जोशी यांनी या वेळी जाणून घेतल्या.

पुण्य नगरी

# नवमतदारांची नोंदणी २० ऑगस्टपर्यंत करता येणार

## मुंबईतील मतदारांना यादीसोबत मोबाईल क्रमांक जोडण्याची सुविधा

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशिलामध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधी २० ऑगस्टपर्यंत उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच मतदारांना मतदार यादीतील आपल्या नावासोबतच स्वतःचा मोबाईल क्रमांक जोडून घेता येणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण केले जाणार आहे. मुंबई महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी तंत्रज्ञान स्नेही अशा पर्यायांचा वापर करणे गरजेचे आहे. आपल्या मतदार यादीतील नावासोबत मोबाईल क्रमांक जोडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईतील मतदारांना येत्या २० ऑगस्टपर्यंत मतदार यादीसोबत मोबाईल क्रमांक जोडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदार यादीतील नावासोबत मोबाईल क्रमांक जोडल्याने निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी जाहीर होणाऱ्या विविध सूचना आणि माहिती नागरिकांना आपल्या मोबाईलवर मिळणे शक्य होणार आहे.

निवडणूक आयोगाकडून पाठवण्यात येणाऱ्या माहितीमध्ये मतदान केंद्र, मतदानाची तारीख, मतदानाची वेळ आदी महत्त्वाची माहिती समाविष्ट असते. मतदानाच्या दिवशी आपला वेळ वाचवण्यासोबतच, विनासायास मताधिकार बजावण्यास ही माहिती कामी येते. निवडणूक आयोगाकडून मतदारांसाठी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना आणि निर्देशांची माहिती प्राप्त होते.

तसेच भारत निवडणूक आयोगाच्या वतीने राबवले जाणारे मतदार सर्वेक्षणासारखे उपक्रम, मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यासंदर्भातील अर्जांवरील कार्यवाही याबाबतच्या सूचना - नोटिसा, पंचनाम्याची सूचना प्राप्त होते आणि संभाव्य कार्यवाही सुलभ होते, असे प्रशासनाने म्हटले आहे.

### ऑनलाइन अर्ज भरताना अर्जदार त्रस्त



### अर्ज असा भरता येणार

ऑनलाइन अर्ज भरण्याकरिता www. voters.eci.gov.in हे संकेतस्थळ किंवा Voter Helpline हे मोबाईल ॲप वापरता येते. लॉगइन केल्यावर अर्ज क्रमांक ८ निवडून त्यात Correction of Entries in Electoral Roll या सुविधेअंतर्गत, आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडण्याचा पर्याय मिळतो. ऑफलाइन अर्ज भरण्यासाठी जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन, तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमादरम्यान आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष शिबिरामध्येही ऑफलाइन पद्धतीने मतदार अर्ज भरू शकतील. मतदार आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात आणि त्यांनाही मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडून देण्याची विनंती करू शकतात.

### मतदार यादीशी मोबाईल क्रमांक जोडण्याचे फायदे

मोबाईल क्रमांक अद्ययावत केल्यास, निवडणूक आयोगाच्या electoralsearch.eci. gov.in या संकेतस्थळाद्वारे तसेच Voter Helpline मोबाईल ॲपद्वारे मतदार यादीतील आपल्या नावाचा शोध घेता येतो. ई-मतदार ओळखपत्र डाऊनलोड करता येते. पूर्वी मतदार नोंदणी व इतर सेवा ऑफलाइन स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे बहुतांश मतदार ओळखपत्रधारकांचे मोबाईल क्रमांक जोडलेले नाहीत. त्यामुळे आपल्या नावासोबत आपला मोबाईल क्रमांक जोडल्याची खात्री करणे शक्य आहे. पूर्वी मतदार नोंदणी व इतर सेवा ऑफलाइन स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे अनेकदा ऑनलाइन पद्धतीत एकाच मोबाईल क्रमांकाचा वापर करून एकापेक्षा अधिक जणांचे मतदार नोंदणी अर्ज भरले जातात. अशावेळी हे टाळण्यासाठी एका मोबाईल क्रमांकाचा वापर फक्त एकाच मतदार ओळखपत्रासाठी केला जावा. विद्यमान मतदारांसह ज्यांच्या मतदार यादीतील नावासोबत त्याचा युनिक मोबाईल क्रमांक जोडलेला नाही, त्यांनी अर्ज क्रमांक ८ भरावा.

# राजकीय पक्षांचेही सहकार्य महत्त्वाचे

## पालिका आयुक्त भूषण गगराणी यांचे प्रतिपादन



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सध्या राज्यात दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राजकीय पक्षांनीही आपापल्या परीने या कार्यक्रमाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी, यामुळे मतदार नोंदणीचे, मतदानाचे प्रमाण वाढवण्यास मदत होईल, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत पालिका मुख्यालयात शुक्रवारी बैठक पार पडली. जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या आढावा बैठकीमध्ये निवडणूक अधिकारी, मनपा अधिकारी तसेच विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासनातर्फे विविध कामकाज सुरू आहे. यांपैकी, छायाचित्रासह मतदार याद्यांचा संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम सध्या राबविण्यात येत आहे. मतदारांची नोंदणी वाढावी, यासाठी प्रशासनाने वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृतीदेखील केली आहे. नवमतदारांची नोंदणी, मतदारांच्या नावासमवेत मोबाईल क्रमांक जोडणे आदी प्रक्रियांची माहितीदेखील या बैठकीत देण्यात आली. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी त्यावर आपापली मते व सूचना मांडल्या.

अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव आणि अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी माहिती देताना सांगितले की, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकदरम्यानचा अनुभव लक्षात घेता बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मतदान केंद्रांच्या रचनेत अधिक सुसूत्रीकरण करण्यात आले आहेत. तसेच राजकीय पक्षांनाही नव्या मतदार याद्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी १५०० मतदारांची संख्या ही आता सरासरी १००० ते १२०० पर्यंत असेल. त्यामुळे मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ होणार आहे.

### मतदान केंद्रांची माहिती

याआधी काही परिसरामध्ये तुलनेने अधिक मतदान केंद्र होते. त्यांच्या रचनेतही सुसूत्रता आणण्यात आली आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था असो वा झोपडपट्टी परिसर, या सर्वांची मागणी व आवश्यकता लक्षात घेता मतदार संख्या व परिसर यांचा योग्य ताळमेळ करण्यात आला आहे. मतदान केंद्रांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी हे जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहितीही देण्यात आली.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान संयंत्रांची सरमिसळ प्रक्रिया संपन्न

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी मिळून एकूण ३६ विधानसभा मतदारसंघासाठी मतदान प्रक्रिया संयंत्रांची पहिल्या टप्प्यातील सरमिसळ प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या उपस्थितीत महापालिका मुख्यालयात रविवारी पार पडली. मतदान प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची आहे.

यावेळी विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि सर्व संबंधित अधिकारी देखील हजर होते. सरमिसळ प्रक्रियेवेळी सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची मते देखील जाणून घेण्यात आली. तसेच समाधानकारकरित्या संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली.

सरमिसळ करण्यात आलेल्या या संयंत्रांची विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना ही संपूर्ण प्रक्रिया पाहता येणार आहे. आपल्याच मतदारसंघासाठी वितरित करण्यात आलेले संयंत्र हे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी उपलब्ध झाले आहे, याची खातरजमा राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना या प्रक्रियेच्या माध्यमातून करता येईल. निवडणूक यंत्रणेबद्दल आणि संपूर्ण प्रक्रियेमध्ये संपूर्ण पारदर्शकता ठेवतानाच अधिकाधिक विश्वास निर्माण व्हावा, हे सरमिसळ प्रक्रिया राबवण्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.



## अशी होते सरमिसळ प्रक्रिया

● भारत निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जिल्हानिहाय विधानसभा मतदारसंघांची निवड करण्यात येते. या प्रक्रियेत दोन टप्प्यांत संयंत्रांची सरमिसळ करण्यात येते. सरमिसळ प्रक्रियेनंतर कोणत्या विधानसभा मतदारसंघासाठी कोणते संयंत्र वितरीत करण्यात येणार आहे, यासाठीची यादी तयार होते. ही यादी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तयार करण्यात येते. तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या स्वाक्षरीने यादीचे प्रमाणीकरण करण्यात येते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आपल्या विधानसभा क्षेत्रात वितरीत करण्यात येणारे संयंत्रच प्रत्यक्षात वितरित करण्यात आल्याची खातरजमा करणे या प्रक्रियेमुळे शक्य होते.

नव शक्ति
marathi.freepressjournal.in

# धनशक्तीविरोधात जप्तीचे अस्त्र

## ▌तपास व अंमलबजावणी यंत्रणांना आदेश
## ▌सोने-चांदी खरेदीच्या व्यवहारांवर नजर

**मुंबई** : विधानसभेची निवडणूक मुक्त वातावरणात आणि कोणत्याही गैरप्रकारांविना व्हावी यासाठी कुठेही पैशांची देवाणघेवाण, मद्य आदी प्रलोभने तसेच सोने-चांदीची खरेदी, हवाला आदी संशयास्पद प्रकरणे लक्षात येताच थेट जप्तीची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई महानगरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित विविध तपास व अंमलबजावणी यंत्रणांची महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी (२२ ऑक्टोबर) बैठक पार पडली. यावेळी गगराणी यांनी हे निर्देश दिले.

बैठकीच्या सुरुवातीला सर्व यंत्रणांकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले नियोजन तसेच सुरू असलेल्या कार्यवाहींचा गगराणी यांनी आढावा घेतला. सर्व यंत्रणांना ते म्हणाले, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये आलेल्या काही अनुभवांच्या आधारे, केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग मुंबईतील निवडणुकीशी संबंधित बारीकसारीक बाबींवर विशेष लक्ष ठेवून आहे. त्यामुळे, मुंबईत कार्यरत असलेल्या प्रत्येक यंत्रणांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. सर्व यंत्रणांचा आपापसांमध्ये योग्य समन्वय असावा, यासाठी प्रत्येक यंत्रणेने समन्वयक अधिकाऱ्याची (नोडल ऑफिसर) नियुक्ती करावी.



### तपासणी नाक्यांवर संयुक्त पथके

गगराणी यांनी निर्देश दिले की, संबंधित यंत्रणांनी संयुक्त पथकांची निर्मिती करून त्यांची मुंबईतील तपासणी नाक्यांवर म्हणजेच 'चेक पोस्ट'वर नियुक्ती करावी. समन्वयक अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील माहितीची नियमितपणे देवाणघेवाण करावी, जेणेकरुन समन्वयाने कारवाई करता येईल. मुंबईच्या सीमेवर, बंदरांवर, समुद्रकिनाऱ्यांवर, विमानतळ तसेच वाहतुकीच्या अन्य संसाधनाद्वारे केल्या जाणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवून संशयास्पद प्रकरणांमध्ये तत्काळ कारवाई करावी. मद्य विक्री करणाऱ्या दुकानांबाबत दक्ष राहावे तसेच त्याठिकाणी काही गैरव्यवहार आढळून आल्यास त्यावर तत्काळ कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

### संवेदनशील मतदारसंघांवर नजर

आर्थिक खर्चाच्या बाबतीत काही मतदारसंघ अत्यंत संवेदनशील आहेत. त्याठिकाणी निवडणुकीच्या काळात पैशांचा व्यवहार होणार नाही तसेच अशा संवेदनशील मतदारसंघांमध्ये होणारी पैशांची देवाणघेवाण, व्यवहार किंवा अन्य कोणत्याही संशयास्पद वित्तीय बाबींवर अधिक बारकाईने लक्ष ठेवून संबंधित यंत्रणांनी तत्काळ कारवाई करावी, असे निर्देशही गगराणी यांनी दिले.

## परवानाधारक शस्त्रे जप्त

**गिरीश चित्रे / मुंबई**

निवडणुकीत कुठलेही गालबोट लागू नये यासाठी परवानाधारक शस्त्रे ताब्यात घेण्यास सुरुवात झाली आहे. १५ ऑक्टोबर ते आतापर्यंत राज्यभरातून २३ हजार ९७९ शस्त्रे जमा करण्यात आल्याचे राज्य निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. विधानसभा निवडणूक निर्विघ्न पार पडावी यासाठी राज्य निवडणूक आयोग, पोलिसांसह संबंधित यंत्रणा अ‍ॅलर्ट मोडवर आहेत. राज्यात आचारसंहिता लागू होताच आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांना नोटीस बजावण्यात येत असून पोस्टर्स बॅनर्स हटवण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे राज्यात परवानाधारक शस्त्र जमा करण्याचे आदेश गृह विभागाने दिले आहेत. त्याबाबत ही कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

राजकारणी असो की, मोठे व्यावसायिक याशिवाय विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी

**राज्यातून २३ हजार ९७८ शस्त्र जमा**

यांच्याकडून स्वरक्षणासाठी शस्त्र परवाना काढला जातो. हा शस्त्र परवाना जिल्हा प्रशासन व पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत गृह विभागाच्या परवानगीने दिले जातात. मात्र निवडणूक काळात परवानाधारकांना आचारसंहिता संपेपर्यंत शस्त्र जमा करावी लागतात. निवडणूक काळात राजकीय वादविवाद, वैमनस्य उफाळून येण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे निवडणूक काळात कायदा-सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी परवानाधारकांना शस्त्र जमा करणे बंधनकारक आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील परवानाधारकांकडून शस्त्र जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, काही अपवादात्मक बाब असल्यास परवानाधारक शस्त्र जमा करण्यात येत नसल्याचे निवडणूक विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

### विमानतळ आणि रस्त्यांवरही लक्ष

मुंबई महानगरातील विविध ठिकाणांहून जाणाऱ्या 'नॉन शेड्यूल्ड फ्लाइट्स' संदर्भातील माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणाने मुंबई पोलीस तसेच आयकर विभागाला नियमितपणे द्यावी. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करावे, असेही गगराणी यांनी सांगितले.

नव शक्ति
marathi.freepressjournal.in

# मतदारांसाठी केंद्रांवर आसन व्यवस्था

## ■ मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे निर्देश ■ रांगेत उभे राहण्याची गरज नाही

**मुंबई :** मुंबईत मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, रांगेतील मतदारांसाठी आसन व्यवस्था अशा निश्चित किमान सुविधा पुरवाव्यात, त्यात कोणतीही कमतरता राहणार नाही, याची काळजी घ्यावी. मतदारांना रांगेत उभे राहावे लागू नये, यासाठी योग्यप्रकारे व्यवस्थापन करावे, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी सोमवारी पालिका मुख्यालयातील संयुक्त आढावा बैठकीत दिले.

या बैठकीत चोक्कलिंगम यांनी सांगितले की, मुंबईतील निवडणुकीच्या तयारीमध्ये कोणतीही हयगय होऊ नये, यासाठी प्रत्येक निवडणूक अधिकाऱ्यांनी सतर्कतेने नियोजन करावे. ६ लोकसभा आणि ३६ विधानसभा मतदारसंघ असलेले हे देशातील एकमेव महानगर आहे. केवळ मतदारच नव्हे तर मतदान प्रक्रियेत सहभागी असलेले कर्मचारी यांना ईव्हीएम संयंत्र घेतेवेळी किंवा जमा करतेवेळी संबंधित केंद्रांवर ताटकळावे लागणार नाही, याची खात्री करावी. कोणतीही अनैतिक किंवा अवैध बाब लक्षात येताच त्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई




करावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पाडून लोकशाही अधिक बळकट करण्याची जबाबदारी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर असते. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया अत्यंत निकोप आणि सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रयत्न करावेत, असे असे चोक्कलिंगम म्हणाले.

बृहन्मुंबई कार्यक्षेत्रातील मतदारांना घरबसल्या त्यांचे मतदान केंद्र जाणून घेता यावे, यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' या उपक्रमाचे चोक्कलिंगम यांनी कौतुक केले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हा) कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांमध्ये करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा आढावा चोक्कलिंगम आणि जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी संयुक्त बैठकीत घेतला.

बैठकीच्या सुरुवातीला अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यांमधील विविध मतदारसंघ, सुसूत्रीकरणानंतर मतदान केंद्रांमध्ये झालेले बदल, मनुष्यबळांची नियुक्ती आणि निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबतची सद्यस्थिती यासंदर्भात सादरीकरण केले.

### पाचपेक्षा अधिक केंद्रे असल्यास कलर कोड, तर रांग टाळण्यासाठी टोकन

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी म्हणाले की, मुंबईतील प्रत्येक मतदारसंघाची रचना, तेथील समस्या आणि आव्हाने वेगवेगळी आहेत. त्यामुळे, प्रत्येक निवडणूक अधिकाऱ्यांनी सूक्ष्म पद्धतीने नियोजन करून निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि सुलभ पद्धतीने पार पडेल, अशी तयारी करावी. एकाच ठिकाणी पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असल्यास त्याठिकाणी रंगसंगतीनुसार संरचना (कलर कोड) करावी. गर्दी आणि रांगा टाळण्यासाठी टोकन व्यवस्था सुरू करावी. तसेच, प्रत्येक मतदान केंद्राला निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी यापूर्वी भेट दिली असेल तरी पुन्हा एकवार प्रत्यक्ष पाहणी करून त्याठिकाणी उपलब्ध सुविधा आणि आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा अहवाल सादर करावा, असे निर्देशही गगराणी यांनी यावेळी दिले.

बैठकीला अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, सह मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. विजय राठोड, महानगरपालिकेचे विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांच्यासह बृहन्मुंबईतील विधानसभा मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी तसेच अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी

## ❖ पुनरीक्षण कार्यक्रम अधिक वेगाने राबवा
## ❖ पालिका आयुक्त भूषण गगराणींचे आवाहन

प्रतिनिधी/आपलं महानगर वृत्तसेवा

**✦ मुंबई । विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे. त्यासाठी निवडणूक आयोग, राज्य शासन आणि मुंबई महापालिका प्रशासन पूर्व तयारीला लागले आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासनातर्फे मतदारांच्या छायाचित्रासह मतदार यादींचा संक्षिप्त पुनरीक्षण (दुसरा) कार्यक्रम सध्या राबविण्यात येत आहे. मतदार नोंदणी वाढीसाठी प्रशासनाने विविध माध्यमातून जनजागृती देखील केली आहे. सध्या सुरू असलेला मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम २० ऑगस्टपर्यंत राबविण्यात येणार असून ३० ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.**

जिल्हा निवडणूक अधिकारी व महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी, शुक्रवारी विधानसभा निवडणुकीच्या पूर्व तयारीसाठी सर्वपक्षीय प्रतिनिधी यांची महापालिका मुख्यालयात बैठक आयोजित केली होती. यावेळी, गगराणी यांनी निवडणूक कार्यक्रमाबाबत थोडक्यात माहिती दिली. तसेच, नवमतदारांची नोंदणी, मतदारांच्या नावासमवेत मोबाईल क्रमांक जोडणे इत्यादी प्रक्रियांची माहिती देखील या बैठकीत देण्यात आली. मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी राजकीय पक्षांचेही सहकार्य महत्वाचे आहे. राजकीय पक्षांनी मतदार संख्या वाढीसाठी प्रयत्न करावेत. सध्या सुरु असलेल्या मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमास जनतेचा प्रतिसाद मिळण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा, असे आवाहन भूषण गगराणी यांनी केले आहे. यावेळी, राजकीय पक्षांच्या



प्रतिनिधींनी त्यावर आपापली मते मांडली आणि काही महत्वाच्या सूचना केल्या.

विधानसभा निवडणूक २०२४च्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सध्या राज्यात दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अर्थात मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये नवमतदारांना नाव नोंदणीसह विविध सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा या दोन्ही जिल्ह्यांमध्ये सदर कार्यक्रमाची प्रशासनाने जनजागृती केली आहे. त्यासोबत, राजकीय पक्षांनी देखील आपापल्या परीने या कार्यक्रमाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी, जेणेकरुन मतदार नोंदणीचे पर्यायाने मतदानाचे प्रमाण वाढवण्यास मदत होईल, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी केले. विधानसभा निवडणूक २०२४च्या पार्श्वभूमीवर, विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत मुंबई महापालिका मुख्यालयात शुक्रवारी बैठक पार पडली. जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या आढावा बैठकीमध्ये विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ.अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर तसेच महापालिकेचे सहआयुक्त (मध्यवर्ती खरेदी खाते) विजय बालमवार व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुंबई महापालिका क्षेत्रात अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहचतानाच मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी यंत्रणांच्या प्रयत्नांना राजकीय पक्षांनीदेखील आपापल्या परीने सहकार्य करण्याची गरज आहे. मतदारांना अधिकाधिक सुलभ पद्धतीने मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी यंत्रणेसोबतच राजकीय पक्षांनीही एकत्रित प्रयत्न करावेत. सध्या मुंबईत मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्यात यावी, जेणेकरुन अधिकाधिक मतदार नोंदवले जातील, अशी सूचना भूषण गगराणी यांनी यावेळी केली.

आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# लोकसभेप्रमाणे मतदानासाठी विलंब होणार नाही

## जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांची स्पष्टोक्ती



प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

मुंबई । लोकसभा निवडणुकीत ज्या पद्धतीने मतदान केंद्रावर बराच वेळ लागला, गर्दीत मतदारांना ताटकळत उभे राहावे लागले त्याची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत होणार नाही. त्यासाठी आवश्यक ती काळजी घेण्यात आली असून उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. विशेषतः दिव्यांग, वृद्ध, ज्येष्ठ नागरिकांना व्हीलचेअर, बसण्यासाठी खुर्ची, पाणी, वैद्यकीय सुविधा आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त, प्रशासक आणि मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यासाठी नियुक्त जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी बुधवारी दिली.

विधानसभा निवडणूक निर्विघ्नपणे पार पडावी आणि जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी निवडणूक आयोग, मुंबई महापालिका, मुंबई पोलीस, जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पूर्व तयारी करण्यात आली आहे. याबाबत माहिती देण्यासाठी मुंबई महापालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात बुधवारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी भूषण गगराणी आणि पोलीस अधिकारी सत्य नारायण, जिल्हाधिकारी शहर विभाग संजय यादव, अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर दिली.

### महापालिकेचे ४२ हजार अधिकारी, कर्मचारी आणि २४ हजार पोलीस



विधानसभा निवडणुकीसाठी मुंबई महापालिकेकडून सध्या निवडणूक अधिकारी पदाच्या कामासाठी म्हणून १२ ते १५ हजार अधिकारी कार्यरत आहेत. तसेच, प्रत्यक्ष निवडणूक मतदान पार पाडण्यासाठी ४० ते ४२ हजार अधिकारी आणि कर्मचारी काम करणार आहेत, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी दिली. तसेच, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रियेबाबत दिवाळीपूर्वी एक टप्प्यात आणि दिवाळी नंतर दोन टप्प्यात असे तीन टप्प्यात निवडणूक प्रक्रियेबाबत प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे भूषण गगराणी यांनी सांगितले. या निवडणुकीत मुंबई पोलिसांकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी २५०० पोलीस अधिकारी, २१ हजार पोलीस कर्मचारी आणि सीआरपीएफच्या ३२ कंपन्या तैनात करण्यात येणार असल्याची माहिती सह पोलीस आयुक्त ( कायदा आणि सुव्यवस्था) सत्य नारायण यांनी सांगितले.

### मतदान केंद्रावर मोबाईल नेण्यास बंदी



निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, मतदारांनी मतदान केंद्रावर मतदानाला जाताना मोबाईल सोबत घेऊन जाऊ नये. अथवा मोबाईल मतदान केंद्रापासून दूर अंतरावर कोणाकडे तरी सांभाळण्यास द्यावा, मात्र मतदान केंद्रावर मोबाईल नेण्यास आणि वापरण्यास बंदी असणार आहे, अशी माहिती भूषण गगराणी यांनी यावेळी एका प्रश्नाच्या उत्तरात दिली.

### मतदार नोंदणीसाठी शनिवारपर्यंत अंतिम संधी



मतदार नोंदणीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या १० दिवसांपूर्वी म्हणजे १९ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यत मतदारांना नोंदणी करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा निवडणूक कार्यालयात मतदार नोंदणीबाबतचे अर्ज उपलब्ध आहेत. त्या कार्यालयात अर्ज भरून जमा करावयाचे आहे. तसेच ऑनलाईन मतदार नोंदणी करण्यासाठी https://voters.eci.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी आणि अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्र.१९५० (टोल फ्री) वर संपर्क साधावा, असे आवाहन भूषण गगराणी यांनी यावेळी केले.



### संवेदनशील मतदान केंद्राबाबत सर्वेक्षण सुरू

मुंबईत लोकसभा निवडणुकीच्या प्रसंगी एकही संवेदनशील मतदारसंघ नव्हता, मात्र या विधानसभा निवडणुकीच्या वेळी पोलीस आणि महसूल खात्याचे संबंधित अधिकारी मुंबईत सर्वेक्षण करीत आहेत. त्यानुसार पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती सह पोलीस आयुक्त ( कायदा आणि सुव्यवस्था) सत्य नारायण यांनी सांगितले.

### मुंबई शहर

- एकूण मतदान केंद्र २५३७
- उत्तुंग इमारतीमधील - मतदान केंद्र १५६
- सहकारी गृहनिर्माण सोसायटी मधील मतदान केंद्र १००
- झोपडपटटी परिसरात मतदान केंद्र ३१३
- मुंबई शहर जिल्हयात मंडपातील मतदान केंद्र ७५
- पहिल्या मजल्यावरील मतदान केंद्र १७
- मतदारांची एकूण संख्या २५ लाख ३४ हजार २७६
- महिला मतदार ११ लाख ७१ हजार ८०८
- पुरुष १३ लाख ६२ हजार २२४
- तृतीयपंथी २४४
- ज्येष्ठ नागरिक (८५ +) ५४ हजार ६३
- नवमतदार संख्या ( १८ - १९ वर्ष) ३७ हजार ८९४
- दिव्यांग मतदार ६ हजार ३३४
- सर्व्हिस वोटर ३९२
- अनिवासी भारतीय मतदार ४०६



### मुंबई उपनगर

- एकूण मतदान केंद्र ७५७४
- सहकारी गृहनिर्माण सोसायटीमधील मतदान केंद्र ५५३
- झोपडपट्टी परिसरात मतदान केंद्र २२९
- मुंबई शहर जिल्हयात मंडपातील मतदान केंद्र १३०२
- पहिल्या मजल्यावरील मतदान केंद्र १३९
- १२०० पेक्षा अधिक मतदार संख्या असलेले १२७६ मतदान केंद्र
- १० हजारपेक्षा अधिक मतदार संख्या असलेले १३९ मतदान केंद्र
- महिला मतदार ३५ लाख ६१ हजार ५८७
- पुरुष मतदार ४० लाख ८५ हजार ५५०
- तृतीयपंथी मतदार ८३१
- ज्येष्ठ नागरिक मतदार ९३ हजार ४४८
- नवमतदार संख्या १ लाख २२ हजार ९१९
- दिव्यांग मतदार १७ हजार २०९
- सर्व्हिस वोटर १०८९
- अनिवासी भारतीय मतदार १८६७
- एकूण मतदारांची संख्या ७६ लाख ४७ हजार ९६७

नव शक्ति
marathi.freepressjournal.in

# धनशक्तीविरोधात जप्तीचे अस्त्र

## ▌तपास व अंमलबजावणी यंत्रणांना आदेश
## ▌सोने-चांदी खरेदीच्या व्यवहारांवर नजर

**मुंबई** : विधानसभेची निवडणूक मुक्त वातावरणात आणि कोणत्याही गैरप्रकारांविना व्हावी यासाठी कुठेही पैशांची देवाणघेवाण, मद्य आदी प्रलोभने तसेच सोने-चांदीची खरेदी, हवाला आदी संशयास्पद प्रकरणे लक्षात येताच थेट जप्तीची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई महानगरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित विविध तपास व अंमलबजावणी यंत्रणांची महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी (२२ ऑक्टोबर) बैठक पार पडली. यावेळी गगराणी यांनी हे निर्देश दिले.

बैठकीच्या सुरुवातीला सर्व यंत्रणांकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले नियोजन तसेच सुरू असलेल्या कार्यवाहींचा गगराणी यांनी आढावा घेतला. सर्व यंत्रणांना ते म्हणाले, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये आलेल्या काही अनुभवांच्या आधारे, केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग मुंबईतील निवडणुकीशी संबंधित बारीकसारीक बाबींवर विशेष लक्ष ठेवून आहे. त्यामुळे, मुंबईत कार्यरत असलेल्या प्रत्येक यंत्रणांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. सर्व यंत्रणांचा आपापसांमध्ये योग्य समन्वय असावा, यासाठी प्रत्येक यंत्रणेने समन्वयक अधिकाऱ्याची (नोडल ऑफिसर) नियुक्ती करावी.



### तपासणी नाक्यांवर संयुक्त पथके

गगराणी यांनी निर्देश दिले की, संबंधित यंत्रणांनी संयुक्त पथकांची निर्मिती करून त्यांची मुंबईतील तपासणी नाक्यांवर म्हणजेच 'चेक पोस्ट'वर नियुक्ती करावी. समन्वयक अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील माहितीची नियमितपणे देवाणघेवाण करावी, जेणेकरुन समन्वयाने कारवाई करता येईल. मुंबईच्या सीमेवर, बंदरांवर, समुद्रकिनाऱ्यांवर, विमानतळ तसेच वाहतुकीच्या अन्य संसाधनाद्वारे केल्या जाणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवून संशयास्पद प्रकरणांमध्ये तत्काळ कारवाई करावी. मद्य विक्री करणाऱ्या दुकानांबाबत दक्ष राहावे तसेच त्याठिकाणी काही गैरव्यवहार आढळून आल्यास त्यावर तत्काळ कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

### संवेदनशील मतदारसंघांवर नजर

आर्थिक खर्चाच्या बाबतीत काही मतदारसंघ अत्यंत संवेदनशील आहेत. त्याठिकाणी निवडणुकीच्या काळात पैशांचा व्यवहार होणार नाही तसेच अशा संवेदनशील मतदारसंघांमध्ये होणारी पैशांची देवाणघेवाण, व्यवहार किंवा अन्य कोणत्याही संशयास्पद वित्तीय बाबींवर अधिक बारकाईने लक्ष ठेवून संबंधित यंत्रणांनी तत्काळ कारवाई करावी, असे निर्देशही गगराणी यांनी दिले.

## परवानाधारक शस्त्रे जप्त

**गिरीश चित्रे / मुंबई**

निवडणुकीत कुठलेही गालबोट लागू नये यासाठी परवानाधारक शस्त्रे ताब्यात घेण्यास सुरुवात झाली आहे. १५ ऑक्टोबर ते आतापर्यंत राज्यभरातून २३ हजार ९७९ शस्त्रे जमा करण्यात आल्याचे राज्य निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. विधानसभा निवडणूक निर्विघ्न पार पडावी यासाठी राज्य निवडणूक आयोग, पोलिसांसह संबंधित यंत्रणा अ‍ॅलर्ट मोडवर आहेत. राज्यात आचारसंहिता लागू होताच आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांना नोटीस बजावण्यात येत असून पोस्टर्स बॅनर्स हटवण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे राज्यात परवानाधारक शस्त्र जमा करण्याचे आदेश गृह विभागाने दिले आहेत. त्याबाबत ही कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

**राज्यातून २३ हजार ९७८ शस्त्र जमा**

राजकारणी असो की, मोठे व्यावसायिक याशिवाय विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी यांच्याकडून स्वरक्षणासाठी शस्त्र परवाना काढला जातो. हा शस्त्र परवाना जिल्हा प्रशासन व पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत गृह विभागाच्या परवानगीने दिले जातात. मात्र निवडणूक काळात परवानाधारकांना आचारसंहिता संपेपर्यंत शस्त्र जमा करावी लागतात. निवडणूक काळात राजकीय वादविवाद, वैमनस्य उफाळून येण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे निवडणूक काळात कायदा-सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी परवानाधारकांना शस्त्र जमा करणे बंधनकारक आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील परवानाधारकांकडून शस्त्र जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, काही अपवादात्मक बाब असल्यास परवानाधारक शस्त्र जमा करण्यात येत नसल्याचे निवडणूक विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

### विमानतळ आणि रस्त्यांवरही लक्ष

मुंबई महानगरातील विविध ठिकाणांहून जाणाऱ्या 'नॉन शेड्यूल्ड फ्लाइट्स' संदर्भातील माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणाने मुंबई पोलीस तसेच आयकर विभागाला नियमितपणे द्यावी. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करावे, असेही गगराणी यांनी सांगितले.

नव शक्ति
marathi.freepressjournal.in

# मतदानाचा टक्का वाढविण्याचे आव्हान

- मुंबईत १९ तारखेपर्यंत मतदार नोंदणीची संधी
- जिल्हा निवडणूक अधिकारी गगराणी यांची माहिती



**मुंबई** : विधानसभा निवडणुकीसाठी मतदार यादीत नाव नोंदवण्याची, दुरुस्ती करण्याची सुविधा संकेतस्थळ, अॅप किंवा प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आदी माध्यमातून येत्या १९ तारखेच्या मध्यरात्रीपर्यंत उपलब्ध राहणार आहे. जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे, यासाठी आमचा प्रयत्न आहे, अशी माहिती मुंबईचे जिल्हा निवडणूक अधिकारी (शहर जिल्हा आणि उपनगर जिल्हा) व महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी बुधवारी दिली.

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या १० दिवस आधी मतदार नोंदणी करता येते. म्हणजे १९ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणीचे अर्ज स्वीकारले जातील. संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा निवडणूक कार्यालयात मतदार नोंदणीबाबतचे अर्ज उपलब्ध आहेत. त्या कार्यालयात अर्ज भरून जमा करावयाचे आहे. तसेच ऑनलाईन मतदार नोंदणी करण्यासाठी https://voters.eci.gov.in/ संकेतस्थळाला भेट द्यावी आणि अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्र. १९५० (टोल फ्री) वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम मंगळवारी जाहीर केला. राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी आहे. आदर्श आचारसंहिता लागू झाली असून निवडणूक पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्याकरीता आचारसंहितेची अतिशय काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे, असे गगराणी म्हणाले.

निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबरला जारी होणार आहे. नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक २९ ऑक्टोबर आहे. छाननी ३० ऑक्टोबरला, तर नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा अंतिम मुदत ४ नोव्हेंबरपर्यंत आहे. मतदान २० नोव्हेंबरला, तर मतमोजणी २३ नोव्हेंबरला आहे.



बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ३६ विधानसभा मतदारसंघ असून त्यापैकी १० हे मुंबई शहर जिल्ह्यात आणि २६ मुंबई उपनगर जिल्ह्यात आहेत. सर्व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून एकंदर निवडणूक कामाचा आढावा घेतल्यानंतर मतदान केंद्रांचे विकेंद्रीकरण आणि सुसूत्रीकरण करण्यात आले आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यात एकूण मतदान केंद्रे ७५७४ आहेत. त्यापैकी ५५३ सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये, तर २२९ झोपडपट्टी परिसरात आहेत. मुंबई शहर जिल्ह्यात एकूण मतदान केंद्रे २५३७ आहेत. त्यापैकी १०० सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांत असतील.

उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने नामनिर्देशन पत्र व शपथपत्र भरण्याकरीता व निवडणुकीच्या अनुषंगाने विविध परवानगीसाठी अर्ज करण्याकरिता 'सुविधा' या संकेतस्थळावर सर्व माहिती उपलब्ध आहे. केवायसी अॅपवर उमेदवारांबाबत माहिती उपलब्ध होणार आहे. सीव्हिजिल (Cvigil) ॲपच्या मदतीने आचारसंहिता उल्लंघना संदर्भातील मतदारांना तक्रारी करता येतील. या ॲपवर केलेल्या तक्रारींचे १०० मिनिटांत निराकरण केले जाते. मतदारांसाठी हेल्पलाईन क्रमांक १९५० आहे.

## जाहिरात फलकांवर कारवाई

मुंबईत आचारसंहिता लागू झाल्यापासून राजकीय जाहिरात फलकांवर कारवाई सुरू झाली आहे. राजकीय पक्षाच्या जाहिराती लावण्यासाठी केवळ विशिष्ट ठिकाणीच परवानगी दिली जाईल. त्या व्यतिरिक्त सगळे जाहिरात फलक काढून टाकले जात आहेत, अशी माहिती गगराणी यांनी दिली.

## मतदारांना सुविधा

मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, रांगांमध्ये आसन व्यवस्था, तसेच गर्दी झाल्यास मतदारांकरीता प्रतिक्षा कक्ष इत्यादी किमान निश्चित सुविधा पुरविण्यात येणार आहेत. मात्र आतापर्यंतच्या मार्गदर्शक तत्वांनुसार मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास मनाई असेल. तो केंद्राच्या बाहेर ठेवावा किंवा आणू नये, असे गगराणी यांनी स्पष्ट केले.

## पालिकेचे ४२ हजार कर्मचारी; २५ हजारांहून अधिक पोलीस

मुंबईत निवडणुकीच्या कामासाठी पालिकेचे ४० ते ४२ हजार कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. त्यापैकी १२ ते १५ हजार कर्मचारी हे मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून काम करीत आहेत. त्याशिवाय २५०० पोलीस अधिकारी, २१ हजार पोलीस कर्मचारी आणि सीआरपीएफच्या ३२ कंपन्या असा बंदोबस्त असेल. गेल्या लोकसभा निवडणुकीत मुंबईत कुठेही संवेदनशील मतदान केंद्र नव्हते. आताही अद्याप तसे आढळले नाही. पण महसूल आणि पोलीस यंत्रणा त्याबाबत सर्वेक्षण करीत आहे, अशी माहिती अतिरिक्त पालिका आयुक्त अश्विनी जोशी आणि सहपोलीस आयुक्त सत्यनारायण यांनी दिली.

## मतदान केंद्रांची माहिती

एका मतदान केंद्राच्या ठिकाणी १० पेक्षा अधिक केंद्र असल्यास ते जवळच्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले आहे. सुसूत्रीकरणानंतर मतदान केंद्रांमध्ये झालेल्या बदलाबाबत मतदारांना प्रसारमाध्यम, समाजमाध्यमाद्वारे माहिती देण्यात आली आहे. यासोबत मतदान केंद्रांची माहिती असलेल्या 'क्यूआर कोड'सह संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांची स्वाक्षरी असलेले पत्र प्रत्येक मतदारांच्या घरी जावून देण्यात येत आहेत.

नव शक्ति
marathi.freepressjournal.in

# नागरिकांनी मतदान करण्यासाठी राजकीय पक्षांनी प्रयत्न करावे : आयुक्त

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून प्रशासनाने सर्व आवश्यक ती तयारी केली आहे. मतदानाचे प्रमाण वाढावे, अधिकाधिक नागरिकांनी मतदार करावे, यासाठी माननीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा विशेष प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक आहे. मतदान वाढण्यासाठी राजकीय पक्षांनी देखील आपापल्या स्तरावर सहकार्य करावे, तसेच आदर्श आचारसंहिता व निवडणूक प्रक्रिया अंमलबजावणीत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी केले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूकच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्रातील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत पालिका मुख्यालयात आज बैठक घेण्यात आली.

नागरी क्षेत्रात मतदानाचे कमी प्रमाण हा माननीय निवडणूक आयोगाच्या दृष्टीने काळजीचा विषय आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. यंदा देखील वेगवेगळ्या उपाययोजना आणि जनजागृती देखील करण्यात येत आहे. ज्या पात्र मतदारांनी अद्याप मतदार नोंदणी केलेली नाही त्यांना, निवडणुकीसाठी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या दहा दिवस अगोदरपर्यंत सहा क्रमांकाचा अर्ज करून नोंदणी करता येते. या नियमानुसार, यंदा दिनांक १९ ऑक्टोबर पर्यंत मतदारांना नाव नोंदणी करता येईल. त्याचप्रमाणे नाव कमी करणे, नावात दुरुस्ती करणे याबाबत देखील समान प्रक्रिया आणि मुदत आहे, अशी माहिती देखील त्यांनी बैठकीत दिली.



## कमी मतदान हा काळजीचा विषय

नागरी क्षेत्रात मतदानाचे कमी प्रमाण हा माननीय निवडणूक आयोगाच्या दृष्टीने काळजीचा विषय आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. यंदा देखील वेगवेगळ्या उपाययोजना आणि जनजागृती देखील करण्यात येत आहे. ज्या पात्र मतदारांनी अद्याप मतदार नोंदणी केलेली नाही त्यांना, निवडणुकीसाठी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या दहा दिवस अगोदरपर्यंत सहा क्रमांकाचा अर्ज करून नोंदणी करता येते. या नियमानुसार, यंदा दिनांक १९ ऑक्टोबर पर्यंत मतदारांना नाव नोंदणी करता येईल. त्याचप्रमाणे नाव कमी करणे, नावात दुरुस्ती करणे यावाबत देखील समान प्रक्रिया आणि मुदत आहे, अशी माहिती देखील त्यांनी बैठकीत दिली.

आपले मतदान केंद्र जाणून घ्या : या अभियानाविषयी माहिती देताना, लोकसभा निवडणूक २०२४ नंतर सर्वत्र मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. या प्रक्रियेनंतर ज्या-ज्या ठिकाणी मतदान केंद्रांमध्ये वाढ आणि बदल झाले आहेत, त्या सर्व ठिकाणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे प्रत्येक कुटुंब आणि मतदार यांच्यापर्यंत पोहोचून मतदान केंद्रांची माहिती लेखी स्वरूपात पोचवत आहेत. त्यासाठी आपले मतदान केंद्र जाणून घ्या अर्थात 'नो युवर पोलिंग स्टेशन' ही मोहीम व्यापक स्तरावर राबवली जात आहे. राजकीय पक्षांनी देखील आपापल्या स्तरावर याबावत खात्री करावी. बदललेल्या मतदान केंद्राबावत माहिती करून घ्यावी आणि मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती पोहोचवून सहकार्य करावे.

■ मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रयत्न करतानाच, प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, रांगेत उभे असलेल्या मतदारांसाठी आसन व्यवस्था, स्वच्छतागृहे इत्यादी निश्चित किमान सुविधांची पूर्तता करण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर मतदारांची गैरसोय होवू नये, याची विशेषत्वाने काळजी घेण्यात येत आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर करावयाच्या कार्यवाही बावत स्वतंत्रपणे बैठका घेण्यात येतील. त्यामध्ये नामनिर्देशन, निवडणूक कार्यक्रम, मतदान संयंत्र आणि इतर मुद्द्यांबाबत सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

■ आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करणे आवश्यक आहे. विद्रूपीकरण कायदा १९९५ नुसार सर्व बॅनर्स, पोस्टर्स, स्टिकर, जाहिरात फलक इत्यादी तात्काळ काढण्याची कार्यवाही प्रशासनाने सुरु केली आहे. सर्व राजकीय पक्षांनी देखील यामध्ये सहकार्य करावे. ज्या ठिकाणी नियमानुसार परवानगी आहे, त्या ठिकाणी विहित पद्धतीने परवानगी घेतल्यानंतरच राजकीय पक्षांनी बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी लावणे अपेक्षित आहे, असे गगराणी यांनी नमूद केले.

ऑक्टोबर पर्यंत मतदारांना नाव नोंदणी करता येईल. त्याचप्रमाणे नाव कमी करणे, नावात दुरुस्ती करणे याबाबत देखील समान प्रक्रिया आणि मुदत आहे, अशी माहिती देखील त्यांनी बैठकीत दिली.

पुण्य नगरी

# मतदार केंद्रावर मतदारांना ताटकळत राहावे लागणार नाही

## मतदारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणार | लोकसभा निवडणुकीच्या गोंधळानंतर निवडणूक आयोगाची खबरदारी | संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या अंमलबजावणीत सहकार्य करावे : जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे आवाहन

**मुंबई :** येत्या २० नोव्हेंबरला होणाऱ्या महराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता जाहीर झाली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्याकरिता अंमलबजावणी सुरू झाली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या दिवशी मुंबईतील काही मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा नसल्याने झालेल्या गोंधळाची दखल घेत यावेळी निवडणूक आयोगाने खबरदारी घेतली आहे. मतदारांना ताटकळत उभे राहावे लागणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे. मतदारांना सर्व आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध केल्या जातील. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या अंमलबजावणीत सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई जिल्हा (शहर व उपनगर) निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीसाठी मतदार केंद्रांवर चोख बंदोबस्त तसेच आवश्यक सुविधा पुरवल्या जाणार आहेत. मतदारांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे, असे गगराणी यांनी सांगितले. निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेतल्यानंतर गगराणी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली. मतदान केंद्राबाबत माहिती देताना ते म्हणाले, एका मतदान केंद्राच्या ठिकाणी १० पेक्षा जास्त केंद्र असल्यास ते जवळच्या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुसूत्रीकरणानंतर मतदान केंद्रांमध्ये झालेल्या बदलाबाबत मतदारांना प्रसारमाध्यम, समाजमाध्यमाद्वारे माहिती देण्यात आली आहे. यासोबत मतदान केंद्रांची माहिती असलेल्या 'क्यूआर कोड'सह संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांची स्वाक्षरी असलेले पत्र प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन देण्यात येणार असल्याचे गगराणी यांनी सांगितले. मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, रांगांमध्ये आसन व्यवस्था, तसेच गर्दी झाल्यास मतदारांकरिता प्रतीक्षा कक्ष आदी किमान सुविधा पुरवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' या अभियानाविषयी माहिती देताना गगराणी म्हणाले की, लोकसभा निवडणूक २०२४ नंतर सर्वत्र मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. या प्रक्रियेनंतर ज्या ज्या ठिकाणी मतदान केंद्रांमध्ये वाढ आणि बदल झाले आहेत, त्या सर्व ठिकाणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे प्रत्येक कुटुंब आणि मतदार यांच्यापर्यंत पोहोचून मतदान केंद्रांची माहिती लेखी स्वरूपात पोचवत आहेत. त्यासाठी आपले मतदान केंद्र जाणून घ्या. अर्थात ही मोहीम व्यापक स्तरावर राबवली जात आहे. राजकीय पक्षांनी देखील आपापल्या स्तरावर याबाबत खात्री करावी. बदललेल्या मतदान केंद्राबाबत माहिती करून घ्यावी आणि मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती पोहोचवून सहकार्य करावे, असे आवाहन गगराणी यांनी केले.

### शहर व पूर्व उपनगरांतील मतदार

- महिला - ११ लाख ७१ हजार ८०८
- पुरुष - १३ लाख ६२ हजार २२४
- तृतीयपंथी - २४४
- ज्येष्ठ नागरिक (८५+) ५४ हजार ६३
- नवमतदार संख्या (१८-१९ वर्ष) ३७ हजार ८९४
- दिव्यांग मतदार - ६ हजार ३३४
- सर्व्हिस व्होटर -- ३९२
- अनिवासी भारतीय मतदार ४०६



- ऑनलाइन मतदार नोंदणी करण्यासाठी https://voters.eci.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. Voter helpline App - मतदारांना आपले नाव मतदार यादीत तपासता येईल व नवीन मतदार नोंदणी या ॲपद्वारे करता येईल.

### ॲपच्या मदतीने तक्रार करता येणार

KYC App - उमेदवारांबाबत माहिती या ॲपवर उपलब्ध होऊ शकेल. तसेच Cvigil ॲपच्या मदतीने आचारसंहिता उल्लंघनासंदर्भातील तक्रार मतदारांना करता येते. या ॲपवर केलेल्या तक्रारींचे १०० मिनिटांत निराकरण केले जाते.

### २५ हजारांहून अधिक पोलीस तैनात

मुंबईत निवडणुकीच्या कामासाठी पालिकेचे ४० ते ४२ हजार कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. त्यापैकी १२ ते १५ हजार कर्मचारी हे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून काम करत आहेत. त्याशिवाय २५०० पोलीस अधिकारी, २१ हजार पोलीस कर्मचारी आणि सीआरपीएफच्या ३२ कंपन्या असा बंदोबस्त असेल. गेल्या लोकसभा निवडणुकीत मुंबईत कुठेही संवेदनशील मतदान केंद्र नव्हते. आताही अद्याप तसे आढळले नाही. पण महसूल आणि पोलीस यंत्रणा त्याबाबत सर्वेक्षण करत आहे, अशी माहिती अतिरिक्त पालिका आयुक्त अश्विनी जोशी आणि सहपोलीस आयुक्त सत्यनारायण यांनी दिली.

### जाहिरात फलकांवर कारवाई

मुंबईत आचारसंहिता लागू झाल्यापासून राजकीय जाहिरात फलकांवर कारवाई सुरू झाली आहे. राजकीय पक्षाच्या जाहिराती लावण्यासाठी केवळ विशिष्ट ठिकाणीच परवानगी दिली जाईल. त्या व्यतिरिक्त सगळे जाहिरात फलक काढून टाकले जात आहेत, अशी माहिती गगराणी यांनी दिली.

### मतदारांना १९ ऑक्टोबरपर्यंत नावनोंदणी करता येणार

प्रत्येक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. यंदाही निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार वेगवेगळ्या उपाययोजना आणि जनजागृती देखील करण्यात येत आहे. ज्या पात्र मतदारांनी अद्याप मतदार नोंदणी केलेली नाही, त्यांना निवडणुकीसाठी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या दहा दिवस अगोदरपर्यंत सहा क्रमांकाचा अर्ज करून नोंदणी करता येते. या नियमानुसार, यंदा १९ ऑक्टोबर रात्री मतदारांना नावनोंदणी करता येईल. या दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणीचे अर्ज स्वीकारले जातील. तसेच नाव कमी करणे, नावात दुरुस्ती करणे याबाबतही समान प्रक्रिया आणि मुदत आहे, अशी माहिती गगराणी यांनी दिली.

- मुंबई उपनगर जिल्ह्यात एकूण ७५७४ मतदान केंद्र आहेत. त्यापैकी ५५३ सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये, तर २२९ झोपडपट्टी परिसरात आहेत. मुंबई शहर जिल्ह्यात एकूण २५३७ मतदान केंद्र आहेत. त्यापैकी १०० सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांत आहेत.

**मुंबई उपनगरातील मतदार**

| | |
|---|---|
| महिला | ३५ लाख ६१ हजार ५८७ |
| पुरुष | ४० लाख ८५ हजार ५५० |
| तृतीयपंथी | ८३१ |
| ज्येष्ठ नागरिक | ९३ हजार ४४८ |
| नवमतदार | १ लाख २२ हजार ९१९ |
| दिव्यांग मतदार | १७ हजार २०९ |
| सर्व्हिस व्होटर | १०८९ |
| अनिवासी भारतीय मतदार | १८६७ |
| एकूण मतदारांची संख्या | ७६ लाख ४७ हजार ९६७ |

### मुंबई शहरातील मतदार

- महिला- ११ लाख ७१ हजार ८०८
- पुरुष- १३ लाख ६२ हजार २२४
- तृतीयपंथी- २४४
- ज्येष्ठ नागरिक (८५+)- ५४ हजार ६३
- नवमतदार संख्या (१८-१९ वर्ष)-३७ हजार ८९४
- दिव्यांग मतदार- ६ हजार ३३४
- सर्व्हिस व्होटर-३९२
- अनिवासी भारतीय मतदार- ४०६
- मतदारांची एकूण संख्या- २५ लाख ३४ हजार २७६

### मतदान वाढण्यासाठी राजकीय पक्षांनीही सहकार्य करण्याचे आवाहन

मतदानाचे प्रमाण वाढावे, अधिकाधिक नागरिकांनी मतदान करावे, यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा विशेष प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक आहे. मतदान वाढण्यासाठी राजकीय पक्षांनी देखील आपापल्या स्तरावर सहकार्य करावे, तसेच आदर्श आचारसंहिता व निवडणूक प्रक्रिया अंमलबजावणीत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी केले.

आपलं महानगर My महानगर.com

# मुंबईकरांना मतदार यादीसोबत मोबाईल क्रमांक जोडण्याची सुविधा

प्रतिनिधी।
आपलं महानगर वृत्तसेवा

✦मुंबई। आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षित पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमअंतर्गत पात्र नव मतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलामध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधीदेखील उपलब्ध आहे. यापैकी एक महत्वाची बाब म्हणजे मतदारांनी मतदार यादीतील आपल्या नावासोबतच स्वतःचा भ्रमणध्वनी अर्थात मोबाईल क्रमांक जोडून घेणे.

मुंबई महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी तंत्रज्ञान स्नेही अशा पर्यायांचा वापर करणे गरजेचे आहे. त्यामुळे मतदान प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवण्याची भूमिका निश्चिंतपणे बजावते येते. म्हणूनच आपल्या मतदार यादीतील नावासोबत मोबाईल क्रमांक जोडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईतील मतदारांना येत्या २० ऑगस्टपर्यंत मतदार यादीसोबत मोबाईल क्रमांक जोडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदार यादीतील नावासोबत मोबाईल क्रमांक जोडल्याने निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या विविध सूचना आणि माहिती नागरिकांना आपल्या मोबाईलवर मिळणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. यात मतदारांसाठी दावे आणि हरकतींसाठी २० ऑगस्ट २०२४ पर्यंतचा कालावधी निश्चित केला गेला आहे. निवडणूक आयोगाकडून पाठवण्यात येणाऱ्या माहितीमध्ये मतदान केंद्र, मतदानाची तारीख, मतदानाची वेळ इत्यादी महत्वाची माहिती समाविष्ट असते. मतदानाच्या दिवशी आपला वेळ वाचवण्यासोबतच, विनासायास मताधिकार बजावण्यास ही माहिती कामी येते. तसेच भारत निवडणूक आयोगाकडून मतदारांसाठी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना आणि निर्देशांची माहिती प्राप्त होते. त्याचप्रमाणे केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीने राबवले जाणारे मतदार सर्वेक्षणासारखे उपक्रम, मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्या संदर्भातील अर्जावरील कार्यवाही याबाबतच्या सूचना - नोटीसा, पंचनाम्याची सूचना (असेल तर) प्राप्त होते आणि संभाव्य कार्यवाही सुलभ होते.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
www.pudhari.com

# सहा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाच्या मान्यतेने, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी सहा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यामध्ये महानगरपालिकेतील चार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त तसेच मुंबई शहर जिल्हाधिकारी व मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी अशा सहा जणांचा समावेश आहे.

निवडणूक आयोगाने महानगरपालिका क्षेत्रासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे जबाबदारी सोपविली आहे.

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

शब्दांना सत्याची धार

प्रहार

# निवडणुकीच्या काळात सर्व तपास यंत्रणा अॅक्शन मोडवर

## आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

विधानसभा निवडणुकीच्याच्या पार्श्वभूमीवर, मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी अधिक चोखपणे जबाबदारी पार पडावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्य विक्री व तस्करी, सोने-चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवाला आदी संशयास्पद प्रकरणात कारवाई करण्यात कोणतीही हयगय करू नये. संशयास्पद प्रकरणी थेट व तत्काळ जप्तीची कारवाई करावी. तसेच आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष केंद्रीत करुन तेथेही योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिले आहेत.




आयकर विभाग, राज्य उत्पादन शुल्क, सक्तवसुली व अंमलबजावणी, महसूल गुप्तवार्ता, केंद्रीय वस्तू व सेवा कर, राज्य वस्तू व सेवा कर, वस्तू व सेवा कर गुप्तवार्ता, सीमा शुल्क, राज्यस्तरीय बँकर्स समिती, अंमली पदार्थ नियंत्रण, वित्तीय गुप्तवार्ता विभाग; रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, तटरक्षक दल, रेल्वे सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारतीय विमानतळ प्राधिकरण, नागरी उड्डाण सुरक्षा, परिवहन विभाग, आचारसंहिता कक्ष, मुंबई पोलीस दलाचे कायदा व सुव्यवस्था विभाग यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते. सर्व यंत्रणांकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले नियोजन तसेच सुरू असलेल्या कार्यवाहींचा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी आढावा घेतला. त्यानंतर सर्व यंत्रणांच्या प्रतिनिधींना संबोधित करताना ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत मध्ये आलेल्या काही अनुभवांच्या आधारे, केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग मुंबईतील निवडणुकीशी संबंधित बारीक सारीक बाबींवर विशेष लक्ष ठेवून आहे. त्यामुळे, मुंबईत कार्यरत असलेल्या प्रत्येक यंत्रणांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक दरम्यान अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. सर्व यंत्रणांचे आपापसांमध्ये योग्य समन्वय राहावे, यासाठी प्रत्येक यंत्रणेने समन्वयक अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्य विक्री व तस्करी, सोने-चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवालांशी संबंधित घडामोडींवर अधिक बारकाईने आणि गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक यंत्रणेने अधिक सक्रिय होऊन अशा संशयास्पद प्रकरणांत कारवाई करण्यात कोणतीही कसूर ठेवू नये. प्रसंगी जप्तीची कारवाई करावी, असे निर्देशही गगराणी यांनी दिले.

ते पुढे म्हणाले की, संबंधित यंत्रणांनी संयुक्त पथकांची निर्मिती करून त्यांची मुंबईतील 'चेक पोस्ट'वर नियुक्ती करावी. समन्वयक अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील माहितीची नियमितपणे देवाण-घेवाण करावी, जेणेकरुन समन्वयाने कारवाई करता येईल. मुंबईच्या सीमेवर, बंदरांवर, विमानतळ तसेच वाहतुकीच्या अन्य संसाधनाद्वारे केल्या जाणाऱ्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून संशयास्पद प्रकरणांमध्ये तात्काळ कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

Mumbai Edition
Oct, 23 2024 Page No, 9
https://epaper.prahaar.in

पुण्य नगरी

# निवडणुकीच्या काळात सर्व तपास यंत्रणांनी सजग राहावे!

## संशयास्पदप्रकरणी थेट जप्तीची कारवाई ▮ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे निर्देश

▮ **मुंबई** : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी अधिक चोखपणे जबाबदारी पार पाडावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्य विक्री व तस्करी, सोने-चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवाला आदी संशयास्पद प्रकरणात कारवाई करण्यात कोणतीही हयगय करू नये. संशयास्पदप्रकरणी थेट व तत्काळ जप्तीची कारवाई करावी. तसेच आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष केंद्रित करून तेथेही योग्य ती कारवाई करण्यात यावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई महानगरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित विविध तपास व अंमलबजावणी यंत्रणांची महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी बैठक पार पडली. या वेळी ते बोलत होते. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त पालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा, अश्विनी जोशी, डॉ. अमित सैनी, अभिजीत बांगर, विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) डॉ. आरती सिंह, सहपोलीस आयुक्त सत्या नारायण, महानगरपालिकेचे विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार आदी या वेळी उपस्थित होते.

आयकर विभाग, राज्य उत्पादन शुल्क, सक्तवसुली व अंमलबजावणी, महसूल गुप्तवार्ता, केंद्रीय वस्तू व सेवा कर, राज्य वस्तू व सेवा कर, वस्तू व सेवा कर गुप्तवार्ता, सीमा शुल्क, राज्यस्तरीय बँकर्स समिती, अमली पदार्थ नियंत्रण, वित्तीय गुप्तवार्ता विभाग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, तटरक्षक दल, रेल्वे सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारतीय विमानतळ प्राधिकरण, नागरी उड्डाण सुरक्षा, परिवहन विभाग, आचारसंहिता कक्ष, मुंबई पोलीस दलाचे कायदा व सुव्यवस्था विभाग यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला सर्व यंत्रणांकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले नियोजन तसेच सुरू असलेल्या कार्यवाहींचा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी आढावा घेतला. त्यानंतर सर्व यंत्रणांच्या प्रतिनिधींना संबोधित करताना ते म्हणाले की, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आलेल्या काही अनुभवांच्या आधारे, केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग मुंबईतील निवडणुकीशी संबंधित बारीकसारीक बाबींवर विशेष लक्ष ठेवून आहे. त्यामुळे, मुंबईत कार्यरत असलेल्या प्रत्येक यंत्रणांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ दरम्यान अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे, असे गगराणी यांनी सांगितले.

### मुंबईच्या सीमेवर, बंदरांवरील हालचालींवर वॉच!

संबंधित यंत्रणांनी संयुक्त पथकांची निर्मिती करून त्यांची मुंबईतील 'चेक पोस्ट'वर नियुक्ती करावी. समन्वयक अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील माहितीची नियमितपणे देवाणघेवाण करावी, जेणेकरून समन्वयाने कारवाई करता येईल. मुंबईच्या सीमेवर, बंदरांवर, समुद्रकिनाऱ्यांवर, विमानतळ तसेच वाहतुकीच्या अन्य संसाधनाद्वारे केल्या जाणाऱ्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून संशयास्पद प्रकरणांमध्ये तत्काळ कारवाई करावी. मद्यविक्री करणाऱ्या दुकानांबाबत दक्ष राहावे, तसेच त्याठिकाणी काही गैरव्यवहार आढळून आल्यास त्यावर तत्काळ कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

### पैशांच्या देवाणघेवाणीवर बारकाईने लक्ष राहणार

आर्थिक खर्चाच्या बाबतीत काही मतदारसंघ अत्यंत संवेदनशील आहेत. त्याठिकाणी निवडणुकीच्या काळात पैशांचा व्यवहार होणार नाही, तसेच अशा संवेदनशील मतदारसंघांमध्ये होणारी पैशांची देवाणघेवाण, व्यवहार किंवा अन्य कोणत्याही संशयास्पद वित्तीय बाबींवर अधिक बारकाईने लक्ष ठेवून संबंधित यंत्रणांनी तत्काळ कारवाई करावी, असे निर्देशही गगराणी यांनी दिले.

Mumbai Edition
Oct 23, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# मतदार जनजागृतीसाठी अभियानाचा आज शुभारंभ

## निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकारी, खेळाडू, कलाकार राहणार उपस्थित

■ **मुंबई** : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रमांतर्गत, मतदार जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' हे विशेष अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाचा महाराष्ट्रस्तरीय शुभारंभ गेटवे ऑफ इंडिया येथे शुक्रवार, ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदान पूर्वतयारीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी, भारत निवडणूक आयोगाचे उप निवडणूक आयुक्त हिर्देश कुमार, उप निवडणूक आयुक्त संजय कुमार, संचालक पंकज श्रीवास्तव, प्रधान सचिव अविनाश कुमार, सचिव सुमन कुमार, अवर सचिव अनिल कुमार हे शिष्टमंडळ ८ नोव्हेंबर रोजी मुंबई दौऱ्यावर आहे. या शिष्टमंडळाच्या उपस्थितीत 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' या विशेष अभियानाचा शुभारंभ होईल. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, मुंबई उपनगर जिल्हा व मुंबई शहर जिल्हा यांचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, सर्व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी देखील या शुभारंभास उपस्थित राहणार आहेत.

क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे, दिग्दर्शक रोहित शेट्टी, अभिनेता सुबोध भावे, अभिनेत्री वर्षा उसगांवकर, सिनेकलाकार अर्जुन कपूर, हास्य कलाकार भारती सिंग, हर्ष लिंबाचिया, गायक मिलिंद इंगळे, गायिका वैशाली माडे, गायक राहुल सक्सेना यांच्यासह विविध नामवंत कलाकार, अभिनेते तसेच दिव्यांग अधिकार क्षेत्रातील विराली मोदी, राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे सदिच्छा दूत गौरी सावंत आणि निलेश सिंगीत आदी उपस्थित राहतील.

या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश मतदारांमध्ये निवडणुकीतील सहभागाबद्दल जागरूकता निर्माण करणे व मतदारांची सक्रिय भागीदारी सुनिश्चित करणे हा आहे. त्यादृष्टीने या शुभारंभ कार्यक्रमात विविध कला सादरीकरणातून मतदार जनजागृतीचा संदेश देण्यात येणार आहे.

पुण्य नगरी

# मतदारांना मूलभूत सोयीसुविधा पुरवा

## अतिरिक्त जिल्हा निवडणूक आयुक्तांचे निर्देश

■ **मुंबई** : विधानसभा निवडणुकीमध्ये मुंबई पश्चिम उपनगर जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर निश्चित किमान सुविधा योग्य प्रकारे पुरवल्या जाव्यात. मतदारांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, प्रतीक्षालय आणि रांगेतील व्यक्तींसाठी आसन व्यवस्था यांसारख्या मूलभूत सोयीसुविधा विनासायास उपलब्ध कराव्यात. निश्चित किमान सुविधा पुरविण्याकामी कोणतीही कसूर ठेवू नये, असे निर्देश अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त पालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी दिले आहेत.

सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अंधेरी (पूर्व), अंधेरी (पश्चिम), वेसावे (वर्सोवा), जोगेश्वरी (पूर्व), गोरेगाव आणि दिंडोशी या सहा विधानसभा मतदारसंघांतील निवडणूक विषयक कामांची आढावा बैठक गुरुवारी पार पडली. त्या वेळी विपिन शर्मा यांनी हे निर्देश दिले. विलेपार्ले (पूर्व) येथील मास्टर मतदान केंद्रांवर निश्चित किमान सुविधा पुरवण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, कचरापेटी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर तसेच रॅम्पची व्यवस्था, रांगांमध्ये गर्दी झाल्यास त्याठिकाणी मतदारांना बसण्यासाठी खुर्ची किंवा बाकडे व वैद्यकीय सुविधा पुरवण्यात याव्यात, असे निर्देश विपीन शर्मा यांनी दिल्या.



### 'स्वीप' उपक्रमाच्या अंमलबजावणीचा वेग वाढवावा

ज्या ठिकाणी मतदान कमी झाले आहे, त्या ठिकाणी मतदारांच्या घरोघरी जाऊन मतदारांचे प्रबोधन करावे. त्यांना मतदान करण्याकामी प्रोत्साहित करावे. सार्वजनिक ठिकाणांवर फलक (होर्डिंग), बॅनर, भित्तीपत्रके प्रदर्शित करणे, विविध शासकीय कार्यालयांमध्ये बॅनर, भित्तीपत्रके, स्टॅण्डीज प्रदर्शित करणे, बेस्ट बसगाड्या व बस थांब्यांवर प्रसिद्धी करावी. खासगी कंपन्या, कॉर्पोरेट क्षेत्र, असंघटित क्षेत्रातील कामगार अशा वेगवेगळ्या घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य नियोजन करावे. 'स्वीप' उपक्रमाच्या अंमलबजावणीचा वेग वाढवावा, असे निर्देशही डॉ. शर्मा यांनी दिले.

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# 'स्वीप' उपक्रमाच्या अंमलबजावणीचा वेग वाढवण्याचे आदेश

# मतदान केंद्रांवर मतदारांना मूलभूत सोयी-सुविधा पुरवा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांमध्ये मुंबई पश्चिम उपनगर जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर निश्चित किमान सुविधा योग्य प्रकारे पुरविल्या जाव्यात. मतदान केंद्रांवर येणाऱ्यांना मतदारांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हिल चेअर, प्रतिक्षालय आणि रांगेतील व्यक्तींसाठी आसन व्यवस्था यांसारख्या मुलभूत सोयी सुविधा विनासायास उपलब्ध कराव्यात. निश्चित किमान सुविधा पुरविण्याकामी कोणतीही कसूर ठेवू नये, असे निर्देश अति जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अति पालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी दिले आहेत.

समाजातील सर्व स्तरांमध्ये पोहोचून मतदान करण्याबाबतची जनजागृती होईल, यादृष्टीने उपक्रमांची संख्या वाढवावी. 'स्वीप' उपक्रमाच्या अंमजबजावणीचा वेग वाढवावा,असे निर्देशही त्यांनी दिले. ते पुढे म्हणले की, प्रत्येक मतदान केंद्रांवर निश्चित किमान सुविधा पुरविण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, कचरापेटी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हिलचेअर तसेच रॅम्पची व्यवस्था, रांगांमध्ये गर्दी झाल्यास त्याठिकाणी मतदारांना बसण्यासाठी खुर्ची किंवा बाकडे व वैद्यकीय सुविधा आदी निश्चित किमान सुविधा पुरविण्यात याव्यात.

मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम अंतर्गत, मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी सुरु असलेल्या विविध जनजागृती उपक्रमांचा आढावा घेताना डॉ. शर्मा म्हणाले की, ज्या ठिकाणी मतदान कमी झाले आहे, त्या ठिकाणी मतदारांच्या घरोघरी जाऊन मतदारांचे प्रबोधन करावे. त्यांना मतदान करण्याकामी प्रोत्साहीत करावे. मतदान जनजागृतीसाठी विविध प्रसार माध्यमांचा अवलंब करावा.

आपलं महानगर | My महानगर.com

# गृहनिर्माण सोसायट्यांनजीक मतदान केंद्रे

## विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा



**मुंबई। मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पाड पाडताना आगामी निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे निर्देश निवडणूक यंत्रणेला दिले आहेत. त्यासाठी गृहनिर्माण सोसायटीमध्ये नजीक मतदान केंद्रांची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे निवडणूक कामकाजात कोणतीही कसूर राहणार नाही, याबाबतही काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले आहेत. कोणतीही लहान - मोठी समस्या निर्माण झाल्यास ती अशी प्रलंबित न ठेवता वरिष्ठांच्या निदर्शनास आणून त्यावर तातडीने तोडगा काढून ती समस्या मार्गी लावावी, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.**

राज्यात विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे. सराव राजकीय पक्ष निवडणूक तयारीला लागले आहेत. सर्वच पक्षांतील इच्छुक उमेदवार निवडणूक तारखेच्या घोषणेची प्रतीक्षा करीत आहेत. तर, दुसरीकडे मुंबई महापालिका आयुक्त व प्रशासकासोबतच जिल्हा निवडणूक अधिकारी निवडणुकीची जबाबदारी खांद्यावर पडल्याने भूषण गगराणी यांनी शुक्रवारी विधानसभा निवडणुकीच्या पूर्व तयारीबाबत संबंधितांची बैठक घेऊन आढावा घेतला. निवडणुकीच्या कामकाजात कोणतीही कसूर राहू नये, यासाठी योग्य ती काळजी घेऊन सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने, सहकार्याने कार्य करावे. कोणत्याही लहानात लहान अडचणीलाही गांभीर्याने घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देशही भूषण गगराणी यांनी या बैठकीत संबंधित यंत्रणांना दिले.

याप्रसंगी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी ( मुंबई शहर), संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर, सह पोलिस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

### निवडणूक पूर्व तयारीबाबत सखोल आढावा

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांची स्थिती, आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदार याद्यांची स्थिती आणि नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे, मतदान संयंत्र ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रुम, संवेदनशील मतदान केंद्रांची यादी, पोलिस आणि निवडणूक यंत्रणा यांच्याकडून विविध मतदारसंघांमध्ये संयुक्त पाहणी आदींबाबत अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर आणि विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी आढावा सादर केला.

### मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्वाचे

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी निवडणूक पूर्व तयारीबाबत माहिती जाणून घेतल्यानंतर, विधानसभा निवडणुकीशी संबंधीत मुंबईतील सर्वच यंत्रणांकडून उत्तम पद्धतीने काम सुरू असल्याचे सांगितले. तसेच, मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकांपर्यंत आपली यंत्रणा पोहोचेल, हे सुनिश्चित करावे. मतदार यादीमध्ये मतदारांची नाव नोंदणी करणे इत्यादी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी, असे निर्देश यंत्रणेला दिले. त्याचप्रमाणे, नागरिकांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणापासून अगदी जवळ मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यासाठी सुलभ रचनेवर भर देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने देखील गृहनिर्माण संस्थांशी पुन्हा एकदा भेटी देऊन समन्वय साधावा. संपूर्ण कामकाजादरम्यान कोणत्याही प्रकारची लहानात लहान अडचण असेल तरी ती आपल्याकडे न ठेवता त्यावर वेळीच आणि योग्य पद्धतीने तोडगा निघावा, यासाठी वरिष्ठांशी वेळोवेळी चर्चा करावी. निवडणुकीसंदर्भातील संपूर्ण तयारी अत्यंत चोखपणे आणि जबाबदारीने पार पाडावी, असे निर्देशही भूषण गगराणी यांनी यावेळी दिले.

पुण्य नगरी

# मतदान केंद्रांवर मतदारांना मूलभूत सुविधा देण्यात कसर नको

## सुविधा पुरवणाऱ्या कंत्राटदारांना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे निर्देश

**मुंबई** : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर किमान सुविधा योग्यप्रकारे पुरवल्या जाव्यात. मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सोयीसुविधा देण्यात कोणतीही कसूर ठेवू नये, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी संबंधित कंत्राटदारांना दिले आहेत. तसेच मतदान केंद्रांवरील सोयीसुविधांची पूर्तता, गुणवत्ता आदींचे परीक्षण करण्यासाठी पाच सदस्यीय पथक कार्यरत राहील, अशी माहितीही त्यांनी दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा क्षेत्रातील विविध मतदान केंद्रांवर सोयीसुविधा पुरवणाऱ्या कंत्राटादारांची बृहन्मुंबई महानगरपालिका



मुख्यालयात गुरुवारी बैठक घेण्यात आली. त्यावेळी गगराणी बोलत होते. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा, डॉ. अश्विनी जोशी, डॉ. अमित सैनी, अभिजीत बांगर, विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, सर्व परिमंडळांचे उप आयुक्त आणि संबंधित अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकी वेळी काही मतदान केंद्रांवर मूलभूत सोयीसुविधांबाबत मतदारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची भारत निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घेतली आहे. प्रत्येक मतदान केंद्रांवर निश्चित किमान सुविधा पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्ह्यांमधील प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, कचरापेटी, स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर तसेच रॅम्पची व्यवस्था, रांगांमध्ये गर्दी झाल्यास त्याठिकाणी मतदारांना बसण्यासाठी खुर्ची किंवा बाकडे, मोकळ्या ठिकाणी मतदान केंद्र असल्यास मंडपाची उभारणी, पंखे आदी निश्चित किमान सुविधा पुरवण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा कटिबद्ध आहे. या सोयीसुविधांच्या अभावामुळे मुंबईची प्रतिमा डागाळली जाणार नाही, हे सुनिश्चित करण्यात येत आहे. या उत्तम गुणवत्तेच्या किमान सुविधा योग्यप्रकारे पुरवण्याची जबाबदारी संबंधित नियुक्त कंत्राटदारांचीही आहे. निवडणूक हे राष्ट्रीय कर्तव्य असल्यामुळे कंत्राटदारांनी केवळ व्यावसायिक विचार न करता या राष्ट्रीय कार्यात आपले उत्कृष्ट योगदान द्यावे, असे आवाहनही गगराणी यांनी यावेळी केले.

### उपायुक्त, अभियंत्यांवर जबाबदारी

निवडणूक यंत्रणा आणि सुविधा देणारे कंत्राटदार यांच्यात योग्य समन्वय राहावा, यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेच्या अधिकाऱ्यांसोबतच महानगरपालिकेचे सर्व परिमंडळीय उपआयुक्त यांचे सहकार्य राहील. मतदान केंद्रांवर सर्व सुविधा तयार असल्याची खात्री उपआयुक्त करतील. तसेच मतदान केंद्रांवर पुरवण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची पूर्तता आणि गुणवत्ता तपासण्यासाठी ३६ विधानसभा मतदारसंघांमध्ये महानगरपालिकेच्या २६ प्रशासकीय विभागांतील (वॉर्ड) यांत्रिकी, विद्युत, स्थापत्य, घनकचरा व्यवस्थापन, परिरक्षण आदींशी संबंधित वरिष्ठ स्तरावरील पाच अभियंत्यांचा समावेश असलेले पथक नेमण्यात आले आहे.